# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक : ९ फेब्रुवारी, २००४

## दिनांक ०९/०२/२००४ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार, दिनांक ०९ फेब्रुवारी २००४ रोजी सकाळी ११-०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्त्या.

०१) श्रीमती ज्योती कलानी, मा. सभापती
०२) श्री उमाप रामदास
०३) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
०४) श्री तलरेजा विनोद चंदीराम
०५) श्रीमती छाब्रिया भारती
०६) श्रीमती माने किरण
०७) श्री सतरामदास जेसवानी
०८) श्री नारायण पंजाबी
०९) श्री श्रीमती बामणकर नंदिनी
१०) श्री ईश्वर पमनानी
११) श्री पृथ्वी वलेचा
१२) श्रीमती सुर्वे जयश्री

तसेच मा. सदस्या श्रीमती निता आहुजा, श्रीमती सिमा मोकल व मा. सदस्य मोहन बेहरानी व श्री लिंगे सुर्यकांत या / हे अनुपस्थित होत्त्या / होते.

सकाळी ११-५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री उत्तम लोणारे, उप आयुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. १ वाचून दाखवितात.

विषय :- मागील सभेचे दिनांक २४.१२.२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मागील सभेचे दि. २४.१२.२००३ रोजी चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :- पास, पास.

मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## प्रस्तावना

**विषय क्र.** २ :—उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी
प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३—२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | *कामाचे नाव* | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर —४ येथिल बाल शिवाजी व जिजामाता उदयानाचे सुशोभिकरण करणे, उल्हासनगर—४ (५८३ महापालिका निधी) २.०० टक्के कमी दरावर) | ९९९४१८/— | २८.११.०३ | मे. सुदेश इंटरप्रायेझेस |
| २ | उल्हासनगर—५ मध्ये बॅ. नं. १७११ ते सफाई कामगार क्वार्टसजवळील कल्व्हर्ट जवळ पर्यंत सी.सी. एम—२५० ने व नाली बांधणे ( ५८१ महापालिका निधी १३.२३ टक्के कमी दरावर) | ६४२८०९/— | १.१२.०३ | मे. जय अंबे कन्स्ट्रक्शन |

उपरोक्त अनु. क्र. १ वरील कामासाठी निविदाकार यांनी भरलेल्या निविदेचे दर वाजवीपेक्षा कमी वाटत असल्याने, व अनु. क्र. २ वरील कामासाठी निविदाकार यांनी भरलेल्या निविदेचे दर वाजवीपेक्षा कमी वाटत असल्याने मा. आयुक्त यांनी अनु. क्र. १ व अनु. क्र. २ यांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत मान्यता प्रदान केली असून त्यानुसार सदर निविदाकारांकडुन करारनामा करण्यात आलेले असून सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १३५ <u>दिनांक:—९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती. भारती छाब्रिया.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ३**:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत १० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास

<u>मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. ३**:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत १० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३—२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभपती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र | *कामाचे नाव* | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | इंदिरा आशिर्वाद नगर(स्मशान भूमी जवळ) ते गााऊबाई पाडा(शिवाजी किराणा स्टोअर्स जवळ)५० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ८७८८९ | २४.१०.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का.सह.सं.लि. |
| २ | उल्हासनगर १ येथील बॅरेक न२३१ येथे ८० मि.मि.व्यासाच्या जलवाहिनी वरून ४० मि.मि.व्यासाची अतिरिक्त वाढीव जलवाहिनी टाकणे | २५६६० | २२.१०.०३ | गुरूनानक मजूर म.का.सह.सं.लि |
| ३ | उल्हासनगर ५ प्रभाग क्र १३,अंकल गॅरेज जवळ भुयारी गटार योजने अंतर्गत १५० मि.मि.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणे व मेन वॉल्व चेंबर्स बांधणे | २४७५०० | १२.११.०३ | हरेरामा मजूर म.का.सह.सं.लि. |
| ४ | उल्हासनगर ४,प्रभाग क्र १४ मधील शेरा बिल्डींग ते दत्त मंदीरा पर्यत ५० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | २३३२० | २०.१०.०३ | शंकर महादेव मजूर म.का.सह.सं.लि. |
| ५ | उल्हासनगर ४,प्रभाग क्र ११ येथे मराठी शाळा क्र १४,शिव शक्ती कॉलनी जवळील ८० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ९९०६५ | १६.१०.०३ | गुरूनानक मजूर म.का.सह.सं.लि. |
| ६ | उल्हासनगर ४ येथे आंबेडकर नगर या ठिकाणी जलवाहिनी टाकणे बाबत | १३९३९२ | ०२.०९.०३ | विकीराज मजूर म.का.सह.सं.लि. |
| ७ | उल्हासनगर ४ मध्ये दहाचाळ या ठिकाणी जलवाहिनी टाकणे | ३०१६३२ | ०२.०९.०३ | विश्व सिद्धी मजूर म.का.सह.सं.लि |
| ८ | उल्हासनगर ४ मध्ये सिदार्ध नगर या ठिकाणी जलवाहिनी टाकणे | ३६४८०० | ०२.०९.०३ | विश्व सिद्धी मजूर म.का.सह.सं.लि |
| ९ | उल्हासनगर ४ अशोक नगर या ठिकाणी जलवाहिनी टाकणे | १९२००० | ०२.०९.०३ | विकीराज मजूर म.का.सह.सं.लि. |
| १० | उल्हासनगर ३ बॅरेक ने १२०० ते प्रिय दर्शनी | ७०२०० | २४.१०. | स्वामी समर्थ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अपा. जवळ शांती नगर पर्यत ८० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | | ०३ | मजूर म.का.सह. सं.लि. |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप—निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप—निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३६

**दिनांकः—९.२.२००४**

सुचकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती. जयश्री सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील १० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची

सही/—

अनुमोदकाची

सही/—

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ४:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

**काही सदस्य :—** पास, पास

**मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

**प्रस्तावना**

**विषय क्र.** ४:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३—२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभापती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | *कामाचे नाव* | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | लालचक्की पंप हाऊस ते टेगोर सोसायटी,उल्हासनगर ४ येथे १०० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १६७६०० | १८.११.०३ | शेरावाली मजूर म.का. सह.सं.लि. |
| २ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते चोपडा कोर्ट येथे १०० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १०१९०० | १८.११.०३ | शिव कृपा मजूर म.का. सह.सं.लि. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | टिल्सन शोपिंग सेटर समोर ते नवरंग अपा. जवळील अस्थित्वात असलेली १०० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी दुरूस्ती करणे | ११३००० | ०७.११.०३ | यशोदा मजूर म.का.सह.सं. लि. |
| ४ | सिवर लाईन क्लिनिंग मशिनवर सफाई कामगारांचा पुरवठा करणे | २२६५०० | १०.११.०३ | हरेरामा मजूर म.का.सह.सं. लि. |
| ५ | गोल मैदान येथे पाईप लाईनची गळती काढणे,वेगवेगळया ठिकाणी पाईप लाईनवर स्लुस वॉल्व बसविणे | ११९८८० | १५.११.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |
| ६ | उल्हासनगर १ येथे बॅरेक नं ३७०,३७१ येथे ८० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ९२००० | १८.११.०३ | हरेरामा मजूर म.का.सह.सं. लि. |
| ७ | उल्हासनगर १ धोबी घाट येथे शिव सेना कार्यालया समोर ४० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ४८१६० | २५.०९.०३ | हरेरामा मजूर म.का.सह.सं. लि. |
| ८ | उल्हासनगर १ प्रभाग क्र ३येथे जूनी पाण्याच्या टाकीच्या भोवती कुंपण भिंत बांधणे | १०८३०० | ०९.१०.०३ | गुरूनानक मजूर म.का. सह.सं.लि. |
| ९ | उल्हासनगर १ साधुबेला शाळे जवळ २५० मि.मि.व्यासाच्या स्लुस वॉल्व बसविणे | ४१३४० | २०.१०.०३ | शंकर महादेव मजूर म.का.सह.सं. लि |
| १० | उल्हासनगर ३ सुभाष नगर येथे ८० मि.मि. व ५० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी बदलणे | १००००० | २३.१०.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |
| ११ | वेगवेगळया कामासाठी लागणारे ८० व १०० मि.मि व्यासाची जी आय पाईप पुरविणे | १५१४८८ | १७.११.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप—निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप—निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १३७
<u>दिनांक:—९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :— श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती. जयश्री सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ५**:—उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी लागणारे प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाईचे साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

काही सदस्य :— पास, पास

मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

प्रस्तावना

**विषय क्र. ५**:—उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी लागणारे प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाईचे साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

उल्हासनगर महानगरपातिकेच्या भांडार विभागाने कार्यालयीन कामासाठी लागणारे प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाई साहित्य करून घेणेंसाठी राज्य स्तरावरील वर्तमान पत्रामध्ये दि. ३०.१०.२००३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार विहित दि. ३०.१०.२००३ ते दि. १०.११.२००३ या कालावधीत खालील पुरवठादारांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. मे. श्रुती प्रिंटर्स, उल्हासनगर
२. मे. कैलास एंटरप्राईजेस, उल्हासनगर
३. मे. प्लाटो प्रिंटर्स, उल्हासनगर
४. मे. इमाप्रिंट ऑफसेट प्रिंटर्स, नाशिक

उपरोक्त निविदा धारकापैकी मे. श्रुती प्रिंटर्स, यांनी बाब क्र. १५, १६ व १७, मे. कैलास एंटरप्राईजेस यांनी बाब क्र. २,३ व ५ मे. प्लाटो प्रिंटर्स यांनी बाब क्र. १,८,९,११,१२,१३,१४ व १८ तसेच मे. इमप्रिंट ऑफसेट प्रिंटर्स यांनी बाब क्र. ४,६,७ व १० साठी न्युनत्तम दर सादर केलेले होते. या सर्व बाबींसाठी एकूण रू. ४,९८,२२०/. (चार लाख अठ्ठयान्नऊ हजार दोनशे वीस) इतका खरेदी खर्च येणार आहे. सदर छपाई खर्च अ ३ (पप)या लेखाशिर्ष सन ०३—०४ सालच्या वित्तिय खालील तरतुदी मधुन करावयाचा असून मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुरवठेदारांशी पालिकेमार्फत करारनामा करून काम सुरू करण्यात आले आहे. सदर बाब मा. स्थायी समिती सभेपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड)अन्वये माहितीसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १३८ दिनांकः—९.२.२००४

सुचकाचे नाव :— श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती. भारती छाब्रिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी लागणारे प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाईचे साहित्य पुरविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ६**:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत १३ विविध कामी

प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>काही सदस्य :—</u> पास, पास

<u>मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

**प्रस्तावना**

**विषय क्र. ६**:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत १३ विविध कामी

प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३—२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभापती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | *किर्ती पथ,उल्हासनगर १ येथे ८० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ४७४०० | २५.०७.०३ | विकी राज म.का.सह.सं.लि. |
| २ | *शिव शक्ती कॉलनी,विष्णू दर्शन,अमन टॉकीज समोर,उल्हासनगर ३ येथे ५० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ४७००० | २२.०७.०३ | अनंत म.का.सह.सं.लि. |
| ३ | *पटेल नगर येथील जलकुंभा जवळ विविध ठिकाणी क्रास कनेक्शन करण्या करीता २१९ मि मि व्यासाची पाईल लाईन टाकणे* | २१८३५० | ०४.०६.०३ | सागर म.का.सह.सं.लि. |
| ४ | *सेक्शन १८ ते २२ मधील पाणी पुरवठा सुधारणा होण्यासाठी स्लॅईस व्हॉल्व व क्रास कनेक्शन करणे* | २७१००० | २७.०६.०३ | बजरंगबली म.का.सह.सं.लि. |
| ५ | *वार्ड क्र ६८,दुरू हॉटेल ते बॅ नं ५०८,उल्हासनगर २ येथे ५० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ३७२०० | ११.०६.०३ | भोलेनाथ म.का.सह.सं.लि. |
| ६ | *सुभाष नगर,येथे संतोषी माता मंदीर,जोशी टेलर्स,ऑर्डीनन्स कंपाऊडच्या मागे,उल्हासनगर ३ येथे ५० व ८० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ६४८६१ | ०९.०६.०३ | शिव मुद्रा म.का.सह.सं.लि. |
| ७ | *नाका नं ११ ते बॅ नं २०४६/४५,बॅ नं २०४८,बॅ नं २०३८,ते शांती प्रकाश शाळा उल्हासनगर ५ येथे १०० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | २९६००० | ०४.०६.०३ | रवि किरण म.का.सह.सं.लि. |
| ८ | *हनीमुन कॉटेज सूर्यकिरण हॉस्पीटल ते नमस्कार वस्त्रालय,उल्हासनगर २ येथे ५० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ३३२६७ | २२.०५.०३ | स्वामी समर्थ म.का.सह.सं.लि. |
| ९ | *उल्हासनगर ३ आनंद नगर येथे पंपींग स्टेशनच्या स्लॅबची दुरूस्ती व बळकटीकरण करणे* | १११४७३ | १३.०५.०३ | स्वामी समर्थ म.का.सह.सं.लि. |
| १० | *प्रभाग क्र १५ येथे डॉ.चांदीरामाणी जवळ ,उल्हासनगर ४ येथे ५० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | २३०५० | २९.०५.०३ | शारदा म.का.सह.सं.लि. |
| ११ | *प्रभाग क्र १८ येथे सेंट्रल हास्पीटल ते हदलीप पेंटर,राज स्टूडीओच्या पाठी मागे,उल्हासनगर ४ येथे ८० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | १००००० | २९.०५.०३ | स्वामी समर्थ म.का.सह.सं.लि |
| १२ | *प्रभाग क्र २५,बॅ न १६८८—१६८९ ते श्रीराम नगर पर्यत ,उल्हासनगर ४ येथे १०० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ११९९०० | ३१.०५.०३ | मोहीनीराज म.का.सह.सं.लि |
| १३ | *दसरा मैदान ते हॉटेल प्लाझा र्प्यत रस्त्याच्या उजव्या बाजूने ,उल्हासनगर ५ येथे ८० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे* | ९८६०० | ०४.०४.०३ | आदर्श म.का.सह.सं.लि |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप—निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप—निबंधक ,ठाणे यांनी

काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३९
दिनांक:—९.२.२००४

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती. भारती छाबिंया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील १३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ७:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत १३ विविध कामी
प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा सदस्य श्री रामदास उमाप :— फक्त माहितीसाठी असल्याने चर्चा करता येत नाही

मा सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— ही फक्त औपचारिकता आहे आयुक्तांना अधिकार असल्याने ही कामे त्यांनी त्यांच्या अधिकारात करुन त्यांच्या अधिकाराचा वापर केलेला आहे

काही सदस्य :— पास, पास

मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

प्रस्तावना

**विषय क्र.** ७:—उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत १३ विविध कामी
प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३—२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभापती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र | *कामाचे नाव* | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | अशोक टॉकीज ते आदर्श फ्लोअर मिल,सेक्शन २४,उल्हासनगर ३ येथे ८० व १०० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | ९१९०० | २४.०९.०३ | सूर्य ज्योत म.का.सह.सं.लि. |
| २ | स्मशान भूमी ते आशा को ऑप सो. ,उल्हासनगर ३ येथे १०० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १३१००० | २३.०९.०३ | तूळजा भवानी म.का.सह.सं. लि. |
| ३ | प्रभाग क्र ५ येथे राजावीर हॉस्पीटल पासून बॅ नं५८६ पर्यत,उल्हासनगर २ येथे ८० मि मि व ५० मि मि व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणो | १३३२६० | २३.०९.०३ | तूळजा भवानी म.का.सह.सं. लि. |
| ४ | प्रभाग क्र १८ मध्ये बॅ नं ११६७ ते ११७६ उल्हासनगर ३करीता बुस्टर पंप बोट क्लब येथे पोलादी जलवाहिनी जोडणी करणे | ७४४०० | २३.०९.०३ | जयशिवराय मजूर म.का. सह.सं.लि. |
| ५ | कैलाश परबत हॉटेल ,चोपडा कोर्टसमोर ,उल्हासनगर ३ येथे ८० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | ११६०० | ०२.०९.०३ | बिस्मिल्लाह मजूर म.का. सह.सं.लि. |
| ६ | गुलराज टॉवर ते धरमदास दरबार ओ.टी. ,उल्हासनगर ३ येथे८० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | ४१६०० | ०३.०९.०३ | भोलेनाथ मजूर म.का.सह.सं. लि. |
| ७ | प्रभाग क्र १० येथे भाजी मार्केट ते गणेश नगर पर्यत,उल्हासनगर ५ येथे १०० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | ३०८१०० | २९.०८.०३ | अनंत मजूर म. का.सह.सं.लि. |
| ८ | विठ्ठलवाडी व लालचक्की,उल्हासनगर ४ येथील गोडावूनला रोलींग शटर बसविणे | २६२७० | २५.०८.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |
| ९ | मेन रोड पासून ते संतोषी माता मंदीरचे मागे ,उल्हासनगर ४ येथे १०० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | १०१००० | १९.०८.०३ | प्रभात मजूर म. का.सह.सं.लि. |
| १० | रमाबाई आंबेडकर नगर व भैयासाहेब आंबेडकर नगर,उल्हासनगर २ येथे जी आय जलवाहिनी टाकणे | ४२८७८९ | ०२.०८.०३ | बजरंगबली मजूर म.का. सह.सं.लि. |
| ११ | गूलशन टॉवर ते लासीपाडा,उल्हासनगर ३ येथे १०० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | ७०४२० | २३.०८.०३ | साई लक्षी मजूर म.का.सह.सं. लि. |
| १२ | मोरे नगर,उल्हासनगर १येथे ५० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | २५००० | १९.०८.०३ | आरती आदि. मजूर म.का. सह.सं.लि. |
| १३ | बारावी मुख्य जलवाहिनी येथे बॅ नं १४१६,प्रभाग क्र १६,उल्हासनगर ४ येथे ६० व ५० मि मि व्यासाची जी आय आय पाईन लाईन टाकणे | ९८६३० | २३.०८.०३ | भोलेनाथ मजूर म.का.सह.सं.लि |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप—निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप—निबंधक ,ठाणे यांनी

काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४० दिनांकः—९.२.२००४

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील १३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ८**:—उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजनेंतर्गत देखभाल व दुरुस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

मा सदस्या श्रीमती किरण माने :— भुयारी गटार योजना व्यवस्थित सुरु आहे का?

मा सदस्य श्री विनोद तलरेजा :— ठेकेदार काम व्यवस्थित करित आहे का?

मा सदस्य श्री नारायण पंजाबी :— अगोदरची भुयारी गटारे चालु आहेत अथवा बंद आहेत ते आधी सांगा

उप अभियंता (श्री सेलवन) :— भुयारी गटार योजना व्यवस्थित सुरु असुन, ठेकेदाराकडुन चोकअप काढण्याची कामे केली जातात

मा सदस्य श्री विनोद तलरेजा :— स्थायी समितीचे सदस्य जी देखील तक्रार येथे करित आहेत तर त्यांच्या प्रभागातील भुयारी गटारांचे चोकअप काढण्याचे काम प्राधान्याने करण्यात यावे

मा सदस्य श्री रामदास उमाप :— माझ्या प्रभागात भुयारी गटारांवर झाकणे नसल्याने त्यामध्ये लोक पडुन अपघात होत आहेत याबद्दल मी गेल्या २ वर्षा पासुन तक्रार करीत आहे माझ्या प्रभागात ३ उघडे भुयारी गटारे आहेत

मा सदस्य श्री नारायण पंजाबी :— माझ्या प्रभागात देखील जयहिंद शाळा व गोविंदा सोसायटीच्या बाजुला गटारे उघडी आहेत

मा सदस्य श्री रामदास उमाप :— आता निवडणुकीमुळे लवकरच आचार संहिता लागु होणार आहे, दोन—तीन महिन्यात या ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास आम्ही त्याची तक्रार आपल्याकडे देऊ हा जो पाणी पुरवठा विभाग आहे तो अत्यंत निष्काळजी असा विभाग आहे वारंवार १० वेळा फे—या मारल्यानंतर भुयारी गटार सफाईची मशिन मिळते या विभागाबद्दल आमची कायम तक्रार असते

विचारल्यावर सांगतात की, कॅम्प नं ४ व ५ मध्ये मशिन गेलेली आहे येथील अधिकारी अत्यंत निष्काळजी असे आहेत

श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :— तुम्ही मला तुमच्या समस्यांबाबत पत्र द्या, मी त्यावर योग्य ती कारवाई करतो

मा सदस्या श्रीमती किरण माने :— कॅम्प नं ४ व ५ येथील भुयारी गटारे नेहमी चोकअप असतात, वर्षात कमीत कमी ३ वेळा तरी येथील गटारे चोकअप असतात

श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :— तुम्ही मला अशा ठिकाणांची यादी द्या, मी ती साफ करुन घेण्याची व्यवस्था करतो

मा सदस्या श्रीमती किरण माने :— गटारे सफाईसाठी कधीही वेळेवर गाडी मिळत नाही एकच गाडी असल्याने अडचण होते सफाईची कामे ब—याच ठिकाणी करावयाची असतात वारंवार दुरध्वनी करुनही गाडी मिळत नाही अजुन एक गाडी घ्या

श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :— एक गाडी पुरेशी आहे

मा सदस्य श्री सतरामदास जेसवानी :— अजुन एक गाडी मागवायला हवी, यापूर्वी तसा प्रस्ताव देखील पास झालेला आहे

मा सदस्या श्रीमती किरण माने :— दुरध्वनी केल्यानंतर चार दिवसांनी प्रभागात गाडी येते

वाहन विभाग प्रमुख (श्री व्ही एस ठाणेकर) :— नवीन एसएलसीएम गाडी टाटा या कंपनीकडुन खरेदी करण्यात येणार आहे त्याच्या चॅसीस खरेदीसाठी रु ५ ८६ लाखाचा धनादेश कंपनीला देणे आवश्यक आहे याबाबतचा प्रस्ताव एप्रिल महिन्यात आम्ही लेखा विभागात पाठविलेला आहे अद्याप धनादेश न मिळाल्याने गाडी आलेली नाही

मा सदस्य श्री सतरामदास जेसवानी :— जुनी गाडी नेहमी नादुरुस्त अवस्थेत असते त्यामुळे प्रभागात कामे होत नाहीत

श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :— तुम्ही मला ठिकाणांची यादी द्या

मा सदस्य श्री विनोद तलरेजा :— नवीन गाडीची आवश्यकता आहे

मा सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :— धनादेश देवुन टाका

मा सदस्य श्री सतरामदास जेसवानी :— आयुक्त साहेब एप्रिल महिन्यात लेखा विभागात प्रस्ताव पाठविला आहे, परंतु अद्याप धनादेश मिळालेला नाही या बाबीकडे लक्ष देण्यात यावे

मा सदस्य श्री विनोद तलरेजा :— त्यांना धनादेश देण्यात येईल

काही सदस्य :— पास, पास

मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

प्रस्तावना

**विषय क्र. ८**:—उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजनेंतर्गत देखभाल व दुरुस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भूयारी गटार योजनेची देखभाला करिता स्थायी समिती ठराव क्र ५० दि.०३.१०.०२ नुसार रू १८०२७४९/— मात्र मान्यता देण्यात आल्याने महानगरपालिकेचे पत्र क्र ैक्ध२३११ दि.१७.१०.०२ नुसार ठेकेदार मेसर्स संध्या कंस्ट्रक्शन यांना देण्यात आले होते.तथापि सदरहू काम करण्याचा कालावधी दिनांक १६.१०.०३ रोजी समाप्त झाला

होता. परंतू नविन प्राकलन तयार होई पर्यत सदर ठेकेदारास १७.१०.०३ ते १६.०१.०४ (तीन महिने) पूर्वीच्याच करारनामा प्रमाणे नियम,अटी व शर्तीच्या नुसार मुदत वाढ देण्यात आली आहे. सदर तीन महिन्याचा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी कार्योत्तर मंजूरी करिता मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला आहे.

पुढील काळात भूयारी गटार योजनेचे देखभाल,दुरूस्तीचे काम करण्यासाठी निविदा मागविणे अत्यंत जरूरीचे असल्याने पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने भूयारी गटार योजनेचे देखभाल व दुरूस्तीचे रू १८.९२८ लक्ष किंमतीचे वार्षिक अंदाज पत्रक तयार केलेले असून सदर अंदाज पत्रकाचा कालावधी निविदा मंजूर झाल्यापासून एक वर्ष असेल. सदरहू काम करण्यासाठी महानगरपालिकेच्या २००३—०४च्या वार्षिक अंदाजपत्रकात पुरेसा निधी शिल्लक आहे.

भुयारी गटार योजनेच्या अंदाजपत्रकातील दर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०००—०१च्या दरसूचीच्या अधिन राहून तयार करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी एअरटेक मशीन (ैमूमत सपदमू बसमंदपदह डंबीपदम)पोहचणार नाही अशा अरूंद रस्ते,गल्ली व बॅरेकसाठी सफाई कामगारांमार्फत काम करून घेण्याची तरतूद केली आहे.

भूयारी गटार योजनेच्या देखभाल,दुरूस्तीच्या वार्षिक अंदाजपत्रकात मेनहोल चेंबर्स साफ करणे/तूटलेले चेंबर्स दुरूस्त करणे,काही ठिकाणी चेंबर्सना फ्रेम व कव्हर बसविणे तसेच इत्यादी किरकोळ कामांचाही समावेश आहे.

वरील भूयारी गटार योजनेच्या देखभाल दुरूस्तीच्या वार्षिक अंदाजपत्रकासाठी मुख्यलेखा अधिकारी व मुख्यलेखा परिक्षक यांची शिफारस आहे. तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी ठेवण्यात यावा हि विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४१
<u>दिनांक:—९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजनेंतर्गत देखभाल व दुरुस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देंत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>एकमताने</u>**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ९**:—उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रात विविध प्रकारचे मॉडयुल्स इत्यादी कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> या विषयाची माहिती द्यावी.

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :—</u> सीएफसी मध्ये काम केलेले आहे, त्याची माहिती दिलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> काय काम आहे, त्याची माहिती द्या.

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :—</u> स्वीचेस, युपीएस, उपकरणे इत्यादी साहित्याची निविदा होती, काम पुर्ण झालेले आहे

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> कामाबद्दल तुम्ही पुर्ण समाधानी आहात काय?

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :—</u> होय, कामाबद्दल पुर्ण समाधानी आहे

<u>काही सदस्य :—</u> पास, पास

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. ९**:—उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रात विविध प्रकारचे मॉडयुल्स इत्यादी कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

उल्हासनगर महानगरपालिकेतील नागरिक सुविधा केंद्रांत खाली नमुद केलेले काम करणेसाठी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड)नुसार मंजुरी दिली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | कामाचा कालावधी | मंजुर निविदा रक्कम | मंजुरी दिनांक | एजंन्सीचे नांव | कराराचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका येथे विकसित करण्यात आलेल्या नागरी सुविधा केंद्रात विविध प्रकारचे मॉडयुलर स्विचेस, फ्रेमस, सॉकेटस, फोर कोअर केबलस्, विशेष उपकरणे, विविध प्रकारचे एम.सी.बी. विविध प्रकारचे वायरींगस् अर्थिंगस, डि.पी.ज, इलेक्ट्रीक पॅनल बोर्ड इत्यादी प्रकारच्या सामानाचे पुरवठा व उभारणी करणे | करार दिनांक पासुन ३० दिवस | रू. १,८३,९६७/— | निविदा मंजूरीची तारीख २४.१२.२००३ | मे. प्रेम एटंरप्राइझेस बॅ. नं. २०४/ अ रूम नं. ४, बेंवास चौका जवळ उल्हासनगर—४२१००१ | ३.१.२००४ |

तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४२
<u>दिनांकः—९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :— श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :— श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रात विविध प्रकारचे मॉडयुलर स्विचेस, फ्रेमस, सॉकेटस, फोर कोअर इत्यादी कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची

सही/—

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र १० वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १०**:—मा महापौर चषक क्रिकेट स्पर्धेकामी अंदाजित रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे

मा सदस्या श्रीमती किरण माने :— गोषवा—यानुसार ४० संघ आलेले आहेत एका संघाकडुन रु २०० घेण्यात आलेले आहेत तर त्यानुसार एकुण रु ८८,००० महापालिकेत जमा होणे आवश्यक होते, तर ते जमा झालेले आहेत काय?

श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :— लेखा विभागात जमा झाले आहेत काय?

मुख्य लेखा अधिकारी :— बघावे लागेल

मा सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे :— बघावे लागेल म्हणजे काय? तुम्ही काय करता?

मा सदस्या श्रीमती किरण माने :— नियमाप्रमाणे ३ दिवसांच्या आत रक्कम जमा करायला हवी

मा सदस्य श्री विनोद तलरेजा :— रक्कम जमा केलेली नसल्यास ते चुकीचे आहे मुख्य लेखा अधिकारी आपण संबधितांनी रक्कम जमा केलेली आहे अथवा नाही याची खातरजमा करुन आम्हाला १० मिनीटांच्या आत माहिती द्यावी

मा सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :— तोपर्यंत सदरचा विषय संमत केला जावु नये

मा सदस्य श्री विनोद तलरेजा :— ठिक आहे

मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :— सदरचा विषय पुढे ढकलुन इतर विषय अग्रक्रमाने घेण्यात यावेत
मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र ११ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ११**:—श्री मोहन रामख्यानी, माजी सभापती, प्रभाग समिती क्र २ यांना दि १६/८/२००१ ते १८/३/२००२ या कालावधीचा वाहन भत्ता मंजुर करणे

मा सदस्य श्री रामदास उमाप :— यावर मला बोलायचे आहे, याबद्दलचा स्थायी समिती ठराव १९९७ मध्ये झाला होता त्यानंतर महासभेचा ठराव झाला, त्यामध्ये अटी व शर्ती स्पष्टपणे दिलेल्या होत्या गोषवा—यात लिहिले आहे स्थायी समिती ठराव क्र ६, दि ३०/४/९७ व महासभा ठराव क्र २१, दि १२/१२/०१ त्यामध्ये स्पष्टपणे दिलेले आहे तर असे असताना हा विषय परत परत का आणण्यात येतो?

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> तो सभापती नियुक्ती संबधीचा ठराव आहे.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :—</u> सभापतींनी गाडी वापरलेली आहे, परंतु गाडी त्यांच्या नांवे नव्हती. ठरावा प्रमाणे त्यांना भत्ता देता येत नाही. परंतु त्यांनी गाडी वापरलेली असल्याने भत्ता देणे आवश्यक आहे. ठरावातील अट शिथील करण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> हा प्रस्ताव पुन्हा पुन्हा का आणण्यात येतो? एकदा ठराव मंजुर करुन दिला आहे. त्यामध्ये स्पष्ट दिलेले आहे. हे सगळे पाहणे प्रशासनाचे काम आहे. स्थायी समितीमध्ये विषय आणुन आमच्या कडुन वदवुन घ्यायचे यासाठीच हा प्रस्ताव आणण्यात येतो. आम्ही ज्यावेळेला भत्ता मागितला त्यावेळी सांगितले की, आपल्याकडे कार नाही. त्यावेळेला सदस्यांना त्रास देण्यात आला. आम्ही अगोदरच्या ठरावात स्पष्टपणे अटी दिलेल्या असताना स्थायी समितीत हा प्रस्ताव आणण्याचा काहीच मुद्दा नाही. काही गोष्टी ज्या प्रशासनाला करता येत नाहीत त्या स्थायी समितीत आणुन तुम्ही आम्हाला करायला लावता.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :—</u> या अगोदर तसा प्रस्ताव तुम्ही पास केलेला आहे. म्हणुन तसा प्रस्ताव आणलेला आहे. तुम्ही ठराव तसा पारीत करुन दिल्यास परत असा प्रस्ताव येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> मग तुम्ही अगोदरच तसा प्रस्ताव का आणला नाही?

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> ठराव क्रमांक ६ मध्ये अशी अट होती की, ज्या दिवसापासुन सदस्य गाडी घेईल त्या दिवसापासुन त्यांना भत्ता देण्यात येईल. आता त्यावेळेस गाडी त्यांच्या नांवे नव्हती. परंतु त्यांनी गाडी वापरलेली आहे. ठरावाप्रमाणे त्यांना भत्ता देता येत नाही, परंतु त्यांनी वाहन वापरलेले आहे. म्हणुन अट शिथील करण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> यापूर्वी मागील बैठकीमध्ये प्रभारी आयुक्त श्री सोनवणे यांनी अशाच विषयावर स्पष्टीकरण देताना सांगितले होते की, सभापतींकडे गाडी नसली तरी त्यांनी गाडीचा वापर केलेला असल्याने त्यांना वाहन भत्ता देणे आवश्यक आहे. त्यावेळेस आम्ही सदर प्रस्तावाला मंजुरी दिलेली होती. तर एकदा मंजुरी दिल्यानंतर आता पुन्हा पुन्हा असा विषय आमच्यासमोर का आणला जातो?

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—</u> सदरच्या ठरावातील अट शिथील करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. तसेच जे सदस्य अर्ज करतील फक्त त्यांनाचा विशेष बाब म्हणुन सदरचा लाभ देता येतो. जर सर्व सदस्यांना सरसकट तसा लाभ द्यावयाचा असेल तर पुर्वीच्या ठरावात अंशतः दुरुस्ती करावी लागेल.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> आमचा भत्ता देण्यासाठी विरोध नाही. परंतु यासाठी एक धोरण ठरवायला हवे. एखाद्याला मंजुर करणे व एखाद्याला नामंजुर करणे हे योग्य नाही. यामुळे आम्ही दुविधेत पडतो. आम्ही शिकलेलो नाही त्यामुळे यावर कायदेशिर दृष्टया अभिप्राय आपण देणे आवश्यक आहे की, हे योग्य आहे अथवा नाही?

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u> मी एका बाबीकडे लक्ष वेधु इच्छिते की, गेल्या काही दिवसांपासुन काही वृत्तपत्रांमध्ये बातम्या येत आहेत की, शासनाने केल्या लेखा परिक्षणामध्ये सभापतींना दिल्या जाणा—या वाहन भत्त्यावर आक्षेप घेतलेला आहे. सदरचा भत्ता त्यांच्याकडुन वसुल करण्यात येणार आहे. तर असे असताना असा विषय स्थायी समितीत आणणे योग्य आहे काय?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :—</u> महासभेने यापूर्वी वाहन भत्ता देण्यासाठी मान्यता दिली होती, त्यानंतर सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (अ) अन्वये मान्यतेसाठी शासनाला पाठविणे आवश्यक होता. परंतु त्यावेळी तसे करण्यात आलेले नव्हते. आता आम्ही सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी शासनाकडे पाठविलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> माझी अशी विनंती आहे की, याबाबत सविस्तर सुधारित प्रस्ताव पुढील स्थायी समितीत आणला जावा, भत्ता मिळण्यास एक—दोन महिने उशिर झाला तर त्याने काही फरक पडत नाही. आम्हाला काही प्रस्तावांना मान्यता द्यावी असे वाटते परंतु काही प्रस्ताव तांत्रिक दृष्टया परिपुर्ण नसल्याने आम्हाला त्याला मान्यता द्यावी असे वाटत नाही. त्यामुळे सदर प्रस्तावामध्ये दुरुस्ती करुन आजच्या सभेत हा प्रस्ताव पारित न करता हा विषय रहित करावा.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :—</u> माझे म्हणणे असे आहे की, आता हा विषय पास केला जावा व पुढील स्थायी समितीच्या बैठकीत प्रशासनाकडुन ठरावात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव आणण्यात यावा. त्यामुळे आता हा विषय पास करण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :—</u> आता ठराव करताना त्यातच तसा उल्लेख करुन ठराव पास केला जावा.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :—</u> असे करता येणार नाही. ठराव नियमीत विषय पत्रिकेवर यायला हवा. त्यानंतरच असे करता येईल.

<u>मा. सभापती :—</u> या आधी अशा प्रकारचे प्रस्ताव पास करण्यात आलेले असल्याने हा विषय पास करण्यास काही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :—</u> मा. आयुक्त साहेब आता हा *प्रस्ताव पास करण्यास काही अडचण आहे का?*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u> नाही, तुम्ही प्रस्ताव पास करु शकता.*

*<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> यापूर्वी श्री गणेश चौधरी, श्री नरेंद राजानी यांनाही अशाचप्रकारे भत्ते पास केले होते. ही पध्दत तर शिवसेना भाजपाच्या वेळेपासुन चालु आहे.*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u> या अगोदर अशाप्रकारे भत्ते देण्यात आलेले आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> भत्ता देण्यास काही आपत्ती आहे का?*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u> नाही.*

*<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> ही भत्ते देण्याची पध्दत तत्त्कालीन आयुक्त श्री शुळ यांच्या वेळेपासुन सुरु झाली होती. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, मी शासनाकडुन याची मान्यता घेवुन येईन. शासनाने मंजुरी न दिल्यास मी स्वत: माझ्या पगारातुन सदरची रक्कम देईन. तेव्हा त्यांनी विश्वासाने आम्हाला असे सांगितले होते.*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u> सर्वांना भत्ता मिळणेसाठी सुधारित प्रस्ताव आम्ही पुढच्या बैठकीत आणु.*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने</u> :- आयुक्त जबाबदारी घेत असतील तर प्रस्ताव पास करण्यास आमची काही एक हरकत नाही.*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u> आम्ही नंतर सुधारित प्रस्ताव आणु.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप</u> :- असे प्रस्ताव आणताना प्रशासन काळजी घेत नाही. आमच्या गळयात टाकतात. मागील स्थायी समितीने पास केले म्हणुन पुढेही तसेच करणे आवश्यक नाही.*

*<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> तसेच मी असेही निदर्शनास आणु इच्छितो की, आजच्या या विषयपत्रिकेत जे विषय आणलेले आहेत तर त्यातील भत्तयाचा जो*

*एक विषय आहे तो भत्ता आचारसंहितेच्या कालावधीतील आहे. तर सचिव साहेब सांगावे की, तो कोणाचा आहे.*

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> ती माहिती संबधित विभाग आपणांस देईल.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> श्री मोहन रामरख्यानी यांनी आचारसंहितेच्या कालावधीतील भत्त्याची मागणी केलेली आहे.*

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> त्यांना भत्ता अदा करताना आचार संहितेचा कालावधी वगळुन भत्ता अदा करण्यात येईल.*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> आपण सदरची माहिती आमच्या निदर्शनास आणल्याबददल आम्ही आपणांस धन्यवाद देतो.*

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> आपण आमचे डोळे उघडलेत त्यासाठी धन्यवाद.*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ११:-श्री मोहन रामख्यानी, माजी सभापती, प्रभाग समिती क् २ यांना दि १६/८/२००१ ते १८/३/२००२ या कालावधीचा वाहन भत्ता मंजुर करणे

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २९ (अ) मधील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्रमांक ३, दि. २१/४/२००१ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेकरीता एकूण ४ प्रभाग समित्यांची स्थापना करणेस मान्यता दिलेली होती.

तद्नंतर प्रभाग समिती क्र. २ ची दिनांक १३/८/२००१ रोजी सभा होऊन त्यामध्ये प्रभाग समिती क्र. २ ठराव क्र. १, दि. १३/८/२००१ अन्वये श्री. मोहन रामरख्यानी यांची सभापती म्हणून निवड झालेली होती.

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ६, दि. ३०/४/१९९७ अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांचे कार्यकालावधीमध्ये चार चाकी वाहन देण्याऐवजी प्रति माहे रुपये १५,०००/- वाहन भत्ता देणेबाबत मान्यता दिलेली आहे.

महासभा ठराव क्रमांक २१, दि. १२/१२/२००१ अन्वये प्रभाग समिती सभापती यांना प्रतिमाह रुपये १५,०००/- वाहन भत्ता स्थायी समिती ठराव क्रमांक ६, दि. ३०/४/१९९७ मधील मंजुर अटी व शर्तीनुसार अदा करणेस मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्रमांक ६, दि. ३०/४/१९९७ मधील अटी व शर्तीनुसार संबंधितांकडे वाहन नसेल तर असे वाहन ज्या दिवशी खरेदी केले जाईल त्या दिवसापासून वाहन भत्ता मिळणेस संबंधित पात्र राहतील.

उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. मोहन रामरख्यानी, यांचे वापरात असलेले वाहन क्रमांक एमएच-०५ एच-६२३७ हे वाहन त्यांचे एकत्र कुटूंबियातील त्यांचा मुलगा श्री. दिलीप रामरख्यानी यांचे नावावर नोंदवलेले आहे. परंतु, ते सर्व कुटूंब सदस्य एकत्र राहत आहेत. तद्नंतर दि. १९/३/२००२ ते ४/४/२००२ या कालावधीसाठी वाहन भत्ता मिळालेला आहे.

तात्कालीन प्रभाग समिती सभापती श्री. प्रमोद टाले यांना त्यांचे वाहन उशिरा नावावर झाल्यानंतरही त्यांना सभापती पदी नियुक्ती झालेल्या दिवसापासून स्थायी समिती ठराव क्र. १२९, दि. ३१/३/२००३ अन्वये वाहनभत्ता विशेष बाब म्हणून अदा करण्यात आलेला आहे.

श्री. मोहन (गाडो) रामरख्यानी माजी सभापती प्रभाग समिती क्र. २ यांनी श्री. प्रमोद टाले यांच्याप्रमाणे वाहनभत्ता त्यांना मिळावा यासाठी त्यांनी विनंती अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्यात त्यांनी दि. १६/८/२००१ ते दि. १८/३/२००२ या कालावधीसाठी वाहनभत्ता मिळण्याची मागणी केलेली आहे.

सबब, सदर बाब मान्यतेसाठी मा. स्थायी समिती व महासभेकडे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४३ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०.४.१९९७ च्या धर्तीवर अटी व शर्तीमध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्री. मोहन रामरख्यानी, माजी सभापती, प्रभाग समिती क्र २ यांना आचार संहितेतील कालावधी वगळता दि. १६/८/२००१ ते १८/३/२००२ या कालावधीचा त्यांना अनुज्ञेय असलेला वाहन भत्ता अदा करणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र १२ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १२:-श्री श्याम रोहरा, सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती यांना दि ८/१०/२००३ ते १९/१०/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता मंजुर करणे.

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *कायदेशिर दृष्टया काही अडचण तर नाही ना?*

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-*** *कायदेशिर आहे अथवा नाही हे जेव्हा ठराव पारित केला तेव्हा पहायला हवे होते. आता जे काही चालु आहे ते त्या ठरावाच्या आधारेच चालु आहे. तसेच मी माझे कायदेशिर मत संबधित संचिकेत नोंदविलेले आहे.*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. १२:-श्री श्याम रोहरा, सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती यांना दि ८/१०/२००३ ते १९/१०/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता

मंजुर करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. ८० , दिनांक २९-९-२००३ नुसार सार्वजनिक बांधकाम समिती या विशेष समितीची रचना करणेत आलेली आहे. या समितीच्या प्रथम सभेत दिनांक ८-१०-२००३ रोजी श्री. श्याम (मेजर) रोहरा यांची सभापती पदी निवड झालेली आहे व त्यांनी पदभार स्विकारलेला आहे.

स्थायी ठराव क्र. ६, दिनांक ३०-४-१९९७ नुसार सर्व विशेष समिती सभापती यांना महापालिका प्रशासनातर्फे चारचाकी वाहन देण्याऐवजी प्रति महिना रुपये १५०००/- वाहन भत्ता देण्यास मान्यता दिलेली आहे. सदर ठरावातीलअटी नियमानुसार त्यांना ज्या दिवशी वाहन खरेदी करतात त्या दिवसापासून श्री. श्याम (मेजर) रोहरा यांना वाहनभत्ता अदा करण्यात आलेला आहे.

आता श्री. शाम (मेजर) रोहरा यांनी आपणांस सभापती पदी निवड दिनांक ८/१०/२००३ पासून दिनांक १९/१०/२००३ या कालावधीचा पण वाहन भत्ता देण्यात यावा असा अर्ज दाखल केलेला आहे.

यापूर्वी श्री. प्रमोद टाले माजी सभापती यांना अशा स्थितीत वाहन भत्ता अदा करण्यात आलेला असून श्री. श्याम (मेजर) रोहरा यांची बाब मा. मुख्य लेखा अधिकारी, मा. मुख्य लेखा परिक्षक आणि मा. आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्यास सुचीत केलेले आहे. सबब सदर प्रकरण मान्यतेसाठी स्थायी समिती सभेपूढे सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४४ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६, दि. ३०.४.१९९७च्या धर्तीवर अटी व शर्तीमध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्री. श्याम रोहडा यांनी सार्वजनिक बांधकाम समिती सभापती पद धारण केल्यामुळे दि. ८/१०/२००३ ते १९/१०/२००३ या कालावधीचा त्यांना अनुज्ञेय असलेला वाहन भत्ता अदा करणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र १३ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. १३:-सिवर लाईन क्लिनींग मशीन वाहन आणि सक्शन युनिट मशीन वाहन यास ऑपरेटर कम ड्रायव्हर, क्लीनर पुरविणे व हायड्रॉलिक, देखभाल व दुरुस्ती करणारे मे के के हायड्रॉलिक्स या कार्यरत ठेकेदाराशी केलेल्या संविदेस एक वर्षाची मुदतवाढ देणे

***काही सदस्य :- पास, पास . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. १३:-सिवर लाईन क्लिनींग मशीन वाहन आणि सक्शन युनिट मशीन वाहन यास ऑपरेटर कम ड्रायव्हर, क्लीनर पुरविणे व हायड्रॉलिक, देखभाल व दुरुस्ती करणारे मे के के हायड्रॉलिक्स या कार्यरत ठेकेदाराशी केलेल्या संविदेस एक वर्षाची मुदतवाढ देणे

महानगरपालिका सिवर लाईन क्लीनिंग मशीन वाहन आणि सक्शन युनीट मशीन वाहन यांची गेली ४-५ वर्षे उपरोक्त विषयात नमूद केल्याप्रमाणे मे. के.के. हैड्रोलिक, मुंबई २७ या कंपनी मार्फत कामे करुन घेतली जात आहेत.

सदर कंपनी पुर्वी झालेल्या करारानुसार अनुक्रमे रुपये ९०००/-, रुपये ७०००/- प्रती महिना दर आकारत आहे. हा दर एक वर्ष कालावधीसाठी आहे.

सदर रक्कमेत कंपनीचा मेकॅनीक हेल्पर येवून प्रत्यक्ष साईटवर मशीन वाहनांची तपासणी करुन हैड्रोलिक मेंटेनन्स दर आठवडयास करीत आहे व वाहनांची कोणतीही तक्रार वेळोवेळी दर करीत असतात या कामाचा १ वर्षाचा कालावधी संपलेला आहे.

सदर कंपनीने पुर्वीच्या करारानुसार कामात आणि नियम अटीमध्ये व रक्कमेत वाढ न करता देखभाल दुरुस्ती पुढे सुरु ठेवण्यास तयार असल्याचे दि. ५/११/२००३ रोजी लेंखी कळविलेले आहे.

उपरोक्त परिस्थिती कामाची आवश्यकता आणि कंपनीची पुर्वीच्याच दरांप्रमाणे काम करण्याची तयीरी इत्यादी गोष्टीचा विचार करता त्यांना अजून या कामाची एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यास हरकत नाही. सबब सदर बाब प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सविनय सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४५ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिका सिवर लाईन क्लिनींग मशीन वाहन आणि सक्शन युनिट मशीन वाहन वापरणे प्रयोजनार्थ ऑपरेटर कम ड्रायव्हर आणि क्लीनर पुरविणे , हायड्रॉलिक देखभाल व दुरुस्तीकामी प्रशासनाने सद्या कार्यरत असलेल्या मेसर्स के के हायड्रॉलिक्स या कंत्राटदाराशी पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर निविदाशिवाय केलेल्या मुदतवाढीच्या थेट संविदेस कायम करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र १४ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १४:-श्रीमती किरण माखीजा, सभापती, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती यांना दि १४/१०/२००३ ते ६/११/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता मंजुर करणे

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *किती महिन्यांचा भत्ता आहे?*

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *एक-दिड महिन्याचा आहे.*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. १४:-श्रीमती किरण माखीजा, सभापती, क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती यांना दि १४/१०/२००३ ते ६/११/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता मंजुर करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती ठराव क्र. ६, दिनांक ३०-४-१९९७ अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांचे कार्यकालावधी चार चाकी वाहन ऐवजी प्रती माह रुपये १५०००/- वाहन भत्ता देणेबाबत मान्यता दिलेली आहे. सदर ठरावातील अटी नियमानुसार त्यांना ज्या दिवशी वाहन खेरीदी करतात त्या दिवसापासून सौ. किरण लखी माखिजा यांना वाहन भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

महापालिका महासभा ठराव क्र. ८० , दिनांक २९-९-२००३ नुसार क्रिडा समाज कल्याण समिती या विशेष समितीची रचना करणेत आलेली आहे. या समितीच्या प्रथम सभेत दिनांक १४-१०-२००३ रोजी सौ. किरण लखी माखिजा यांची सभापती पदी निवड झालेली आहे व त्यांनी पदभार स्विकारलेला आहे.

आता सौ. किरण लखी माखिजा यांनी आपणांस सभापती पदी निवड दिनांक १४/१०/२००३ पासून दिनांक ६/१०/२००३ या कालावधीचा पण वाहन भत्ता देण्यात यावा असा अर्ज दाखल केलेला आहे.

यापूर्वी श्री. प्रमोद टाले माजी सभापती यांना अशा स्थितीत वाहन भत्ता अदा करण्यात आलेला असून सौ. किरण लखी माखिजा यांनी वाहनभत्ता देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समिती सभेपूढे सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४६ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६, दि. ३०.४.१९९७च्या धर्तीवर अटी व शर्तीमध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्रीमती. किरण माखीजा, यांनी क्रिडा,, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती सभापती पद धारण केल्यामुळे दि १४/१०/२००३ ते ६/११/२००३ या कालावधीचा त्यांना अनुज्ञेय असलेला वाहन भत्ता अदा करणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u>*** *विषय क्र १५वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

***<u>काही सदस्य :-</u>*** *पास, पास . . . . .*

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u>*** ***सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2003-2004 च्या निधीतून कामे करणेसाठी निधी . महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 17 मध्ये श्रीराम नगर मध्ये गुणवंत पेतपेढी ते राजू राय होम आणि विनायक इंटरप्रायईज ते राजू चौधरी यांचे घर पर्यत रसता एम-250 ने नाली बांधणे.(नगरसेवक निधी 196) | 199465/- | 9.1.04 | मे कप्लेश्वर म. का. सासो. |
| 2 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 25 मध्ये बॅ नं 945 ते माया लॉन्ड्री पर्यत एम-250 रोड व नाली बनविणे (नगरसेवक निधी 415) | 199980/- | 9.1.04 | मे. श्रीगंगा म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-4 येथे रामेश्वरी कॉम्पलेक्स जुने पी डब्ल्यु डी ऑफिस समोर बगीचा विकसित करणे (प्रभाग समिती निधी 441) | 199951/- | 9.1.04 | मे कप्लेश्वर म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 10 मध्ये विर तानाजी नगर मधील सरदार पाडयामध्ये बाजाजी किराणा स्टोर पासून अर्जून सिंग यांच्या घरापर्यत सी सी पायवाटा बांधणे. (नगरसेवक निधी 556) | 199900/- | 9.1.04 | मे हरे क्रिष्णा म. का. सोसा |
| 5 | उल्हासनगर-3 येीील ज्योती प्रेस ते मारवाडी हाऊस, प्रेस बाजार येथ प्रभाग क्र. 7 येथे रोड बनविणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत (नगरसेवक निधी 606) | 199540/- | 9.1.04 | मे जनसेवा म. का. सोसा |
| 6 | उल्हासनगर-3 येथील रॉयल मॅरैज हॉल जवह प्रभाग क्र.7 येथे रोड बनविणे(नगरसेवक निधी 607) | 199500/- | 9.1.04 | मे गांवदेवी म. का. |

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| | | | | सोसा. |
| 7 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 15 मधील गजानननगर येथे राव यांचे घर ते ट्रान्सफार्मर पर्यत रस्ता एम-250 ने आणि नाली बांधणे.(महापौर निधी 633) | 199465/- | 9.1.04 | मे जय झुलेलाल म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर-4 येथील संतोषनगर व मलेरिया ऑफिस मागे प्रभाग क्र. 17 येथे एम-250 ग्रेड व (गटार) बांधण्याबाबत. (नगरसेवक निधी 635) | 199340/- | 9.1.04 | मे कप्लेश्वर म. का. सोसा. |
| 9 | उल्हासनगर-4येथील गणेशनगर येथील गायकवाड यांचेघर ते मुख्यनाल्यापर्यत रस्ता एम-250 ने आणि नाली बांधणे(नगरसेवक निधी 637) | 199540/- | 9.1.04 | मे कप्लेश्वर म. का. सोसा. |
| 10 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 मध्येहिललाईन पोलीस स्टेशनच्या मागे जोधी यांच्या घरापासून सुरेश खाडीलकर यांच्या घरापर्यत पंढरीनाथ काकडे यांच्या घरापासून महालक्ष्मी मंदिरापर्यत सी सी रोड व नाली बनविणे. (नगरसेवक निधी 654) | 101700/- | 9.1.04 | मेओम साईबाबा म. का.सोसा. |
| 11 | उल्हासनगर-3 येथील सपना गार्डन येथे पूल कल्व्हर्ट व किरकोळ काम करणेबाबत.(नगरसेवक निधी 663) | 399900/- | 9.1.04 | मे जनसेवा म.का. सोसा. |
| 12 | उल्हासनगर-1 येथील बॅ नं 66,67 तोमर हॉस्पिटल मागे बॅ नं 68जवळ सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी 666) | 199960/- | 9.1.04 | मे गांवदेवी म.का. सोसा. |
| 13 | उल्हासनगर-2,शास्त्री नगर मध्ये यसूच्या घरापासून रामवृक्ष यादव, मास्टरच्या घरापासुन ते आरस चे घर व श्रीवास्तव यांच्या घराच्या मागे 250 सी सी व पायवाटा बनविणे व नाली बनविणे. नगरसेवक निधी 685) | 199900/- | 9.1.04 | मे मुंब्रादेवी म.का.सोसा. |
| 14 | उल्हासनगर-5 येथील बॅ नं 1993 व 2003 व हनुमान गल्ली येथे सिमेंट कॉक्रिट 250 ने पॅसेजकरणे (नगरसेवक निधी 697) | 200000/- | 9.1.04 | मे धनलक्ष्मीक. का. सोसा. |
| 15 | उल्हासनगर-5येथील बॅनं 1969,1972 येथे एम-250 मध्ये सिमेंट कॉक्रिट पायवाटा बनविणे (नगरसेवक निधी 698) | 199800/- | 9.1.04 | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| 16 | उल्हासनगर-5 येथील पॅ नं 11 आकाश चाळ क्र. 1 येथे साकव बाधणे व चाळनं 13 मध्ये डांबरीकरण करणे (नगरसेवक निधी 699) | 200000/- | 9.1.04 | मे शिव म. का. सोसा. |
| 17 | उल्हासनगर सुभाषनगर तपन्ना हाऊस भैयालीपाडा लालजी हाऊस केरला गल्ली येथे सी सी पायवाटा व नाली बांधणे (गलिच्छ वस्ती निधी 713) | 114700/- | 9.1.04 | मे लक्ष्मीक्रिपा म.का.सोसा. |

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 18 | उल्हासनगर-3 येथील सुभाषनगर येथील रस्त्याचे बी एस एन एल विभागाने खोदलेले खडडे भरणे. (महापालिका निधी 746) | 166060/ | 9.1.04 | मे अल्का म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४७ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री इश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वरील १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र १६ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १६:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

***मा. सदस्य श्री नारायण पंजाबी:-*** *मी एक बाब निदर्शनास आणु इच्छितो. यामध्ये अनुक्रमांक ५ वर जे काम दाखविले आहे तर त्याची पुनरावृत्ती झालेली आहे. विषय कमांक १७ मध्ये अनुकमांक ११ वर देखील तेच काम दर्शविलेले आहे. एका कामाची दोन दोन प्राकलने केलेली आहेत. तसेच अजुन एका विषयामध्ये देखील प्रिया अपार्टमेंट ते महापालिका चौक असे काम दर्शविले आहे. तर हे देखिल चुकीचे आहे, कारण प्रिया अपार्टमेंट व महापालिका चौक हे एकच ठिकाण आहे.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *यावरुन प्रशासन किती जागृत आहे ते दिसते. अशा प्रकारच्या ब-याच चुका होत असतात, प्रशासनाने याकडे लक्ष द्यायला हवे,*

*सार्वजनिक बांधकाम विभागात पण असेच होत असेल. एका कामाचे दोन दोन वेळा भुगतान होत असेल.*

*__मा. सभापती :-__ कदाचित तसे चुकीने झाले असेल.*

*__मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-__ मा. महोदया आपण पहा यामध्ये कामाचे नांव, दिनांक, रक्कम व सोसायटीचे नांव सर्व एकच आहे. त्यात काही एक फरक नाही.*

*__मा. सदस्य श्री रामदास उमाप :-__ आता आम्ही काळजीपूर्वक लक्ष देवु. आमच्याकडे असे २-२ मुददे आहेत . आता तुम्ही आम्हाला सांगाल की, हा मुद्रणदोष आहे.*

*__मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-__ हा विषय पाणी पुरवठा विभागाशी संबधित असुन श्री जवादे हे काम पाहतात. आज ते या बैठकीस उपस्थित नाहीत. मी सांगु इच्छितो की, जेव्हा देखील स्थायी समितीची बैठक असते तेव्हा ते जाणुनबुजून बैठकीस अनुपस्थित राहतात.*

*__श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-__ आज ते प्रशिक्षणासाठी बाहेर गेलेले आहेत.*

*__मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-__ नेहमी अशा प्रकारची उत्तरे दिली जातात.*

*__मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-__ मागच्या बैठकीत हरद्वार अपार्टमेंट येथील रस्त्याच्या कामाबाबतही असेच सांगितले होते की, चौकशी करुन उत्तर देवु पण पुढे काय झाले ते कळालेच नाही.*
*__मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-__ सदरचा विषय माहितीसाठी असल्याने तो पास करावा लागेल व प्रशासनाला या मुददयावर चौकशी करुन नंतर माहिती द्यावी लागेल.*

*__मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-__ प्रिया अपार्टमेंट ते महापालिका चौक या कामाबददल मी सांगु इच्छितो की, या प्रभागाचा मी नगरसेवक आहे, तेथे असे कोणतेही काम झालेले नाही.*

*__मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-__ याची चौकशी करा.*

*__मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-__ सदरची कामे वगळण्यात यावीत.*

*__श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-__ विषय क्रमांक १७ मधील अनुक्रमांक १ व ११ ही दोन कामे वगळुन इतर कामे पास करण्यात यावीत.*

*__मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-__ सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. १६:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभपती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र | *कामाचे नाव* | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | शहरातील विविध ठिकाणी असणा-या विंधन विहीरीवरील नादुरूस्त हात पंप यांची देखभाल व दूरूस्ती करणे | १२४५८७ | १५.१२.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का.सह. सं.लि. |
| २ | टावरे अपा. ते बॅ नं ११९८ शांती नगर येथे ६५ मि.मि. व्यासाची जी आय पाईप लाईप टाकणे | ३३७०४ | १५.१२.०३ | आशा मजूर म. का.सह.सं.लि |
| ३ | उल्हासनगर १ येथील राजीव गांधी नगर येथे ८० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे | ५२८५० | ०९.१२.०३ | शंकर महादेव मजूर म.का.सह. सं.लि.. |
| ४ | उल्हासनगर ३ येथील दसरा मैदान येथे २०० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे | ६५५०० | ०९.१२.०३ | शंकर महादेव मजूर म.का.सह. सं.लि. |
| ५ | उल्हासनगर १ ते ५ येथे आर.सी.सी. झाकणे भूयारी गटार योजनेसाठी पुरविणे | २१००२५ | ०४.१२.०३ | शिव मजूर म.का. सह.सं.लि. |
| ६ | वडोळ गावठाण ते आशिर्वाद सोसायटी,उल्हासनगर ३ येथे ८० मि.मि.व्यासाची जल आय जलवाहिनी टाकणे | ५३३३३ | १५.१२.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का.सह. सं.लि. |
| ७ | उल्हासनगर ३ येथे भुयारी गटारासाठी एस.डब्लू पाईप टाकणे व इंस्पेक्शन चेंबर बांधणे | ८०००० | १०.१२.०३ | गुरूदेव मजूर म. का.सह.सं.लि |
| ८ | उल्हासनगर ३,येथे पंचवटी स्टील वर्क ते राजीव गांधी चौक ते १५० मि.मि.व्यासाची लोखंडी पाईप टाकणे | २९२८६५ | ०६.११.०३ | स्वराज्य मजूर म. का.सह.सं.लि |
| ९ | मुख्य रस्ता अंबरनाथ ते बॅ नं १८१८ पर्यत ८० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे | १४९७२० | २३.१०.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का.सह. सं.लि. |
| १० | उल्हासनगर १ येथे बॅ नं २३१ ते २३३ पर्यत ८० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे | ६२५०० | ०९.१०.०३ | गुरूनानक मजूर म.का.सह.सं.लि. |
| ११ | डल्हासनगर ५ येथ योगेश कॉलनी येथे शिवाजी चाळ करिता ८०/५० मि.मि.व्यासाची जल आय जलवाहिनी टाकणे | १७२५०० | २२.१०.०३ | हरे कृष्ण मजूर म.का.सह.सं.लि. |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४८ दिनांकः-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री नरेंद्र कुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र १७ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. १७:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

***<u>काही सदस्य :-</u> पास, पास .....***

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव अ क्र १ व ११ वरील बाब वगळुन सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. १७:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभपती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र | *कामाचे नाव* | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | प्रिया अपा. ते महानगरपालिका कार्यालय चौक पर्यत १०० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ६२७०० | ०२.०८.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |
| २ | उल्हासनगर ४ येथे इंदिरा नगर,भिम कॉलनी,शिव शक्ती कॉलनी येथे ८० व ६५ मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणे | १८१५७० | ०७.०४.०३ | जय शिवराय मजूर म.का. सह.सं.लि |
| ३ | उल्हासनगर ४ येथे रोमा अपा. ते बॅ नं १२८५ पर्यत ८० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १००००० | ०३.०७.०३ | जय शिवराय मजूर म.का. सह.सं.लि.. |
| ४ | पटेल नगर येथे ३००र३०० मि.मि.व्यासाची क्रास कनेक्शन करणे | ८५८९० | ०६.०८.०३ | बजरंगबली मजूर म.का. सह.सं.लि. |
| ५ | उल्हासनगर ५ साईबाबा मंदिराजवळ,दसरा मैदान उंच टाकीपासून सेक्शन ३९ पर्यत १०० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणे | ३९२१०० | २९.०८.०३ | अनंत मजूर म.का.सह.सं. लि. |
| ६ | उल्हासनगर ३ शिव मंदीर जवळ येथे बॅ नं ७४० बॅ नं. ७१२ पर्यत ८० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ४७६७१ | ०१.०९.०३ | सुर्यज्योत मजूर म.का. सह.सं.लि. |
| ७ | मानेरे गाव रस्ता ते गोपी कॉलनी पर्यत ५० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे | ८१४४६ | ०५.०९.०३ | आदर्श मजूर म.का.सह.सं. लि |
| ८ | उल्हासनगर ३ येथे राधास्वामी अपा. ते बॅ नं ११०१,११०२ रजई अपा.,ओ.टी.येथे ८० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहीनी टाकणे | ८३५२७ | ०५.०९.०३ | प्रभात मजूर म.का.सह.सं. लि |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | एस.ई.एस.आय.हाईस्कूल भागासाठी पोलीस लाईन उल्हासनगर १ येथून १५० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणे | ३८२५९१ | २३.०९.०३ | स्वराज्य मजूर म.का.सह.सं. लि. |
| १० | बॅ नं४९१ ते ४९२ शांती सत्या अपा. येथे ५० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. | २७३२५ | २९.०७.०३ | प्रभात मजूर म.का.सह.सं. लि. |
| ११ | उल्हासगनर १ते ५ येथे आर.सी.सी. झाकणे भूयारी गटार योजनेसाठी पुरविणे | २१००२५ | ०४.१२.०३ | शिव मजूर म.का.सह.सं. लि. |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४९ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अ.क्र. १ व ११ वरील कामे वगळता उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत पुढील ९ कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र १८ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. १८:-उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजने अंतर्गत देखभाल व दुरुस्तीकामी मे संध्या कन्सट्रक्शन यांचेशी प्रशासनाने केलेल्या संविदेस मुदतवाढ देणे

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- हा विषय दोन वेळा कसा काय आला? याच्यापूर्वीही आला होता.*

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- दोन्ही वेगवेगळे विषय आहेत. पहिला विषय निविदेचा होता आताचा विषय मुदतवाढीचा आहे.*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- किती महिने वाढविलेत?*

*उप अभियंता (श्री सेलवन) :- ३ महिने मुदत वाढविलेली आहे.*

***मा. सदस्य श्री रामदास उमापः-*** *त्यानंतर परत पुढे चालु ठेवणार का?*

***मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-*** *यानंतर पुन्हा मुदतवाढ देवु नका, नव्याने निविदा काढण्यात याव्यात.*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. १८:-उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजने अंतर्गत देखभाल व दुरुस्तीकामी मे संध्या कन्सट्रक्शन यांचेशी प्रशासनाने केलेल्या संविदेस मुदतवाढ देणे

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भूयारी गटार योजनेची देखभाला करिता स्थायी समिती ठराव क ५० दि. ०३.१०.०२ नुसार रू १८०२७४९/- मात्र मान्यता देण्यात आल्याने महानगरपालिकेचे पत्र क्रैक्ध२३११ दि.१७.१०.०२ नुसार ठेकेदार मेसर्स संध्या कंस्ट्रक्शन यांना देण्यात आले होते.तथापि सदरहू काम करण्याचा कालावधी दिनांक १६.१०.०३ रोजी समाप्त झाला आहे.

तरी सदर काम भूयारी गटार योजनेची निगा व दुरूस्ती करणे म्हणजेच रिपेरिंग व जेथे महानगरपालिकेची सिव्हर लाईन मशीन जाऊ शकत नाही तेथील तुंबलेली गटार साफ करणे इत्यादी कामे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने पुढील वर्षा करिता नविन प्राकलन तयार करण्यात येत असून सध्यास्थितीत काम करीत असलेले ठेकेदार मेसर्स संध्या कंस्ट्रक्शन,उल्हासनगर यांना तीन महिन्या पर्यत म्हणजेच १७.१०.०३ ते १६.०१.०४ पूर्वीच्याच करारनामा प्रमाणे नियम अटी व शर्तीच्या नुसार मुदतवाढ मिळावी. सदर तीन महिन्याच्या कालावधीत अंदाजे रू ४.५० लक्ष खर्च होणे अपेक्षित आहेत. त्याकरिता रू ४.५० लक्ष मात्र एवढया किमंतीस प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी स्थायी समिती समोर सादर करण्यात आले होते.

पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी भूयारी गटार योजनेचे देखभाल,दुरूस्तीचे काम करण्यासाठी निविदा मागविणे अत्यंत जरूरीचे असल्याने सदर कामाचे प्राकलन तयार करून दि.२०.१२.०३ रोजी मंजूरी घेण्यात आली. तसेच सदर कामाचा गोषवारा मा.स्थायी समिती पुढे प्रशासकिय व वित्तीय मंजूरी करीता ठेवण्याकरिता सादर करण्यात आले आहे.परंतू अद्याप मा.स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय मंजूर झाला नसून पुढील वर्षाकरिता निविदा काढण्यात आलेल्या नाही. तरी सदर कामास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळाल्या नंतर कमीत कमी २० ते २५ दिवसाच्या कालावधी निविदा काढून काम वितरीत करण्याकरिता लागणार आहे. त्यामुळे सध्या सदर कामा करिता कार्यरत असलेले ठेकेदारास दि.१६.३.०४ पर्यत म्हणजेच एकूण पाच महिने मुदतवाढ मिळावी. सदर पाच महिन्याच्या कालावधीत अंदाजे रू ७.५० लक्ष खर्च होणे अपेक्षित आहे. त्या करिता रू ७.५० लक्ष मात्र एवढया किंमतीस कार्योत्तर प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा हि विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. १५० — दिनांकः-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार देखभाल व दुरुस्तीकामी प्रशासनास मे संध्या कन्सट्रक्शन या सद्या कार्यरत असलेल्या कंत्राटदाराशी पुर्वीच्या करारातील अटी व शर्तीवर दिनांक १७/१०/२००३ ते १६/३/२००४ पर्यंतचे मुदत वाढीचे कालावधीसाठी निविदाशिवाय केलेल्या थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्च रुपये ७.५० लाख यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र १९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १९:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत ब्रम्हीबाई आंबेडकर नगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे सन इंजिनीअरींग या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- हे जे काम आहे, ते कोणत्त्या निधीतुन करणार आहात? महापालिका निधीतुन, शासनाच्या योजनेतुन अथवा कसे करणार याची माहिती द्या.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती किरण माने :- याची माहिती द्यावी.

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- या कामांसाठी पैसे कोठुन येणार? पाटील साहेब याचे उत्तर द्यावे. पुर्ण पैसे शासन देणार की, काही टक्के निधी मिळणार आहे? याचे उत्तर द्यावे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- माझ्या माहितीप्रमाणे ८० टक्के निधी शासनाकडुन मिळणार आहे.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :- या निधीतुन फक्त पाणी पुरवठ्याचीच कामे करणार की इतर कामे देखिल करणार आहात?

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- झोपडपट्टी विभागातच करणार आहेत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- याची सविस्तर माहिती मिळायला हवी, लोणारे साहेब आपल्याला माहिती आहे का, कोण किती पैसे देणार याची.

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा : पुर्ण रक्कम मिळणार की ८० टक्के मिळणार की, २० टक्के मिळणार याची माहिती द्यावी.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- या महापालिकेतील अधिका-यांना शासकीय योजनांची काहीच माहिती नसते या अशा प्रकारामुळेच सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत जो फायदा या महापालिकेला मिळाला असता तो या अधिका-यांमुळे मिळालेला नाही.

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा : या प्रश्नाचे उत्तर द्यायला श्री सेलवन हे उपस्थित आहेत, परंतु ते विभागप्रमुख नाही. ज्यांना माहिती आहे ते विभाग प्रमुख येथे उपस्थित नाहीत. त्यामुळे सदस्यांना व्यवस्थित माहिती मिळत नाही. आयुक्त साहेब यापुढे जेव्हा स्थायी समिती बैठक असेल तेव्हा आपण संबधित अधिका-यांना बैठकीस उपस्थित राहण्यासाठी सक्त सूचना द्याव्यात.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- ही म्हाडाची योजना आहे, जवळपास एक कोटीची कामे या निधीतुन करण्यासाठी प्रस्ताव आलेले आहेत. याची माहिती द्यायला हवी की, निधी येणार कोठुन? कोणी सांगत नाही याचा अर्थ पाणी पुरवठा विभागाला देखिल माहिती नाही. लेखा विभाग व प्रभारी आयुक्त यांनाही माहिती नाही. अशी

*परिस्थिती असेल तर योजना चालणार तरी कशी? याबददल शासनाचे परिपत्रक अथवा पत्र,मंजुरी आलेली असेल. त्याशिवाय प्रस्ताव आला नसेल. आमचा या कामाला विरोध नाही, पाण्याचे काम आहे. परंतु योजनेची सविस्तर माहिती सभागृहात तर द्यायला हवी.*

***श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-*** *शासनाकडुन जो काही महत्त्वाचा पत्रव्यवहार होतो तो आम्ही महासभेच्या समोर ठेवत असतो.*

***मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*** *म्हणजे असे की, हे म्हाडाचे काम दिसते.*

***श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-*** *शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच आहे.*

***मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*** *रक्कम कुठून येईल ते सांगा. स्थायी समितीमध्ये विषय आणता तर उत्तर द्या.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप:-*** *माझा प्रश्न सरळ आहे की, एवढी मोठी रक्कम मान्यतेसाठी स्थायी समितीत आणता तर पैसा आला तरी कुठून? याची माहिती प्रशासनाला असणे आवश्यक आहे. माहिती नसेल तर आता काम मंजुर करा परंतु माहिती नंतर द्या. कारण पाण्याचे काम आहे.*

***श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-*** *मी आपल्याला नंतर याची माहिती देतो.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप:-*** *मला अशा योजनांमध्ये रस आहे, कृपया मला नंतर याची माहिती द्यावी.*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. १९:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत ब्रम्हीबाई आंबेडकर नगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे सन इंजिनीअरींग या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ९६१२००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि.११.०७.०३ रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार दि.२५.०७.०३ रोजी उघडण्यात आलेल्या या निविदामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

i)मेसर्स सुदेश इंटरप्राईजेस,उल्हासनगर यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २९: जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स ओ.एस.आर.कंस्ट्रक्शन्स यांनी विक्रीकर व अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

मेसर्स सुदेश इंटरप्राईजेस,उल्हासनगर, यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी वाटाघाटी दरम्यान पुढील अटीनुसार दर कमी करण्यास तयारी दर्शविली.

i)कामासाठी लागणारे पाईप व फिटींगस महापालिकेतर्फे पुरवठा केल्यास मजूरी दर(Labour

Part) कमी करण्यास तयार आहे. किंवा

ii)सदर कामाचे देयक काम पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यात देयक मिळाल्यास ४% दर कमी करून २५: जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली.

वरील दोन्ही शर्ती मान्य करता येत नसल्याने फेर निविदा मागविण्यात आली.

२) या कामाकरिता दि.११.११.०३ रोजी दूस-यांदा निविदा मागविण्यात आल्या. सदरच्या प्राप्त दोन निविदा दि.२३.११.०३ रोजी उघडण्यात आल्या. त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

i)मेसर्स सॅन इंजिनिअरींग यांची अंदाजित प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २५: जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स डी.आर.निकम यांची अंदाजित प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १९: जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स डी.आर.निकम यांना त्यांची निविदा न्युनतम दराची असल्याने वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी ४: दर कमी करून १५ % जादा दराने काम करण्याबाबत लेखी संमती दर्शविली.सदरचे दर जास्त वाटल्याने संबंधीतांना दि. २०.१२.०३ रोजी फेरवाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. यावेळी त्यांनी आपले दर कमी करण्यास नकार दर्शविल्याने दूस-या क्रमांकाचे ठेकेदार मेसर्स सॅन इंजिनिअरींग यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले व त्यांनी सदरचे काम प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १०.२०: जादा दराने काम करण्यास तयार असल्याबाबात लेखी पत्र सादर केले आहे. हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू ९६१२००/- किंमतीचे प्राकलन १०.२०% जादा दराने म्हणजेच रू १०५९२४२/-किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५१ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत ब्रम्हीबाई आंबेडकर नगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे सन इंजिनीअरींग या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र २० वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २०:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत गणेश नगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***<u>काही सदस्य :-</u>* पास, पास . . . . .**

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u>* सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.**

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २०:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत गणेश नगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विाायांकित कामाकरिता रू ४३८६००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि.११.११.०३ रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार दि.१३.११.०३ रोजी उघडण्यात आलेल्या या निविदामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

i)मेसर्स रवी सचदेव,उल्हासनगर यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १४.३१% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स,मुंबई यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २०% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

iii)मेसर्स श्रीकृाण कंस्ट्रक्शन्स यांनी विक्रीकर व अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

मेसर्स रवी सचदेव,उल्हासनगर, यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.२९.११.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी १% दर कमी करून १३.३१ % जादा दराने काम करण्याबाबत लेखी संमती दर्शविली. सदरचे दर जास्त वाटल्याने संबंधीतांना दि.२०.१२.०३ रोजी फेरवाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. यावेळी सदरचे काम प्राकलनाच्या किंमतीपेक्षा ८.१०% जादा दराने काम करण्यास तयार असल्याबाबत लेखी पत्र सादर केले आहे. हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू ४३८६००/- किंमतीचे प्राकलन ८.१०% जादा दराने म्हणजेच रू ४९६९७/-किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १५२ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत गणेश नगर, उल्हासनगर-५येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र २१ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २१:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत जयजनता कॉलनी, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे. जी. बी. माने या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** ***सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

प्रस्तावना

विषय क्र. २१:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत जयजनता कॉलनी, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे. जी. बी. माने या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विाायांकित कामाकरिता रू ९३०१००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि.११.०७.०३ रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार दि.२५.०७.०३ रोजी उघडण्यात आलेल्या या निविदामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

i)मेसर्स रवी सचदेव यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २२.२३% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स जी बी माने यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १५.२% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

iii)मेसर्स धनंजय आर निकम यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २८% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स जी बी माने, यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी २: दर कमी करून म्हणजे १३.२०% जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली.

वरील शर्त मान्य करता येत नसल्याने फेर निविदा मागविण्यात आली.

२) या कामाकरिता दि.११.११.०३ रोजी दूस-यांदा निविदा मागविण्यात आल्या. सदरच्या प्राप्त दोन निविदा दि.२३.११.०३ रोजी उघडण्यात आल्या. त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

i)मेसर्स जी बी माने यांची अंदाजित प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १४.२% जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स रवी सचदेव यांची अंदाजित प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १४.१३% जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स रवी सचदेव यांना त्यांची निविदा न्युनतम दराची असल्याने वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी १% दर कमी करून १३.१३% जादा दराने काम करण्याबाबत लेखी संमती दर्शविली. परंतू सदरचे दरही जास्त वाटल्याने संबंधीतांना दि. २०.१२.०३ रोजी फेरवाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. यावेळी त्यांनी आपले दर कमी करण्यास नकार दर्शविल्याने दूस-या क्रमांकाचे ठेकेदार मेसर्स जी बी माने यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले व त्यांनी सदरचे काम

प्राकलनाच्या किंमतीपेक्षा ८.९७% जादा दराने काम करण्यास तयार असल्याबाबत लेखी पत्र सादर केले आहे. हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू ९३०१००/- किंमतीचे प्राकलन ८.९७% जादा दराने म्हणजेच रू १०१३५३०/-किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५३ दिनांकः-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत जयजनता कॉलनी, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. जी. बी. माने या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र २२ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २२:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत राहुल नगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *सचिव साहेब ही योजना झोपडपटटी विभागासाठी आहे तर या योजनेपासुन आमचा प्रभाग वंचित ठेवलेला आहे. आयुक्तांनी संबधित अधिका-यांस जेथे आवश्यकता आहे अशा सर्व प्रभागात सर्वेक्षण करून तेथेही काम करायला सांगा.*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *या प्रस्तावांमध्ये फक्त कॅम्प नं ४ व ५ ची च कामे दिसत आहेत.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *कॅम्प नं १ ते ३ चे एकही काम नाही.*

***मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-*** *हे प्रस्ताव कोणी तयार केलेत?*

***मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-*** *माझ्या प्रभागात गोल मैदान व नेहरू चौक हे अक्षरशः कोरडे आहेत, तेथे अजिबात पाणी येत नाही. तेथेही या योजनेतुन कामे करण्यात यावीत.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>* *सभापती महोदया आपण आयुक्तांना कॅम्प नं १ ते ३ मध्ये सदर योजनेतुन कामे करण्यासाठी निर्देश द्यावेत.*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u>* *हे जे प्रस्ताव बनविलेले आहेत, तर हे अत्यंत चुकीचे आहे. एकतर यावर उत्तर द्यायला कोणी उपस्थित नाही तसेच कॅम्प नं १ ते ३ मधील एकही काम नाही.*

*<u>मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा :-</u>* *कॅम्प नं १ व २ चे एकही नाही, माझ्या प्रभागात तर पुर्ण झोपडपटटी विभाग आहे.*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u>* *कॅम्प नं १ ते ३ मधील प्रस्ताव नसतील तर आपण आपले प्रस्ताव द्यावेत, पुढील बैठकीत ती कामे घेण्यात येतील.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>* *असे नाही, गोल मैदान येथील काही भाग, श्री पृथ्वी वलेचा, श्रीमती ज्योती कलानी आणि माझा प्रभाग येथील बराचसा भाग झोपडपटटी विभागात येतो. तेथील कामे देखील घ्यायला हवी होती.*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u>* *हे प्रस्ताव चुकीचे बनविलेले आहेत. योजनेंतर्गत जो निधी आला तो सर्व कॅम्पांमध्ये विभागुन द्यायला हवा होता. पाण्याची कामे करायची असल्याने आता याला विरोध करणे देखिल शक्य नाही. परंतु ज्याने हे प्रस्ताव तयार केलेत त्याने ते चुकीचे केलेले आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा :-</u>* *माझा प्रभाग तर पुर्ण झोपडपटटी विभागात येतो.*

*<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :-</u>* *पाणी ही एक जीवनावश्यक वस्तु असल्याने ते सर्वांना मिळणे आवश्यक आहे. फक्त झोपडपटटी विभागालाच न देता सर्वांना याचा फायदा द्यायला हवा.*

*<u>मा. सदस्य श्री नरेंदकुमार ठाकुर :-</u>* *ज्याने प्राकलने तयार केलीत त्याने दुजाभाव केलेला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>* *मला वाटते की म्हाडाच्या या योजनेची माहिती फक्त कॅम्प नं ४ व ५ येथील सदस्यांना होती, त्यामुळे फक्त तेथील प्राकलने केलेली आहेत.*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u>* *पुढील बैठकीत सर्वांची प्राकलने ठेवु.*

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u>* *निधी असेल तर कामे करणार ना.*

*<u>काही सदस्य :-</u>* *पास, पास . . . . .*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u>* *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २२:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत राहुल नगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विषायांकित कामाकरिता रू ९९०५००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि.११.०७.०३ रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार दि.२५.०७.०३ रोजी उघडण्यात आलेल्या या निविदामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

i)मेसर्स रवी सचदेव यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २२.२३% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स धनंजय आर निकम यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २६% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

iii)मेसर्स सुदेश इंटरप्राईजेस,उल्हासनगर यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २२% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स सुदेश इंटरप्राईजेस,उल्हासनगर, यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.२९. ०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी वाटाघाटी दरम्यान पुढील अटीनुसार दर कमी करण्यास तयारी दर्शविली.

i)कमासाठी लागणारे पाईप व फिटींगस महापालिकेतर्फे पुरवठा केल्यास मजूरी दर(Labour Part) काम करण्यास तयार आहे. किंवा

ii)सदर कामाचे देयक काम पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यात देयक मिळाल्यास ७% दर कमी करून १५% जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली.

वरील दोन्ही शर्ती मान्य करता येत नसल्याने फेर निविदा मागविण्यात आली.

२) या कामाकरिता दि.११.११.०३ रोजी दूस-यांदा निविदा मागविण्यात आल्या. सदरच्या प्राप्त दोन निविदा दि.२३.११.०३ रोजी उघडण्यात आल्या. त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

i)मेसर्स सुदेश इंटरप्राईजेस,उल्हासनगर यांची अंदाजित प्राकनाच्या किंमतीपेक्षा १९.५% जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स रवी सचदेव यांची अंदाजित प्राकनाच्या किंमतीपेक्षा १४.१३: जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स रवी सचदेव यांना त्यांची निविदा न्युनतम दराची असल्याने वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी १: दर कमी करून १३.१३: जादा दराने काम करण्याबाबत लेखी संमती दर्शविली. परंतू सदरचे दरही जास्त वाटल्याने संबंधीतांना दि.२०.१२.०३ रोजी फेरवाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. यावेळी त्यांनी आपले दर आणखी ३.१३% कमी करून अंतिमत: १०% जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली. तसे संमती पत्रक ठेकेदाराने दि २०.१२.०३ रोजी सादर केले आहे. हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू ९९०५००/- किंमतीचे प्राकलन १०: जादा दराने म्हणजेच रू १०८९५५०/-किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १५४ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत राहुल नगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र २३ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २३:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत महादेव नगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. २३:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत महादेव नगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ११७७९००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि. ११.०७.०३ रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार दि. २५.०७.०३ रोजी उघडण्यात आलेल्या या निविदामध्ये चार निविदा प्राप्त झाल्या होत्या.

i)मेसर्स सुदेश एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २४.५% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

ii)मेसर्स एम.एस.के.बिल्डर्स, उल्हासनगर यांनी विक्रीकर व अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

iii)मेसर्स रवी सचदेव यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा २५.२% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

iv)मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स, मुंबई यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या किंमतीपेक्षा १०% जादा दराने निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स, मुंबई,यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. तथापि,त्यांनी दर कमी करण्यास नकार दर्शविल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या.

२) या कामाकरिता दि.११.११.०३ रोजी दूस-यांदा निविदा मागविण्यात आल्या. सदरच्या प्राप्त दोन निविदा दि.२३.११.०३ रोजी उघडण्यात आल्या. त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

i)मेसर्स श्रीकुाण कंस्ट्रंक्शन्स यांनी विक्रीकर व अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले नसल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

ii)मेसर्स रवी सचदेव यांची अंदाजित प्राकनाच्या किंमतीपेक्षा १४.३१% जादा दराची निविदा प्राप्त झाली आहे.

मेसर्स रवी सचदेव यांना रोजी त्यांची निविदा न्युनतम दराची असल्याने वाटाघाटीसाठी दि.२९.०८.०३ रोजी बोलविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी १% दर कमी करून १३.३१% जादा दराने काम करण्याबाबत लेखी संमती दर्शविली. परंतू सदरचे दरही जास्त वाटल्याने संबंधीतांना दि.२०.१२.०३ रोजी फेरवाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. यावेळी त्यांनी आपले दर आणखी ४.६७% कमी करून अंतिमत: ८.६४% जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली. तसे संमती पत्रक ठेकेदाराने दि २०.१२.०३ रोजी सादर केले आहे. हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू ११७७९००/- किंमतीचे प्राकलन ८.६४% जादा दराने म्हणजेच रू १२७९६७०/-किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १५५ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत महादेव नगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. रवी सचदेव या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र २४ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. २४:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सीताराम नगर, लक्ष्मीनगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी डी आर निकम या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .***

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २४:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सीताराम नगर, लक्ष्मीनगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी डी आर निकम या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा

करणेस मान्यता देणे

उपरोक्त विषयांकित कामाकरिता रू ९२३५००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्राप्त निविदा दि.१३.११.०३ रोजी उघडण्यात आल्या. पुढील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

I)मेसर्स डी.आर.निकम -१९% जादा दराने

II)मेसर्स श्रीकृाण कंस्ट्रक्शन-ही निविदा विक्रीकर व अनुभवाचे प्रमाणपत्राअभावी उघडण्यात आली नाही.

वरील प्रमाणे प्राप्त निविदेनुसार मेसर्स डी.आर.निकम यांनी वाटाघाटी दरम्यान आपले दर ४:कमी करून निविदा दरापेक्षा १५% जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली. तथापि हे दर ही जास्त वाटल्याने त्यांना पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. फेर वाटाघाटीमध्ये सदरहू ठेकेदाराने आणखी ३.५% दर कमी करून अंतिमत: ११.५०% जादा दराने काम करण्यास तयारी दर्शविली. सदर ११.५०% जादा दर हे संयुक्तिक वाटत असून ते मान्य करण्यासठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू ९२३५००/- किंमतीचे प्राकलन ११.५% जादा दराने म्हणजेच रू १०२९७०३/- एवढया किंमतीस स्थायी समितीची मान्यता मिळवणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५६ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्र रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सीताराम नगर, लक्ष्मीनगर, उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. डी आर निकम या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र २५ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. २५:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत कैलास कॉलनी, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे कल्पतरु इंजिनीअरींग कंपनी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***काही सदस्य :- पास, पास . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. २५:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत कैलास कॉलनी, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे कल्पतरु इंजिनीअरींग कंपनी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विाायांकित कामाकरिता रू १७३५२४०/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि.११.०७.०३ रोजी मागविण्यात आली होती. त्यानुसार दि.२५.०७.०३ रोजी उघडण्यात आलेल्या या निविदामध्ये मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स,मुंबई यांची अंदाजपत्रकिय प्राकलनाच्या १५% जादा दराने एकच निविदा प्राप्त झाली आहे.ठेकेदारास दि.२९.०८.०३ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. तथापि,त्यांनी दर कमी करण्यास नकार दर्शविल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या.

२)या कामाकरिता दि.२९.०८.०३ रोजी दूस-यांदा निविदा मागविण्यात आल्या. दि. ११.११.०३ रोजी मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स ,मुंबई,यांची एकच निविदा प्राप्त झाली.सदरची निविदा दि.२३.११.०३ रोजी उघडण्यात आली. त्यामध्ये त्यांनी अंदाजित किंमतीपेक्षा २०% जास्त दराने निविदा भरली होती.सदरचे दर जादा असल्यामुळे ठेकेदारास दि.२९.११.०३ रोजी वाटाघाटीसाठी बोलण्यात आले.त्यावेळी त्यांनी ५: दर कमी करून १५% जादा दराने काम करण्याबाबत लेखी संमती दर्शविली.परंतू सदरचे दरही जास्त वाटल्याने संबंधीतांना दि.२०.१२.०३ रोजी फेरवाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. योवळी त्यांनी आणखी ३% दर कमी केल्याने अंतिमत: १२% जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली. तसे संमती पत्रक ठेकेदाराने दि २०.१२.०३ रोजी सादर केले आहे. हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू १७३५२४०/- किंमतीचे प्राकलन १२% जादा दराने म्हणजेच रू १९४३४६९/-किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५७ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत कैलास कॉलनी, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे कल्पतरु इंजिनीअरींग या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र २६ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २६:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सहयाद्रीनगर, श्रीरामनगर, पटेलनगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे श्रीराम कन्सट्रक्शन्स या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. २६:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सहयाद्रीनगर, श्रीरामनगर, पटेलनगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे श्रीराम कन्सट्रक्शन्स या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विाायांकित कामाकरिता रू २२५६८००/- खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदा, त्यातील दर,इ. बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

१) या कामासाठी प्रथम निविदा दि.२८.०७.०३ रोजी उघडण्यात आली. त्यानुसार फक्त संध्या कंस्ट्रक्शन यांची ४०.५०% जादा दराची निविदा प्राप्त झालेली होती. वाटाघाटीत ठेकेदारांनी दि.२९.०८.०३ रोजीच्या वाटाघाटी नंतर ठेकेदारांनी २% दर कमी करून (म्हणजेच ३८.५०%) काम करण्यास संमती दर्शविली,ती अमान्य करण्यात आली.

२)दितीय निविदा(फेर निविदा)दि.११.११.०३ रोजी उघडण्यात आल्या. पुढील प्रमाणे दोन ठेकेदारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

I)मेसर्स पद्मावती कंस्ट्रक्शन-२१.५: जादा दराने
II)मेसर्स श्रीराम कंस्ट्रक्शन -१९.८८:जादा दराने

वरील फेर निविदेनुसार मेसर्स श्रीराम कंस्ट्रक्शन यांचे दर किमान असल्याने त्यांना दि.२९.११.०३ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.त्यांनी आपले दर ४.८८%ने कमी करून १५% दराने काम करण्यास संमती दर्शविली.परंतू हे दर ही जास्त वाटल्याने त्यांना पुनश्च दि.२०.१२.०३ रोजी फेर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.फेर वाटाघाटीत ठेकेदाराने आणखी ४% दर कमी करून अंतिमत: १०: जादा दराने काम करण्यास तयारी दर्शविली.हे दर योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदरचे रू २२५६८००/- किंमतीचे प्राकलन १०% जादा दराने म्हणजेच रू २४८२४८०/- एवढया किंमतीस स्थायी समितीची मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५८ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत सहयाद्रीनगर,, श्रीरामनगर, पटेलनगर, उल्हासनगर-५ येथे जलवाहिनी टाकणेकामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे श्रीराम कन्सट्रक्शन्स या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-* विषय क्र २७ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २७:-श्री बी़ आऱ गंगारामानी, विद्युत पर्यवेक्षक यांना न्यायालयीन प्रकरणात तडजोड करुन मंजुर पदावर नियमीत करणे

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* सचिव साहेब याबददल कायदेशिर दृष्टया अभिप्राय द्या, आपले मत द्या. याबाबत न्यायालयाचा निर्णय झालेला आहे, आपण माहिती द्यावी.

*मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-* आयलानी साहेब आपण माहिती द्यावी.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* ते कायदेशिर दृष्टया अभिप्राय देवु शकत नाहीत.

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-* श्री गंगारामानी यांची तत्त्कालीन नगरपालिकेत १९९१-९२ मध्ये या पदावर थेट नियुक्ती करण्यात आली होती. जिल्हाधिका-यांकडे याची तक्रार केल्यानंतर त्यांनी कलम ३०८ प्रमाणे त्यांच्या नियुक्तीचा ठराव रददबातल केला होता. परंतु नगरपालिकेने त्यांना तसे पत्र देण्याआधीच त्यांनी औद्योगिक न्यायालयातुन त्यांना सेवेतुन कमी करण्याविरुध्द स्थगन आदेश आणला होता. न्यायालयाने सदरच्या आदेशात त्यांना कामावरुन काढु नये असे निर्देश दिले होते. आता ते गेल्या ११ वर्षांपासुन येथे काम करीत असुन, पद रिक्त आहे. त्यांनी त्यांना रिक्त पदावर सामावुन घेण्याची विनंती केलेली असुन, विनंती मान्य झाल्यास ते न्यायालयात तडजोड करण्यास तयार आहेत.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* म्हणजे सध्या ३ पदे रिक्त आहेत.

*श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-* ४ पदे रिक्त आहेत.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* गोषवा-यात ३ पदे रिक्त दर्शविलेली आहेत. यांचा स्थगन आदेश उठलेला आहे का?

*श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-* नाही.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* स्थगन आदेश उठलेला नाही तर असे करता येईल काय?

*कार्यकारी अभियंता (विद्युत) :-* श्री गंगारामानी यांनी पत्र दिले आहे की, त्यांना रिक्त पदावर सामावुन घेतल्यास ते न्यायलयात प्रकरण मागे घ्यायला तयार आहेत. यासाठी तडजोड करण्याचा अधिकार कलम ४८१ प्रमाणे स्थायी समितीला असल्याने सदरचा प्रस्ताव आपल्यासमोर आणलेला आहे.

*मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-* मग कलम ३०८ चे काय होईल?

*कार्यकारी अभियंता (विद्युत) :-* तो विषय सध्या न्यायालयात आहे.

*श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-* त्यांना सेवेत ११ वर्षे तर झालेली आहेत.

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :-</u> १९९६ मध्ये सर्वांना कायम स्वरुपी सेवेत सामावुन घेण्यात आलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> इतरही असे अनेक कर्मचारी आहेत, त्यांच्याबाबतीतही असेच करा.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> ते न्यायालयात गेले असतील तरच असे करता येईल.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> हे असे पहिलेच उदाहरण आपल्या समोर आलेले आहे. स्थायी समितीने ठराव मंजुर केल्यास ते न्यायालयातुन प्रकरण काढुन घेतील. परंतु त्यानंतर अशाच प्रकारचे बरेचसे कर्मचारी असल्याने त्यांचे प्रस्तावही आपल्या समोर येतील. त्याचा विचार करुन घ्या.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> हे कर्मचारी ११ वर्षांपासुन काम करीत आहेत. त्यामुळे त्यांना याचा लाभ होईल.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> हे प्रकरण आपण मंजुर केले, तर इतरही अनेक प्रकरणे आपल्या समोर येतील. आपण असे पास करु पण महापालिकेची आर्थिक परिस्थिती तेवढी सक्षम आहे का?

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :-</u> श्री गंगारामानी हे एक चांगले कर्मचारी आहेत, त्यांचे काम देखिल चांगले आहे.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> विषय पुढे ढकला.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> सचिव साहेब आपण आपले मत द्या.

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :-</u> हा कर्मचारी कामाचा आहे. पद रिक्त आहे त्यामुळे त्याला आपण घेत आहोत. इतर कर्मचा-यांच्या बाबतीत पद रिक्त असेल तर त्यांचेही असे करता येईल, परंतु त्यासाठी आधी पद तर रिक्त असायला हवेना.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> इतर कर्मचा-यांनीही असाच अर्ज केला तर काय करणार?

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :-</u> त्यासाठी पद रिक्त असायला हवे.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> सचिव साहेब आपण आपले मत द्या.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> माझी नियुक्ती देखील कलम ३०८ प्रमाणे रददबातल ठरविण्यात आली होती. माझे प्रकरण देखिल न्यायप्रविष्ट असल्याने मी यावर भाष्य करणे उचित होणार नाही.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> असे असेल तर विषय पुढे ढकला. यावर घाई करण्याची गरज नाही.

<u>कार्यकारी अभियंता (विद्युत) :-</u> उद्या त्यांना कोर्टात तारीख आहे. त्यांना कोर्टात उद्या अहवाल दाखल करावयाचा आहे. आज बैठक असल्याने त्यांनी उद्याची तारीख घेतलेली आहे. त्यामुळे यावर निर्णय घेण्याची विनंती आहे. सदरचे कर्मचारी हे अत्यंत चांगले काम करीत असुन ते गेल्या ११ वर्षांपासुन कार्यरत आहेत. तसेच पद देखिल रिक्त आहे.

<u>मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा :-</u> विषय पास करायला हवा.

***मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-*** *श्री गंगारामानी हे चांगले काम करीत असल्याने सदरचा विषय पास करण्यात यावा.*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *जर कायदा विषय तांत्रिक बाब असेल तर आयुक्त ते बघुन घेतील, त्यामुळे पास करण्यास हरकत नाही.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *असे कसे पास करणार.*

***मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-*** *उमाप साहेब पास करुन टाका.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *त्याआधी कायदेशिर मत द्यावे.*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *आयुक्त साहेब यावर योग्य तो निर्णय घेतील असे नमुद करुन आपण विषय पास करुन टाकु. आयुक्त साहेब यातील तांत्रिक बाबी बघुन घेतील.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *मुददा तो नाही, सचिव साहेबांनी आपला अभिप्राय द्यावा.*

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *माझी नियुक्ती देखिल कलम ३०८ प्रमाणे होती त्यामुळे मी माझे मत नोंदविणे उचित होणार नाही.*

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *ठिक आहे, आपण आयुक्त साहेबांवर सोपवु ते बघुन घेतील काय करायचे.*

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *ठरावात तसे नमुद करण्यात येईल*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. २७:-श्री बी़ आऱ गंगारामानी, विद्युत पर्यवेक्षक यांना न्यायालयीन प्रकरणात तडजोड करुन मंजुर पदावर नियमीत करणे

श्री. बी. आर. गंगारामानी यांना वर्ष १९९२ मध्ये तत्कालीन नगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ८१ दिनांक २.४.१९९२ अन्वये विद्युत पर्यवेक्षक म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे व ते दिनांक २०.४.९२ पासून या पदावर रूजू झाले आहेत. तद्नंतर वर्ष ९३ मध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम ३०८ अंतर्गत उपरोक्त स्थायी समिती ठराव रद्द केला. त्या विरूध्द श्री. गंगारामानी यांनी औद्योगिक न्यायालायात तक्रार क्रमांक १४९/९३ दाखल करून स्थगत आदेश प्राप्त केले व ते आज पर्यंत सदर पदावर कार्यरत आहेत.

श्री. गंगारामानी यांनी दिनांक १.११.२००३ रोजी एकुण ११ वर्ष ६ महिने वर्षाची सेवा पुर्ण केली असुन त्यांनी दिनांक २८.७.२००३ रोजी अर्ज करून त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विद्युत पर्यवेक्षक / कनिष्ठ अभियंत्यांच्या रिक्त पदावर सामावुन घेण्यासाठी विनंती केली आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेत वेतनश्रेणी रूपये ४५००-१२५-७००० मध्ये विद्युत पर्यवेक्षक / कनिष्ठ अभियंताचे एकुण ७ मजुर पदे असुन त्यातील ४ पदे सध्या रिक्त आहेत. विद्युत विभागाचे काम सुरळीत पार पाडण्यासाठी विद्युत विभागाचे काम सुरळीत पार पाडण्यासाठी विद्युत विभागाने ही चार पदे भरण्यासाठी विनंती केली आहे.

श्री. बी. आर गंगारामानी यांनी विद्युत पर्यवेक्षक या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग पदवी धारण केली असुन त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ४८१ अन्वये तडजोड करून विद्युत पर्यवेक्षक / कनिष्ठ अभियंता (विद्युत) या रिक्त पदावर वेतनश्रेणी ४५००-१२५-७००० मध्ये नियमित करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्यांत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५९ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव आयुक्तास जर कायदयान्वये कायदेशिररित्या आपसात वाद मिटवता येत असेल तर श्री. बी आर् गंगारामानी, विद्युत पर्यवेक्षक यांनी औदयोगिक न्यायालयात दाखल केलेली तक्रार क्र. १४९/९३ मागे घेण्यास मान्य करीत आहे व श्री. बी. आर. गंगारामानी यांनी सदरहू तक्रार मागे घेतल्यानंतर त्यांना विदयुत पर्यवेक्षक रिक्त पदावर स्थापीत करणेंस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र २८ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. २८:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय जेव्हा येतो तेव्हा आम्ही विरोध करीत नाही. परंतु आमच्या प्रभागात झोपडपट्टी विभाग येतो, ज्योती भाभीचा प्रभाग देखिल झोपडपट्टी विभागात येतो. परंतु तेथे रस्ते विकास योजनेचा काही एक लाभ होत नाही. प्रभागातील आनंद शिंदे ते चंद्रशेखर आझाद चौक हा रस्ता व भारत मारबल येथील रस्ता हे रस्तेही येथे पास करण्यात आलेले आहेत परंतु ही कामे करण्यात येत नाहीत, येथे आम्हाला येवुन आता एक वर्ष होत आले परंतु आमचे एकही काम होत नाही, ह चुकीचे आहे. तुम्ही हे काम करण्याची शाश्वती आम्हाला द्यावी.*

*मा. सदस्या श्रीमती किरण माने :- माझ्या प्रभागात देखिल शिवमार्ग येथे समाज मंदिर बनविण्याचा प्रस्ताव येथे पास झालेला आहे परंतु निधी नाही या सबबीखाली काम करता येणार नाही असे आयुक्त सांगतात. हे काम करायला काय हरकत आहे?*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- शहर अभियंता हे दोन रस्ते का करीत नाही याचा अभिप्राय द्यावा.*

***<u>मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा :-</u>*** *माझ्या प्रभागात देखील ३-४ रस्ते आहेत खेमाणी येथील रस्ता आहे, रस्ता एवढा खराब आहे की, मी तेथे खड्डयात पडुन जखमी झालो. ते कामही करण्यात यावे.*

***<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य) :-</u>*** *तुमच्या प्रभागातील रस्ते विकास आराखडयात असतील तर करण्यात येतील.*

***<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>*** *आजपर्यंत का झाले नाही ते सांगा. पुढच्या बैठकीत आणायचे आश्वासन द्या.*

***<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य) :-</u>*** *तुमच्या प्रभागातील रस्ते विकास आराखडयात असतील तर करण्यात येतील.*

***<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>*** *हे जे एवढे रस्ते झालेले आहेत हे सर्व विकास आराखडयाप्रमाणे झालेले आहेत काय ते सांगा.*

***<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य) :-</u>*** *तुमचे प्रस्ताव तयार केलेले आहेत, हे तुम्हाला देखिल माहिती आहे.*

***<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>*** *हे जे रस्ते आहेत हे सर्व विकास आराखडयाप्रमाणे आहेत काय? नाहीत तर आमचे दोन रस्ते का नाही करत?*

***<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u>*** *याचे उत्तर द्या.*

***<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य) :-</u>*** *प्रस्ताव पाठविलेला आहे. तसेच हा जो विषय आहे यामध्ये रस्त्यांचा विषयच नाही.*

***<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>*** *मी विषयावर बोलत नाही. काम कधी होणार ते सांगा?*

***<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य) :-</u>*** *मंजुर झाल्यानंतर होतील.*

***<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u>*** *याची जबाबदारी कोण घेणार.*

***<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u>*** *ठिक आहे, पुढील बैठकीत घेवु.*

***<u>काही सदस्य :-</u>*** *पास, पास . . . . .*

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u>*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २८:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी निधी .महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगरमध्ये ट्री प्लॅन्टेशन ट्रि गार्डस (जाळी) उपलब्ध | १५००००/- | १७/१२/०३ | मे श्री. मॉ म. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करणेबाबत. (महानगरपालिका निधी ५४९) | | | का. सोसा. |
| २ | डलहासनगर-३ येथील लायन गार्डनचे जवळील लहान मुलांचे गार्डनमध्ये खेळ तसेच सुखसुविधा उपलब्ध करणेबाबत. (महानगरपालिका निधी ६७७) | १६२२००/- | १७/१२/०३ | मे. वैशाली म. का. सोसा. |
| ३ | डल्हासनगर-३ येथे आंबेडकर नगर मध्ये राधाबाबई सोनवणे यांचे घराजवळ , महाराष्ट्र हॉटेल, सरस्वती मील, हरभजन सिंग तबेला , पवार हाऊस जवळ नाल्या बांधणे. (गलिच्छ वस्ती निधी ७०८) | १४९६५०/ - | १७/१२/०३ | मे. श्री सत्यसाई म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६० दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र २९ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. २९:-मे व्होरा इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडुन ''सेतु'' प्रकल्प उल्हासनगर महापालिकेमध्ये कार्यान्वित करणे, प्रकल्पामध्ये सुधारणा करणे व ऑनसाईट सपोर्ट देणेकामी प्रशासनास त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे

***काही सदस्य :- पास, पास . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

प्रस्तावना

विषय क्र. २९:-मे व्होरा इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडुन "सेतु" प्रकल्प उल्हासनगर महापालिकेमध्ये कार्यान्वित करणे, प्रकल्पामध्ये सुधारणा करणे व ऑनसाईट सपोर्ट देणेकामी प्रशासनास त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे

शासन निर्णय नगरविकास क्रमांक अविआ-१०२००३/प्र.क्र.२७/०३/२००३/नवि-४ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २७ फेबुंवारी, २००३ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रशासन गतिमान व लोकभिमुख करण्याच्या दृष्टीने व कामकाजात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने नागपूर व उल्हासनगर महानगरपालिकांमधील प्रायोगिक तत्वावर संगणकीकरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिका संगणकीकरणाच्या अनुषंगाने नागरीकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने निर्धारीत केलेल्या आय.टी.सोल्युशन प्रोव्हायडर्सकडून "सेतु" हा महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या प्रकल्प उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वयीत करणे व त्यामध्ये सुधारणा (Enhancement) करणेबाबत शासनाने मान्य केलेल्या दरानुसार Man Month साठीचे दरपत्रक मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडुन महाराष्ट्र शासनाकडून त्यांना NO.COM/1002/CR-207/2002/39 dated 12/02/2003 अन्वये मिळालेल्या कार्यादेशानुसार मागविण्यात आले.

मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडून दि. ५.१२.२००३ रोजी शासनाने मान्य केलेल्या दरानुसार Man Month साठीचे दरपत्रक प्राप्त झाले. सदर दरपत्रकातील तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | Details | Man Month | शासनाने मान्य केलेले दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | "सेतु" हा महाराष्ट्र शासनाने विकसित केलेला प्रकल्पामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने सुचविलेल्या सुधारणा (Enhancement)करणे व तो महानगरपालिकेने उभारलेल्या "नागरी सुविधा केंद्रात" योग्य प्रकारे कार्यान्वीत करणे. | ४ | रू. ५०,०००/- प्रती Man Month | रू.२,००,०००/- |
| २ | सदर विकसित प्रकल्प उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वयीत करणेसाठी ऑन साईट सपोर्ट देणे | २५ दिवस | रू. २,०००/-प्रती Man Day | रू. ५०,०००/- |
| | एकुण | | | रू. २,५०,०००/- |

मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडुन "सेतु" प्रकल्पामध्ये सुधारणा (Enhancement) करणे व ऑन साईट सपोर्ट देणेसाठी प्राप्त झालेले ४ Man Month व २५ Man Days हा कालावधी उल्हासनगर महानगरपालिकेने सुचविलेल्या सुधारणांचा (Enhancement) विचार करता योग्य आहे, तसेच यांच्या दरांना शासनाची मान्यताही प्राप्त आहे.

मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडुन "सेतु" प्रकल्प उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वयीत करणे, प्रकल्पामध्ये सुधारणा (Enhancement) करणे व ऑन साईट सपोर्ट देणेसाठीचा प्रस्ताव मान्य करून लागणारा खर्च रू. २,५०,०००/- यास मंजुरी देणेस व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्याच्या मंजुरीसाठी स्थायी समितीच्या पटलावर सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १६१ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशी अनुसार मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांचेकडुन ''सेतु'' प्रकल्प उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वीत करणे, प्रकल्पामध्ये सुधारणा करणे व ऑन साईट सपोर्ट देणे कामी प्रशासनास त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ३० वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ३०:-मराठा सेक्शन करता बारवी मेन ते मोटर ड्रायव्हिंग स्कुल पर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनास मे एम एस एस आय डी सी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :- महापालिका निधी आहे का? निधी नाही मग काम कसे करणार? पैसे कोठुन आणणार?***

***काही सदस्य :- पास, पास .....***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

प्रस्तावना

विषय क्र. ३०:-मराठा सेक्शन करता बारवी मेन ते मोटर ड्रायव्हिंग स्कुल पर्यंत जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनास मे एम एस एस आय डी सी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

उपरोक्त विषयांकित कामासाठी रू. ९५३३००/- एवढया खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे. या कामासाठी प्राप्त झालेली निविदा दि. १३.११.०४ रोजी उघडण्यात आली. एम.एस.एस. आय.डी.सी ची एकच निविदा प्राप्त असून त्यातील दर अंदाजित किंमतीच्या २२ टक्के जादा असे होते.

दि. २९.११.०३ रोजी आलेल्या वाटाघाटीमध्ये सदरहू ठेकेदाराने हे दर ७ टक्के कमी करून १५ टक्के जादा दराने काम करण्यास संमती दर्शविली होती. वरील कामासाठी दोन ते तीन वेळा निविदा मागवूनही जास्त दर आले असल्याने ठेकेदारास पुन्हा दि. २०.१२.०३ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. वाटाघाटीनुसार ठेकेदाराने हे काम अंतिमत: १२ टक्के जादा दराने (आणखी ३ टक्के दर कमी करून) काम करण्यास लेखी संमती दिली आहे. (पत्र दि. ०५.०१.०४) ठेकेदारांचे सदरचे दर हे योग्य वाटत असून ते मान्य करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

तरी वरील प्रमाणे रू.९५३३००/- किंमतीचे प्राकलन १२ टक्के जादा दराने म्हणजेच रू. १०६७६९३/- एवढया किंमतीस मान्य करण्याकरिता स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६२ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाने केलेल्या शिफारशीनुसार मराठा सेक्शन करीता बारवी मेन ते मोटर ड्रायव्हिंग स्कुल पर्यंत जलवाहीनी टाकणे कामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे एम़ एस़ एस़ आय़ डी़ सी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ३१ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ३१:- महापालिका सेवेतील स्वच्छता निरीक्षकांना स्वत:चे भ्रमण दुरध्वनी संच खरेदीकामी अग्रीम रक्कम देणेस मान्यता देणे

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- हा चांगला विषय आहे, कारण स्वच्छता निरीक्षक कधीही दुरध्वनीवर उपलब्ध होत नाहीत.*

*मा. सदस्या श्रीमती किरण माने :- सदस्यांना देखिल द्यायला हवे.*

*मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- नगरसेवकांना दिल्यास संपर्क करायला सुविधा होईल.*

*काही सदस्य :- पास, पास . . . . .*

*मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. ३१:- महापालिका सेवेतील स्वच्छता निरीक्षकांना स्वत:चे भ्रमण दुरध्वनी संच खरेदीकामी अग्रीम रक्कम देणेस मान्यता देणे

मा. आयुक्त सो. यांनी दि. १८/१२/२००३ रोजी सर्व प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरिक्षक यांची शहरातील साफसफाईबाबत आढावा बैठक घेतली असता स्वच्छता निरिक्षकांना स्वत:चे भ्रमणध्वनी संच खरेदी करण्यासाठी रु. ५०००/- इतके अग्रीम देण्याच्या प्रस्तावास मान्यता देवून त्याची दरमहा रु. १०००/- प्रमाणे ५ हप्त्यामध्ये वसुली करणेस संमती दर्शविली आहे.

सबब, शहरातील साफसफाईबाबतच्या अडचणींचे तात्काळ निराकरण करणेसाठी सर्व स्वच्छता निरिक्षक यांना भ्रमणध्वनी संच खरेदीसाठी रु. ५०००/- अग्रीम देण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची वित्तीय मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६३ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्रीमती. भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार महापालिका सेवेतील स्वच्छता निरीक्षकांना स्वत:चे भ्रमण दुरध्वनी संच खरेदी कामी अग्रीम रक्कम देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ३२ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ३२:- उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 मध्ये प्रेमनगर टेकडी ते वॉटर टँक महात्मा फुलेनगर मार्गे रस्त्याचा विकास करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे.

***काही सदस्य :- पास, पास . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

प्रस्तावना

विषय क्र. ३२:- उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 मध्ये प्रेमनगर टेकडी ते वॉटर टँक महात्मा फुलेनगर मार्गे रस्त्याचा विकास करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे.

पाणी पुरवठा विभागाने केलेल्या सादरीकरणानुसार मागणी केलेली आहे की पटेलनगर येथे सध्या एक जलकुंभ अस्तित्वात आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तर्फे नविन बांधण्यात येत असलेल्या जलकुंभ पुर्णत्वास येत

आहे. जूना जलकुंभ भरण्यासाठी पंप हाऊस मध्ये मशिनरी बसविण्यात आलेली आहे. दुरूस्ती विषयक कारणास्तव मशिनरीची वाहतूक करावी लागते. पटेलनगर जलकुंभाकडे जाण्यासाठी सध्यास्थितीत रस्ता व्यवस्थीत नसल्यामुळे मशिनरी वाहतूकीमध्ये अडथळा निर्माण होतो.

सदर सादरीकरणावर मा. आयुक्त यांनी या कामाचे प्राकलन स्थायी समितीपुढे ठेवावे असे मत व्यक्त केले होते. तसेच स्थायी समितीने अद्याप निर्णय दिला नसल्यास स्थायी समितीला निर्णय घेण्यासाठी विनंती करावी असे निर्देश दिले होते.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक ७/११/२००३ रोजी फेरसादर करून त्यात नमुद केले होते की, या प्रस्तावास स्थायी समितीने ठराव क्र. २२ दिनांक ७/६/२००३ रोजी मान्यता दिलेली नाही. मा. आयुक्त सो. यांनी सदर प्राकलन स्थायी समितीची मंजुरी नसल्यामुळे पुन्हा स्थायी समितीसभेमध्ये निर्णय होण्याकरिता सादर करावे असे आदेश दिलेले होते.

सदर प्राकलनासहित पुवध्र्ची नस्ती सोबत सादर करावी तसेच सदरच्या कामासाठी चालू आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद शिल्लक आहे काय याचा खुलासा करावा असे आदेश दिलेले होते.

सदर काम महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष ब.४;प्प्द्ध च.प्प मध्ये नमुद आहे. तरतूदीचा तपशिल दिनांक २०/०५/२००३ च्या मंजुर टिप्पणीमध्ये दर्शविला आहे. सदर कामाचे खर्च रू. १४,००,०००/- यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरिता तसेच निविदा मागविणेस मान्यता मिळणेकरिता स्थायी समिती सभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १६४ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री.ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. १३ मध्ये प्रेमनगर टेकडी ते वॉटर टँक महात्मा फुलेनगर मार्गे रस्त्याचा विकास करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र ३३ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ३३:- उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र २४ (क) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉक्टर गावडे यांच्या क्लिनीकपर्यंत एम-३५० रोड बांधणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

***<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .***

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ३३:- उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र २४ (क) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉक्टर गावडे यांच्या क्लिनीकपर्यंत एम-३५० रोड बांधणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

उल्हासनगर-३ येथील पॅनल नं. २४ सी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉक्टर गावडे यांच्या क्लिनिक पर्यंत एम-२५० रोड बांधणे या कामाचे रूपये १९,०२,८८३/- खर्चाचे प्राकलन सार्वजनिक खात्यातर्फे तयार करून स्थायी समितीच्या दिनांक २८.८.२००३ च्या सभेपुढे प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित केले होते.

त्यावेळी निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आचार संहिता लागू असल्याने या कामास मंजुरी प्राप्त झाली ९नव्हती. सदर कामाची आवश्यकता असल्याने तसेच संबंधित परिसरातील नागरिकांनी सदर कामासाठी केलेली मागणी पहाता प्रस्तावित काम उल्हासनगर-३ येथील पॅनल नं. २४ सी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉक्टर गावडे यांच्या क्लिनिक पर्यंत एम-३५० रोड बांधणे या काामाचे रू. १९,०२,८८३/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळून निविदा कार्यवाहीसाठी मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १६५ <u>दिनांकः-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती उल्हासनगर ३ येथील पॅनल क्र. २४ (क) मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉ. गावडे यांच्या क्लिनिक पर्यंत एम. ३५० रस्ता बांधणे कामी रू. १९,०२,८८३/- चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र ३४ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ३४:- उल्हासनगर-१ येथील शहाड गावठाण शांताराम मढवी यांच्या घराजवळ दहा बैठकीचे शौचालय बनविणेसाठी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

***<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> प्रभाग कमांक ६ मध्ये श्रीमती नंदिनी बामणकर यांचा देखिल असाच प्रस्ताव होता, त्याला देखिल मान्यता द्यावी.***

***<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> माझ्या प्रभागात देखिल आहे.***

***<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :-</u> येथे फक्त चर्चा करतात.***

***<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .***

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ३४:- उल्हासनगर-१ येथील शहाड गावठाण शांताराम मढवी यांच्या घराजवळ दहा बैठकीचे शौचालय बनविणेसाठी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

सूचविलेल्या कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यस्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :- होय,जुणे शैचालयाच्या जागेवर

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का ? :- होय.

३) जागेवर असलेली कामाची सद्यस्थिती माहिती :- शैचालय आहे ते खुपच खराब स्थितीमध्ये आहे.

४) जागेवर यापुर्वी करण्यात आलेले काम कधी केले होते ? :- १५ वर्षापुर्वी

५) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का ? :- नाही

६) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :- होय.

७) १.विकास आराखडयाशी विसंगत असुनही कामाची आवश्यकता आहे का ? :- होय. लोकांची गैरसोय दुर करण्यासाठी

२.कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :- लोकांच्या घरामध्ये शैचालय नाही म्हणुन नवीन बांधणे आवश्यक आहे

८) या कामामुळे नागरिकांना कशाप्रकारे फायदा होणार आहे? :- आहे.

९) १.प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :- नाही

२.असल्यास ते कोणते?:- --------

३.सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का? त्याची कारणे. :- लोकांची गैरसोय दुर करण्यासाठी नविन शैचालय बांधणे आवश्यक आहे.

१०) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान ? :- १५ वर्ष.

११) प्रस्तावित कामाचे अंदाजे अपेक्षित खर्च रूपये:- ३,९०,७५०/-

१२) कोणत्या निधिमधुन खर्च अपेक्षित आहे ? :- ...........

१३) महानगरपाकलकेच्या निधीमधुन खर्च करणे असल्यास लेखा शिर्षाचे नांव :- सी-४ (XII)पी-२

i) या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेल्या एकंदर तरतुद :- रू ६०,००,०००/-

ii) या कामापुर्वी बजेट कंटोल रजिस्टर प्रमाणे शिललक असलेली तरतुद :- रू ४३,५०,६५०/-

iii) या कामावरील खर्च:- रू ३,९०,७५०/-

पअद्ध या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्ल:- रू ३५,५९,९००/-

रहाणारी तरतुद

उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक १ ते १३ या बाबींचा विचार करता प्रस्तावित केलेल्या कामाची आवश्यकता वाटते. प्रस्तावित असलेल्या कामामुळे नागरीकांना उपलब्ध होणारी सुविधा सार्वजनिक स्वच्छाता,इत्यादी बाबींचाही विचार करता व मे.कानार्क इन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि. यांचीही या कामाकरिता मागणी पहाता प्रस्तावित उल्हासनगर-३ येथिल उमपा मुख्य कार्यालय मागील जकात नक्याचे वाढीव बांधकाम बांधणे. सदर कामाचे नकाशा व प्राकलन तयार केले असुन सदर कामाच्या प्राकलनास मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे शे-यानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिति ठराव क्र. १६६ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-१ येथील शहाड गावठाण शांताराम मढवी यांच्या घराजवळ दहा बैठकीचे शौचालय बनविणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र ३५ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ३५:- उल्हासनगर-२ येथील राणा ट्रेडिंग जवळील कचरा गाडया खाली करण्याच्या जागेपर्यंत रस्ता खडीकरण करणेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

***मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*** *कचरा गाडया कुठे आहेत. सर्व गाडया तुटलेल्या आहेत. त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत.*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *नवीन गाडया मागविलेल्या आहेत. २५० व्हिल बॅरोज लवकरात लवकर घेण्यात येतील.*

***मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-*** *गाडया लवकरात लवकर खरेदी करण्यात याव्यात.*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. ३५:- उल्हासनगर-२ येथील राणा ट्रेडिंग जवळील कचरा गाडया खाली करण्याच्या जागेपर्यंत रस्ता खडीकरण करणेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

सुचविलेल्या कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यस्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :- आहे.

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का ? :- आहे.

३) जागेवर असलेली कामाची सद्यस्थिती माहिती :- रस्तात खड्डे पडल्यामुळ कच-याच्या गाडया जाणेयाठी अत्यंत त्रासदायक आहे.

४) जागेवर यापुर्वी करण्यात आलेले काम कधी केले होते ? :- अंदाजे १५ वर्षापुर्वी

५) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का ? :- आहे.

६) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :- ----

७) १.विकास आराखडयाशी विसंगत असुनही कामाची :- आहे. आवश्यकता आहे का ?

२.कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :- रस्तात खड्डे पडल्यामुळ कच-याच्या गाडया जाणेयाठी अत्यंत त्रासदायक आहे.

८) या कामामुळे नागरिकांना कशाप्रकारे फायदा होणार आहे?

(अंदाजे लाभार्थी) :- २५०००.

९) १.प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :- नाही

२.असल्यास ते कोणते? :- --------

३.सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का? :- रस्तात खड्डे पडल्यामुळे त्याची कारणे. कच-याच्या गाडया जाणेयाठी अत्यंत त्रासदायक आहे.

१०) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान ? :- १५ वर्ष.

११) प्रस्तावित कामाचे अंदाजे अपेक्षित खर्च रूपये:- ४,५३,१५०/-

१२) कोणत्या निधिमधुन खर्च अपेक्षित आहे ?:- महापालिका निधि

(महापालिका/शासकिय)

१३) महानगरपाकलकेच्या निधीमधुन खर्च करणे :- सी-५ (प्प) पी १

असल्यास लेखा शिर्षाचे नांव

i) या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेल्या एकंदर तरतुद :- रू १,००,०००,००

ii) या कामापुर्वी बजेट कंटोल रजिस्टर प्रमाणे शिललक असलेली तरतुद:- रू २२,८८,३९५/-

iii) या कामावरील खर्च:- रू ४,५३,१५०/-

iv) या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्लक:- रू १८,३५,२४५/- रहाणारी तरतुद

उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक १ ते १२ या बाबींचा विचार करता प्रस्तावित केलेल्या कामाची आवश्यकता वाटते. प्रस्तावित असलेल्या कामामुळे नागरीकांना उपलब्ध होणारी सुविधा सार्वजनिक स्वच्छाता, इत्यादी बाबींचाही विचार करता प्रस्तावित उल्हासनगर-२ येथिल येथिल राना ट्रेडिंग जवळील कचरा गाडया खाली करण्याच्या जागेपर्यंत रस्ता खडीकरण करूण व्यवस्थिती बनविणेबाबत.सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्राकलन तयार केले असुन . कामाच्या प्राकलनास मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे शे-यानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १६७ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-२ येथील राणा ट्रेडिंग जवळील कचरा गाडया खाली करण्याच्या जागेपर्यंत रस्ता खडीकरण करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ३६ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ३६:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

*मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- या विषयात अनुक्रमांक १९ वर जे काम दर्शविले आहे तर या कामाची माहिती द्यावी. कारण या ठिकाणी एका बाजुला महापालिकेच्या दवाखान्याची भिंत आहे व एका बाजुला पाणी पुरवठा विभागाच्या टाकीचा भाग आहे. तर कामासाठी रु ३६१ ,७५५/- हा खर्च जास्त आहे.*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- या कामाला आमची देखील हरकत आहे.*

*मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- यापुढे एक विषय आहे, त्यामध्ये पाच लाखाचे काम आहे व निधी फक्त रु २. ५० लाख शिल्लक दाखविला आहे असे असताना ५ लाखांचे काम कसे करणार? याचे उत्तर द्यावे.*

*मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :- आता तेथे भिंत बनवतील व पुन्हा ती तोडतील, असे झाले तर जबाबदारी कोण घेणार ?*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- हा मुददा पुढे ढकला. यामध्ये यामध्ये घोटाळा आहे, काम चुकीचे आहे.*

*मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :- जकात नाक्याच्या कामाबाबत मी सांगु इच्छितो की, एकदा तेथे निविदा काढुन काम करण्यात आले. त्यानंतर पुन्हा वाढीव काम करण्याची आवश्यकता काय आहे?*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- येथे एकाच कामाची दोन-दोन प्राकलने बनविल्याचे दिसुन येते.*

*श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- मी आपल्याला खात्री करुन सांगतो.*

*यावेळी मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी या सभागृहाच्या बाहेर गेल्याने पीठासीन अधिकारी म्हणुन सर्वानुमते श्री विनोद तलरेजा यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर ते पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ झाले.*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप : या कामाचे दुहेरी प्राकलन असल्याचे दिसत असल्याने या विषयामधील अनुक्रमांक १९ वगळण्यात यावा. येथे अशा प्रकारच्या*

*ब-याच गोष्टी घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब पुढील बैठकीत आणुन त्याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.*

*यावेळी मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश करुन त्या पीठासीन अधिकारी या पदावर आसनस्थ झाल्या.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> बाब कमांक १९ वगळण्यात यावी.*

*<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :-</u> जकात नाक्यावर प्लॅटफॉर्म बांधणे आवश्यक असल्याने बांधकाम केले होते.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> याची चौकशी करा.*

*<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u> आता ही बाब वगळण्यात यावी, आम्ही चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती देवु.*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> ही स्थायी समिती अ क्र.१९ वर दर्शविलेले काम वगळुन उर्वरीत १९ कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ३६:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2003-2004 च्या निधीतून कामे करणेसाठी निधी .महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-1 येथीलबॅनं 39 जेठानी यांचे घराजवळ गार्डनचा विकासकरणे(प्रभाग समिती-1. 463) | 99875/- | 20.1.04 | मे सुर्य ज्योत का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर-1 येथील बॅनं 38, 39 जवळ प्रेमीभाई धर्मधाळा समोर सी सी पॅसेज, चेकर्ड टाईल्स व नाली बांधणे. (नगरसेवक निधी 584) | 199900/ | 20.1.04 | मे सुर्य ज्योत का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-5येथील प्रभाग क्र.13 मध्ये बॅ नं 743 ते 746, 713 ते ओमनगर श्री कृष्णा अपार्टमेंट बॅनं 753 गांधी रोड पर्यत नाली दुरूस्ती करणे.(गाडगे महाराज अभियान निधी 595) | 100000/- | 20.1.04 | मे पंचशील म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-3,शास्त्रीनगर,ए टी पी स्कूलच्या बाजूला सार्वजनिक मुत्रालयाची दुरूस्ती करणे (महापालिका निधी 603) | 59,900/- | 20.1.04 | मे शुभलक्ष्मी म.का. सोसा. |
| 5 | उल्हासनगर-1 येथील जनता मित्र मंडळ,शकर मंदिर मागे व आंबिका मंदिर व बॅ नं 13 जवळ सी सी पायवाटा व शौचालय दुयस्ती करणे.(नगरसेवक निधी 622) | 199900/- | 20.1.04 | मे.वर्षा म. का. सोसा. |
| 6 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 6 मधील बॅनं 735 जवळ वडार कॉलनी येथे दहा बैठकिचे शौचालय बांधणे. (गलिच्छ वस्ती निधी 627) | 399140/- | 20.1.04 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| 7 | उल्हासनगर-3 प्रभाग क्र. 19 मधील सातारा कॉलनीतील सी | 199540/- | 20.1.04 | मे श्री. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सी पॅसेज गटार व नाली बाधंणेबाबत (नगरसेवक निधी 640) | | | विनायक म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र.20 मध्ये बॅनं 484 ते 492 जवळ राधा निवास ,अमित अपार्टमेंट जवळ रस्ता एम-250 ने आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधी 643) | 199900/- | 20.1.04 | मे श्री विनायक म. का. सोसा. |
| 9 | उल्हासनगर- येथील प्रभागक्र. 20 मध्येजयहिंद स्कूल, विजय निवास जवळ सी सी पायवाटा आणि नाली बांधणे(नगरसेवक निधी 644) | 199960/- | 20.1.04 | मे शुभलक्ष्मीम. का.सोसा. |
| 10 | उल्हासनगर-2, रंजना रणदिवेयांचे घरापासून व्हाया गायकवाड यांच्या घरापासून ते कचरू यांच्या घरापर्यत 250सी सी रोड बनविणे.(दुर्बलघटक निधी 665) | 149870/- | 20.1.04 | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| 11 | उल्हासनगर-5 येथील कैलास कॉलनी,कमल सर्विस सेंटर मागे नाला दुरूस्ती करणे.(महापालिका निधी 668) | 99000/- | 20.1.04 | मे धनलक्ष्मी म.का. सोसा. |
| 12 | उल्हासनगर-5 येथील पॅनल नं 11 मध्ये बॅनं 1934, 1935 जवळसी सी एम-250 रस्ता बांधणे. (महापौर निधी 682) | 100000/- | 20.1.04 | मे गुरूदेव म.का.सोसा. |
| 13 | उल्हासनगर-5येथील पॅनल 11 मध्ये गणपती मंदिर मागे नाली आणि नाला बांधणे (महापौर निधी 683) | 100000/- | 20.1.04 | मे धनलक्ष्मी म.का.सोसा. |
| 14 | उल्हासनगर-1 मधील धोबीघाट येथे जोशी पेंटर ते सोपान यांच्या घर, अहीरे यांचे घर,रोकडे ते दत्त मंदिरापर्यत सी सी एम-250 ने रस्ता , नाली बांधणे (गलिच्छ वस्ती 701) | 149890/- | 20.1.04 | मे. शिवकृपा म. का. सोसा. |
| 15 | उल्हासनगर-1 पाईप लाईन येथे सी सी पायवाटा, नाल्या बांधणे. (गलिच्छ वस्ती निधी 703) | 149750/- | 20.1.04 | मे शेरावाली म.का. सोसा. |
| 16 | उल्हासनगर-1 येथील हनुमाननगर मध्ये उत्तम अबासे हाऊस दिलीप पगारे, काशीनाथ ते के के धर्मानी, काजळे,वाघ यांचे घराजवळ नाल्या बांधणे (गलिच्छ वस्ती 707) | 150100/- | 20.1.04 | मे श्री क्रिपा म.का.सोसा. |
| 17 | उल्हासनगर-3 महात्मा गांधीनगर,बुडके हाऊस, पुष्पा वलेशा, धनशोमल रोहरा, उल्हासनगर महानगरपालिका शौचालयाच्या बाजूस धनोमल रोहडा,दामु अवघडेव तुटलेल्या सी सी व नाली बनविणे.(गलिच्छ वस्ती निधी 710) | 149850/- | 20.1.04 | मे धनलक्ष्मी म.का. सोसा. |
| 18 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 10 मधील जय जनता कॉलनी मधील सरदार पाडा येथे हरनाम सिंगयांच्या घरापासुन गुरूद्वारा पर्यतची गटारे बांधणे. (गलिच्छ वस्ती निधी 717) | 149200/- | 20.1.04 | मे. श्री मॉम.का सोसा. |
| 19 | उल्हासनगर-3 येथील महापालिकेच्या तरण तलावाच्या मागील बाजूस असलेल्या प्लॉटला संरक्षण भिंत बांधणेबाबत. (महापालिका निधी 753) | 361755/- | 20.1.04 | मे. रिफ्याजीहरी म.का.सोसा. |
| 20 | उल्हासनगर-3,बॅ नं 1074 ते पेहलूमल कंम्पाऊंड पर्यत प्रभाग क्र.8 येथे रोड बनविणे. (नगरसेवक निधी 779) | 199800/- | 20.1.04 | मे. शेरावाली म.का.सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६८ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतचे उपरोक्त कामांपैकी अ.क्र.१९ वर दर्शविलेले काम वगळुन उर्वरीत १९ कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र ३७ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ३७:- उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागातील कार्यालयात लागणारे स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. ३७:- उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागातील कार्यालयात लागणारे स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भांडार विभागाने कार्यालयीन कामासाठी लागणारे स्टेशनरी खरेदी बाबत. राज्यस्तरावरील वर्तमानपत्रामध्ये दिनांक २०.११.२००३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार विहित दिनांक २४.११.२००३ ते दिनांक १.१२.२००३ या कालावधीत खालील पुरवठादारांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. मे. कैलाश एन्टरप्रायजेस उल्हासनगर

२. मे. महादेव एन्टरप्रायजेस उल्हासनगर
३. मे. सर्वेशम एन्टरप्रायजेस डोंबिवली
४. मे. श्रुती प्रिंटर्स उल्हासनगर
५. मे. यश ट्रेडिंग कंपनी डोबिवली

उपरोक्त निविदादारांपैकी मेसर्स कैलास एन्टरप्रायजेस यांनी बाब क्रमांक २ (अ) २ (क) ४,७,१०,२८,३१,३२,४३,४४,४६,४७ व ५० तसेच मेसर्स महादेव एन्टरप्रायजेस यांना बाब क्रमांक १,२५ व ३८ सर्वेशम एन्टरप्रायजेस डोबिवली यांनी बाब क्रमांक ६ (अ), ६ (ब) ९,११,१२ (अ) १२ (ब)१२ (क)१२ (ड)१३ (अ) १३ (ब)१४ (अ)व १४ (ब) मेसर्स श्रुती प्रिंटर्स, यांना बाब क्रमांक १७,१८,१९,२७,२९,३५,३९ व ५४ तसेच मेसर्स यश ट्रेडिंग कंपनी यांना बाब क्र. २ ब ३,५,७,८,१५,१६,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,३०,३३,३४,३६,३७,४०,४१,४२,४५,४९,५१,५२,५३,५५,५६,५७,५८, ५९,६०,६१ व ६२ साठी न्युनत्तम दर सादर केलेले होते.

या सर्व वरील बाबीसाठी एकुण रक्कम रूपये ५,७४,७५०/- (पाच लाख चा-हात्तर हजार सातशे पन्नास मात्र) इतका खरेदी खर्च येणार आहे. सदर स्टेशनरी खर्च अ ३ (१) या लेखाशिर्ष सन २००३-२००४ सालाच्या वित्तिय तरतुदीमधून असुन मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर प्रस्तावास (निविदा) स्थायी समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १६९ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागात लागणारे वर उल्लेखिलेले बाबनिहाय स्टेशनरी साहित्य पुरविणे कामी वरील निविदा स्विकृती योग्य असुन प्रशासनास उक्त लघुत्तमदराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ३८ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ३८:- . प्रभाग क्रमांक २४, टेकडी भागात अश्विनी बंगला ते राजेश निवास पर्यंत २५० रोड व नाली बांधण्याकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

***काही सदस्य :- पास, पास . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

प्रस्तावना

**विषय क्र. ३८:-** . प्रभाग क्रमांक २४, टेकडी भागात अश्विनी बंगला ते राजेश निवास पर्यंत २५० रोड व नाली बांधण्याकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

सूचविलेल्या कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यस्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :- आहे.

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का ? :- आहे.

३) जागेवर असलेली कामाची सद्यस्थिती माहिती :- रस्तात खराब आहे.

४) जागेवर यापुर्वी करण्यात आलेले काम कधी केले होते ? :-

५) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का ? :- आहे.

६) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :- ----

७) १.विकास आराखडयाशी विसंगत असुनही कामाची आवश्यकता आहे का ? :- आहे.

२.कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :- लोकांना रहदारी करीता त्रास होतो आणि लोकांच्या गरजेनुसार नगरसेवकाचे पत्र आले आहे.

८) या कामामुळे नागरिकांना कशाप्रकारे फायदा होणार आहे?
(अंदाजे लाभार्थी) :- १००० ते २५०० लोकांना

९) १.प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :-

२.असल्यास ते कोणते?:- --------

३.सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का? :-
त्याची कारणे.

१०) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान ? :- १५ वर्ष.

११) प्रस्तावित कामाचे अंदाजे अपेक्षित खर्च रूपये:- ३,९९,४२२/-

१२) कोणत्या निधिमधुन खर्च अपेक्षित आहे ?:- महापालिका निधि
(महापालिका/शासकिय)

१३) महानगरपाकलकेच्या निधीमधुन खर्च करणे असल्यास लेखा शिर्षाचे नांव :- नगरसेवक निधी

i) या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेल्या एकंदर तरतुद :- रू ४,००,०००

ii) या कामापुर्वी बजेट कंटोल रजिस्टर प्रमाणे शिललक असलेली तरतुद:- रू ४,००,०००/-

iii) या कामावरील खर्च:- रू ३,९९,४२२/-

iv) या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्लक:- रू ५७८/-

रहाणारी तरतुद

उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक १ ते १२ या बाबींचा विचार करता प्रस्तावित केलेल्या कामाची आवश्यकता वाटते. प्रस्तावित असलेल्या कामामुळे नागरीकांना उपलब्ध होणारी सुविधा, सार्वजनिक स्वच्छाता, इत्यादी बाबींचाही विचार करता व मा.नगरसेवक सुजाता रमेश रिझवानी यांचीही या कामाकरिता मागणी पहाता प्रस्तावित उल्हासनगर-३ वार्ड क्र-२४ टेकडी भागात अश्विनी बंगला त राजेश निवास पर्यंत रोड-२५० व नाला बांधण्या बाबत. सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्राकलन तयार केले असुन सदर कामाच्या प्राकलनास मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे शे-यानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १७० <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार प्रभाग क्रमांक २४, टेकडी भागात अश्विनी बंगला ते राजेश निवास पर्यंत २५० रोड व नाली बांधण्याकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र ३९ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ३९- उल्हासनगर-३ वडोल गांव येथे सार्वजनिक शौचालय बनविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत

*<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> कोणत्त्या जागेवर बनवित आहात. जागा उपलब्ध आहे का?*

*<u>कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य) :-</u> जागा उपलब्ध आहे.*

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> त्या जागेबाबत कोर्टाने डिक्री केलेली आहे. जागा स्मशानासाठी आहे, निट पाहुन घ्या.*

*<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ३९- उल्हासनगर-३ वडोल गांव येथे सार्वजनिक शौचालय बनविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत

सूचविलेल्या कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यस्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :- मोकळी जागा आहे.

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का ? :- सरकारी जागा आहे.

३) जागेवर असलेली कामाची सद्यस्थिती माहिती :- मोकळी जागा आहे. या जागेवर शौचालय बांधण्याचे आहे.

४) जागेवर यापुर्वी करण्यात आलेले काम कधी केले होते ? :- ----------

५) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का ? :- नाही.

६) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :- आहे.

७) १.विकास आराखडयाशी विसंगत असुनही कामाची आवश्यकता आहे का ? :- आहे.

२.कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :- या परिसरात शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे नागरीक मोकळया जागेवर विधी करीत आहेत त्यामुळे वातावरणात दुर्गंधी पसरत आहे.

८) या कामामुळे नागरिकांना कशाप्रकारे फायदा होणार आहे? आहे.

९) १.प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :-नाही.

२.असल्यास ते कोणते? :----

३.सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का? त्याची कारणे. :- आहे वरील ७ (१) प्रमाणे

१०) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान ? :- १० ते १५ वर्ष.

१२) कोणत्या निधीमधून खर्च अपेक्षित आहे? (महापालिका / शासकिय) :-दुर्बल घटक

१३) महानगरपाकलकेच्या निधीमधुन खर्च करणे असल्यास लेखा शिर्षाचे नांव :- सी-४ (XII) पी-२

i) या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेल्या एकंदर तरतुद :- रू ३,८०,००,०००/-

ii) या कामापुर्वी बजेट कंटोल रजिस्टर प्रमाणे शिललक असलेली तरतुद :- रु. ४६,९७,३५०/-

iii) या कामावरील खर्च - रू ४,००,०००/-

iv) या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्लक रहाणारी तरतुद :- रु. ४२,९७,३५०/-

उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक १ ते १३ या बाबींचा विचार करता प्रस्तावित केलेल्या कामाची आवश्यकता वाटते. प्रस्तावित असलेल्या कामामुळे नागरीकांना उपलब्ध होणारी सुविधा, सार्वजनिक स्वच्छाता, इत्यादी बाबींचाही विचार करता व मा.नगरसेवक यांचीही या कामाकरिता मागणी पहाता प्रस्तावित उल्हासनगर-३ वडोल गाव येथे सार्वजनिक शौचालय बांधणे. सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्राकलन तयार केले असुन सदर कामाच्या प्राकलनास

मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे शे-यानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७१ दिनांकः-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-३ वडोल गांव येथे सार्वजनिक शौचालय बनविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ४० वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ४०:- उल्हासनगर-२ रमाबाई आंबेडकर नगर, रुबीचे पेंटर दुकाना जवळ येथे १० बैठकींचे सार्वजनिक शौचालय बनविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

***काही सदस्य :- पास, पास . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

***प्रस्तावना***

विषय क्र. ४०:- उल्हासनगर-२ रमाबाई आंबेडकर नगर, रुबीचे पेंटर दुकाना जवळ येथे १० बैठकींचे सार्वजनिक शौचालय बनविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

सूचविलेल्या कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यस्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :- होया जुणे शैचालय जागेवर.

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का ? :- होये.

३) जागेवर असलेली कामाची सद्यस्थिती माहिती :- आजुबाजुस शैचालय नाही व लोकांना खुप त्रास होतो.

४) जागेवर यापुर्वी करण्यात आलेले काम कधी केले होते ? :- १५ वर्षापुर्वी

५) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का ? :- नाही.

६) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :- होय

७) १.विकास आराखडयाशी विसंगत असुनही कामाची :- होय आवश्यकता आहे का ?

२.कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :- लोकांची गैरसोय दुर करण्याकरिता शैचालय बांधणे आवश्यक आहे.

८) या कामामुळे नागरिकांना कशाप्रकारे फायदा होणार आहे? :- आहे.

(अंदाजे लाभार्थी) :- १००० ते २५०० लोकांना

९) १.प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :-

२.असल्यास ते कोणते? :- --------

३.सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का? :-

त्याची कारणे.

१०) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान ? :- १५ वर्ष.

११) प्रस्तावित कामाचे अंदाजे अपेक्षित खर्च रूपये:- ३,९०,७५०/-

१२) कोणत्या निधिमधुन खर्च अपेक्षित आहे ?:- ------

(महापालिका/शासकिय)

१३) महानगरपाकलकेच्या निधीमधुन खर्च करणे :- सी-८ (XII) टि-२

असल्यास लेखा शिर्षाचे नांव

i) या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेल्या एकंदर तरतुद :- रू ६०,००,०००

ii) या कामापुर्वी बजेट कंटोल रजिस्टर प्रमाणे शिललक

असलेली तरतुद:- रू ३९,५९,९००/-

iii) या कामावरील खर्च:- रू ३,९०,७५०/-

iv) या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्लक:- रू ३५,६९,१५०/-

रहाणारी तरतुद

उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक १ ते १३ या बाबींचा विचार करता प्रस्तावित केलेल्या कामाची आवश्यकता वाटते. प्रस्तावित असलेल्या कामामुळे नागरीकांना उपलब्ध होणारी सुविधा, सार्वजनिक स्वच्छाता, इत्यादी बाबींचाही विचार करता प्रस्तावित उल्हासनगर-२ येथिल रमाबाई आंबेडकर नगर रूबीचा पेंटर दुकान जवळ दहा बैठकीचे शैचालय बांधणबाबत. सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्राकलन तयार केले असुन सदर कामाच्या प्राकलनास मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे शे-यानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिति पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १७२ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-२ रमाबाई आंबेडकर नगर, रुबीचे पेंटर दुकाना जवळ येथे १० बैठकींचे सार्वजनिक शौचालय बनविणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ४१ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४१:- शहरातील विविध ठिकाणच्या विंधन विहिरींवरील हातपंप वार्षिक देखभाल व दुरुस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- या विभागामुळे महापालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. आपण एजन्सी नियुक्त करीत आहात, परंतु शहरात एकही हॅंडपंप व जेटपंप चालु अवस्थेत नाही. सर्व बंद आहेत. एजन्सी काम तरी कसले करणार? ही अशी अवस्था का झाली? याला जबाबदार कोण?

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- जे हॅंडपंप चालु आहेत, त्यांची देखभाल व दुरुस्ती करणार आहेत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- तुम्हाला माहिती नसेल तर मी सांगतो, मी एसटीपी प्लांट चालवायचे काम केलेले आहे. एकदा बोरवेल कोरडी पडली तर परत ती दुरुस्त होत नाही, प्रत्येक प्रभागात किती बोरवेल आहेत ते मी सांगु शकतो. मला याची माहिती आहे. हे जे आकडे देत आहेत ते सर्व बोगस आहेत.

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- माझ्या प्रभागात ३ बोरवेल चालु आहेत.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- माझ्या प्रभागात देखील काही बोरवेल चालु आहेत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- माझ्या प्रभागातील १०० टक्के विंधन विहिरी बंद अवस्थेत आहेत, म्हणुन मी हरकत घेत आहे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- पास करुन टाका.

मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :- पण ठेकेदाराने काम व्यवस्थित करायला हवे.

मा. सदस्या श्रीमती किरण माने :- जेथे जेटपंप नाहीत तेथे नवीन बसविणार आहात काय?

श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :- हा विषय देखभाल व दुरुस्तीचा आहे.

मा. सदस्या श्रीमती किरण माने :- जेथे गरज आहे तेथे जेटपंप लावा.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- ब-याच ठिकाणी बोरवेलचे पाईप सडलेले आहेत, ते बदलणे आवश्यक आहे.

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *एजन्सी नेमा पण योग्य कार्यपध्दती असणे आवश्यक आहे.*

***श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-*** *ठिक आहे, आम्ही त्यांच्यावर पर्यवेक्षण करु.*

***काही सदस्य :-*** *पास, पास . . . . .*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. ४१:- शहरातील विविध ठिकाणच्या विंधन विहिरींवरील हातपंप वार्षिक देखभाल व दुरुस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प १ ते ५ मधील विविध ठिकाणच्या हातपंप देखभाल व दुरूस्ती कामाचे प्राकलन रू. १२,७०,००२/- किंमतीचे मंजुर झालेले आहे.

सदर काम शहरात पाणी टंचाई जाणवत असल्यामुळे तातडीने सुरू करणे आवश्यक आहे. कारण पुर्वीच्या ठेकेदारांची मुदत संपल्यामुळे नवीन काम जवळ जवळ बंद झाले आहे. तरी सदर कामाकरिता रू. १२,७०,००२/- मात्र एवढया किंमतीस प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावे हि विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. १७३ दिनांकः-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री.विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार शहरातील विविध ठिकाणच्या विंधन विहिरींवरील हातपंप वार्षिक देखभाल व दुरुस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** *विषय क्र ४२ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ४२- खडेगोळवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरुस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत

***मा. सदस्य श्री रामदास उमाप :-*** *या आधी पण हा विषय आला होता ना?*

***मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-*** *हा विषय प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचा आहे, तो मुदतवाढीचा होता.*

***मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*** *यापूर्वी ३ वेळा आला होता.*

***<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> तो मुदतवाढीचा होता.***

***<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .***

***<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र.** ४२- खडेगोळवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरुस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत

खडेगोलवली येथीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे मलप्रक्रिया केंद्र वार्षिक तत्वावर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे हे काम खाजगी संस्थाकडून निविदा मागवून करण्यांत येते. सध्या हे काम करित असलेले ठेकेदार मे. ओम इंडस्ट्रीयल इंजि. सर्व्हि, डोंबिवली यांचा कामाचा कालावधी दि. ३१.१.२००४ रोजी संपलेला असून नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदाराने काम सुरू ठेवावे अशी निविदेत अट असल्यामुळे त्यांनी काम पुढे सुरू ठेवले आहे.

पुढील १२ महिन्याच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर ठेकेदार नियुक्त करावयाचा असल्यामुळे या कामासाठी नविन अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्याकरिता रू.१२,६०,३३९/- मात्र इतका खर्च अंदाजित आहे.

त्यानुसार वरील कामाच्या खर्चाचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता स्थायी समिती समोर सादर करण्यांत येते आहे. त्यास मंजुरी मिळावी हि विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १७४ <u>दिनांक:-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार खडेगोळवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरुस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र ४३ वाचुन दाखवितात.***

**विषय क्र.** ४३:- उल्हासनगर-४येथील पॅनेल नं १० मध्ये न्यु इंग्लिश स्कूल ते बॅ क्र ९२६ पर्यंतच्या रस्त्याचा विकास करणेकामी प्रशासनास मे सुमन कन्सट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

***<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .***

*मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-* *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. ४३:- उल्हासनगर-४येथील पॅनेल नं १० मध्ये न्यु इंग्लिश स्कूल ते बॅ क्र ९२६ पर्यंतच्या रस्त्याचा विकास करणेकामी प्रशासनास मे सुमन कन्सट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

| | | |
|---|---|---|
| 1) | कामाचे नांव | उल्हासनगर-4 येथील पॅनल नं. 10 मध्ये न्यु इंग्लिश स्कूल ते बॅ 926 पर्यतचा रस्ता विकास करणेबाबतच्या कामच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. |
| 2) | प्राकलनाची किंमत | 19,00,000/- |
| 3) | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| 4) | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 899 दि. 02.07.2003 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. 53 दिनांक 24.07.2003 |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 10 दिनांक 16/08/2003 |
| 7 | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | 1. अेश्चन एज 2. नगर न्युज 3. धनुष्यधारी |
| 8 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 16 |
| 9 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 4 |
| 10 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 02/09/2003 |
| | | |

11 निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता

| अनु | निविदाधारकाचे नांव | |
|---|---|---|
| 1 | मे. अे.एम. रामचंदानी | 0. 15 टक्के कमी दराचे |
| 2 | मे. सुमन कन्स्ट्रक्शन | 12. 00 टक्के जास्त दराचे |
| 3 | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | निविदा उघडलेली नाही. |
| 4 | मे. प्रकाश एन. रामसिंघानी | निविदा उघडलेली नाही. |
| 12 | निविदाधारकांशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | सर्वात कमी दर असलेले निविदाकार मे. अे. एम. रामचंदानी यांना त्यांचे दर कमी करण्याकरिता वाटाघाटी करिता दि. 11. 09.2003 रोजी बोलविले होते. या बैठकीत कार्यकारी अभियंता (साबा)मुख्य लेखा अधिकारी मुख्य लेखा परिक्षक व निविदाकार मे. अे. एम. रामचंदानी हे उपस्थित होते. यावेळी मे. अे. एम. रामचंदानी वाटाघाटी न करता असे सुचविले की नवीन सन 2003-2004 चा डिएसआर शासनाने लागू केलेला आहे. सद्यस्थितीत साहित्यांचे दर वाढलेले आहे. त्यामुळे नवीन डिएसआर सन 2003-2004 नुसार दरामध्ये वाटाघाटी करण्यास विनंती केले होती. त्यानंतर मा. आयुक्त यांनी आदेश दिले की, ही निविदा नवीन दरावर वाटाघाटी |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यासाठी ही निविदा ज्या ठेकेदारांनी भरलेली आहे. त्यांना सर्वांना बोलावून नव्याने डिएसआर सन 2003-2004 प्रमाणे दरामध्ये वाटाघाटी करावी. त्यानंतर दिनांक 6.10.2003 रोजी मोहोरबंद देकार मागविण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त खर्च निविदाकारांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त निविदाकारांनी त्यांचे मोहोरबंद देकार दिनांक 6.10.2003 रोजी मा. आयुक्त समक्ष आणून दिल्यानंतर त्याचवेळी उघडण्यात आले होते. त्यामध्ये खालील प्रमाणे देकार दिल्याचे आढळले आहेत. मे. सुमन कन्स्ट्रक्शन यांनी सुधारित दरानुसार 8. 25 टक्के कमी हे भरलेले आहे. व मे. अे. एम. रामचंदानी यांनी सुधारित दराने 5. 51 टक्के हे दर भरलेले आहे. मे. सुमन कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटी नंतर निविदा दरावर काम करण्यास मान्य केल्यामुळे मे. सुमन कंन्स्ट्रक्शन यांनी भरलेले 8. 25 टक्के कमी दराने असल्याने त्यांची निविदा ग्राहय धरून मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केली आहे. |
| 13 | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | 8. 25 टक्के कमी दरावर |
| 14 | लेखा शिर्षाचे नांव | सी- 4 (ii) पी-2 रस्ता व प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| 15 | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. 500 कोटी |
| 16 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 26/06/03 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. आयुक्त यांचेकडे मे. मयुर कस्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. मयुर कस्ट्रक्शन यांनी त्याचे पुर्वीचे 4.90 टक्के जास्त दरामध्ये 9.90 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 5.00 टक्के कमी इतका होत होता. |
| 17 | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | 5.00 टक्के कमी दर निविदेपेक्षा |
| 18 | उपरोक्तपणे वाटाघाटीनंतर केलेली कार्यवाही | स्थायी समितीच्या दि. 24/7/03 च्या बैठकिच्या पटलावर ठेवला होता. |
| 19 | स्थायी समितीतर्फे झालेली कार्यवाही | स्थायी समितीमध्ये या विषयावर चर्चा होऊन सदर निविदेचे दर आणखी कमी करणेकरिता संबंधित निविदाकार यांचेशी पुन्हा वाटाघाटी करणेकरिता सूचना देण्यात आल्या होत्या. |
| 20 | स्थायी समितीच्या सुचनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करण्यात आलेली कार्यवाही | मे मयुर कन्स्ट्रक्शन यांना पुन्हा वाटाघाटी करिता बोलविण्यात आले होते. यावेळी त्यांनी त्यांचा 5% कमी दरापेक्षा आणखी दर कमी करण्यास, डांबराचे दर वाढलेले असल्याने नकार दिलेला आहे. दरम्यान शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याने लागू केलेली नवीन 2003-2004 दरसुची महानगरपालिकेस प्राप्त झाली असून या दरसुचीनुसार या कामाच्या होणा-या किंमतीपेक्षा 7.89% ने कमी होत आहे. त्यामुळे सदर दर वाजवी वाटत असल्याने मंजुरीकरिता पूर्नप्रस्तावित केले आहे. |
| 21 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(ii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| 22 | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. 5.00 कोटी |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारशीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स मे.

सुमन कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १७५ दिनांक:-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-४ येथील पॅनल क्र. १० मध्ये न्यु इंग्लिश स्कुल ते बॅ. क्र. ९२६ पर्यंतचा रस्ता विकसित करणे कामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. सुमन कंन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र ४४ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ४४:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग, वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत २८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- आमच्या प्रभागातील प्रस्ताव श्री शिर्के यांनी बनविले होते, ते यामध्ये आले नाहीत.*

*मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- हे २८ कामांचे प्रस्ताव येथे आलेले आहेत. तेथे शौचालये बनविणार आहात. तर तेथील जागा महापालिकेच्या मालकीची आहे काय? अन्यथा पुढे जावुन त्याचा त्रास होवु शकतो. माझ्या प्रभागात शिवशक्ती कॉलनी येथे शौचालय बनवायचे आहे. तेथील लोकांनी महापालिकेत येवुन विनंती केली असता महापालिकेने त्यांना जागा मालकीची असल्यास बनवु असे पत्र दिले आहे. तर या ठिकाणी पण जागा मालकीची आहे काय?*

*कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :- या सर्व घोषित झोपडपट्टया आहेत. तसेच कागदावर जागेची मालकी महापालिकेकडे आहे.*

*मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- आपण असे शौचालये बनवतो व नंतर मग जागेच्या मालकीबाबत आपल्याकडे तक्रारी येतात.*

*मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- जागेची मालकी कोणाकडे आहे?*

*कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :- विकास आराखड्यात या सर्व आरक्षित जागा आहेत. जर जागेच्या मालकीबाबत काही अडचण असल्यास ते काम सुरु झाल्यानंतर माहिती पडेल.*

*मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा :- मी सांगतो जागा आपली नाही.*

***मुख्य लेखा अधिकारी :-*** *बहुतेक ठिकाणी ६० टक्के पर्यंत बांधकाम झालेले आहे.*

***कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :-*** *या सर्व घोषित झोपडपट्टया असल्याने जागेची मालकी अशी कोणाकडे नाही.*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *आजकाल आरक्षित भुखंडावरपण सनद मिळते. उल्हासनगर मध्ये असे झालेले आहे. आपण बघतो की, कसे बोगस प्लान मंजुर केले जातात. तेलगी स्कॅंडल उल्हासनगरला देखिल लागु आहे.*

***काही सदस्य :-*** *पास, पास .....*

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

विषय क्र. ४४:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग, वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत २८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील वाल्मिकी आंबेडकर आवास योजना अंतर्गत खालील कामांना मिळालेल्या मंजुरीची माहिती स्थायी समितीस देणे करीता.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 18 सरस्वती नगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 120) | 399244/- | 30.1.04 | मे ओ एस आर कन्स्ट्रक्शन |
| 2 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 18 भिमनगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे. (वांम्बी निधी 121) | 399244/- | 9.1.04 | मे शैलेश कन्स्ट्रक्शन |
| 3 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 18 इदिरानगर येथे 10 बैटकिचे शौचालय बांधणे. (वांम्बी निधी 122) | 399244/- | 17.1.04 | मे बालचंद एस कटटर |
| 4 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 18 मिलींद नगर प्रायमरी शाळा क्र. 14 जवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 123) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 5 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. महात्माफुले नगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 124) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 6 | उल्हासनगर-5 येथील महात्मा फुले नगर प्रभाग क्र. 13 येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे (वांम्बी निधी 125) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 7 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 ज्योतीबा फुलेनगर येथे 10बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 126) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 8 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. पटेल नगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 127) | 399244/- | 9.1.04 | मे सुदेश स्टील इंडस्ट्रिज |
| 9 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. पटेलनगर येथील 10 बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 128) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 10 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 11 वीर तानाजीनगर, रविंद्रनगर लेखराज वाधवाणी घराजवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे (वांम्बी निधी 129) | 399244/- | 9.1.04 | मे श्री क्रिष्णा कन्स्ट्रक्शन |
| 11 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 17, संतोषनगर येथे 10 | 399244/- | 9.1.04 | मे ए एम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 130) | | | रामचंदानी |
| 12 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 18 गीता कॉलनी येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 131) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 13 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. गायकवाडा पाडा येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 132) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 14 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 11 नेहरूनगर केशव पंडीत शुज हाऊस जवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे (वांम्बी निधी 133) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 15 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 19 विठठलवाडी झोपडपटटी इंदिरा नगर येथे 10 बैठकिचे शौचालयबांधणे(वांम्बी निधी 134) | 399244/- | 9.1.04 | मे सुदेश इंटरप्राईजेस |
| 16 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 13 हरीजन क्वॉटर्स सफाई कामगार इमारतीजवळ 10 बैठकिचे शौचालच बांधणे (वांम्बी निधी 135) | 399244/- | 9.1.04 | मे शैलश कन्स्ट्रक्शन |
| 17 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 14 राहुलनगर येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 136) | 399244/- | 9.1.04 | मे सुदेश इंटरप्राईजेस |
| 18 | उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. 25 शिवाजीनगर सोप फॅक्टरी जवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे (वांम्बी निधी 137) | 399244/- | 9.1.04 | मे श्री गणेश म. का. सोसा |
| 19 | उल्हासनगर-3 येथील सुभाषनगर येथे धरमेंद्र यांचे घरासमोर 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 138) | 399244/- | 9.1.04 | मे जय अंबे कन्स्ट्रक्शन |
| 20 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 10 समतानगर नं 2 मोती स्वामी यांचे घर आणि शमशान भुमी यांचे मध्ये 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 139) | 399244/- | 9.1.04 | मे. श्री क्रिष्णा कन्स्ट्रक्शन |
| 21 | उल्हासनगर-1 येथील प्रभाग क्र. 9 भारतनगर नागसेन कॉलनी येथे 10बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 140) | 399244/- | 9.1.04 | मे सुदेश इंटरप्राईजेस |
| 22 | उल्हासनगर-1 येथील प्रभाग क्र. 1 येथे 10 बैठकिचे शौचालय बांधणे.(वांम्बी निधी 142) | 399244/- | 9.1.04 | मेशैलेश कन्स्ट्रक्शन |
| 23 | उल्हासनगर-1 येथील प्रभाग क्र. 1 राजीव गांधीनगर येथे अंधूर यांचे घराजवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे(वांम्बी निधी 143) | 399244/- | 9.1.04 | मे शैलेश कन्स्ट्रक्शन |
| 24 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 12 कच्ची पाडा येथे बॅरं 1782 जवळ रानोजी यांचे घराजवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे. (वांम्बी निधी 144) | 399244/- | 9.1.04 | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन |
| 25 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 6 शास्त्रीनगर येथे लक्ष्मण तबेला जवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे (वांम्बी निधी 145) | 399244/- | 9.1.04 | मे जय अंबेकन्स्ट्रक्शन |
| 26 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 1 करोतीया नगर येथे दयाराम यादव यांचे घरामागे 10 बैठकिचे शौचालय बांधणे वांम्बी निधी 146) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 27 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. आंबेडकर नगर किशोर पवार यांचे घराजवळ 10 बैठकिचे शौचालय बांधणे. वांम्बी निधी 147) | 399244/- | 9.1.04 | मे ए एम रामचंदानी |
| 28 | उल्हासनगर-1 येथील प्रभागक्र. 3 हनुमान नगर मिरा कन्होजीया यांचे घर येथे 10 बैठकिचे शौचालय बांणणे वांम्बी निधी 148) | 399244/- | 9.1.04 | मे जय अंबे कस्ट्रक्शन |

उपरोक्त निविदांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७६ दिनांकः-९.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील २८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*यावेळी मुख्य लेखा अधिकारी हे विषय कमांक १० शी संबधित माहिती घेवुन आले.*

*विषय कमांक १० पुढे चालु :----*

*मुख्य लेखा अधिकारी :- रु. ६६ ,२०० जमा झालेले आहेत.*

*मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- सध्या महापौर चषक स्पर्धा चालु आहे, त्यामुळे उर्वरित रक्कम जमा करण्यास वेळ मिळाला नसेल.*

*मा. सदस्या श्रीमती किरण माने :- या सर्व सामानामध्ये वस्तुंचे भाव दुप्पट लावले आहेत.*

*श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- हे सर्व अंदाजित भाव आहेत. रु ३५१ ,००० हा अंदाजे खर्च आहे.*

*मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :- हे सर्व भाव दुप्पट लावलेले आहेत. बाजारभावाप्रमाणे लावलेले नाहीत.*

*मा. सदस्या श्रीमती किरण माने :- तुम्ही जेव्हा स्थायी समितीसमोर विषय आणता तेव्हा नीट बघुन आणायला हवे.*

*श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- आम्ही दरपत्रके मागवुन सर्व खरेदी करणार आहोत.*

*मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- आता आपण पास करुया, खरेदी नंतर होईल तेव्हा परत आपल्यासमोर येईल.*

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> यामध्ये स्टंपची किंमत रु ६०० दर्शविली आहे, बाजारात ते ३०० रुपयाला मिळतात. सर्व भाव वाढवुन लावलेले आहेत.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> ही दरवर्षीची प्रथा आहे. या वर्षी आम्ही खर्च कमी केलेला आहे. शुटींग व थेट प्रक्षेपण केलेले नाही. त्याचा खर्च वाचलेला आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> स्पर्धेसाठी ज्या वस्तु लागणार होत्त्या त्या आधीच खरेदी का केल्या नाहीत.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> आम्ही अजुन खरेदी केलेली नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> तुमच्याकडे वस्तुंचे नमुने आहेत काय?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> आहेत.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> किंमती काय आहेत?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> आम्ही रु ५०००० वरची सर्व खरेदी निविदा मागवुन करणार आहोत. ही फक्त प्रशासकीय व वित्तीय मान्यता आहे यानंतर पुन्हा आपल्यासमोर मान्यतेसाठी विषय येणार आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> ठेकेदाराने दर नमुद केले आहेत काय?

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> तुम्ही ज्या किंमती अंदाजे दर्शविलेल्या आहेत त्या चुकीच्या आहेत.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> हा प्रस्ताव क्रिडा समितीमार्फत येतो. समितीने प्रस्ताव दिल्यानंतर आम्ही तो जसाच्या तसा तुमच्या समोर ठेवलेला आहे. हा प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> मी बाजारात भाव काढलेले आहेत. माझ्याकडे दरपत्रक आहे त्यामध्ये यापेक्षा कमी भाव दिलेले आहेत.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> अजुन खरेदी केलेली नाही, निविदा येईल त्यानंतर खरेदी होईल.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:-</u> जेव्हा स्थायी समितीत प्रस्ताव आणला जातो तेव्हा तो स्पष्ट असायला हवा. या गोषवा-यावर आयुक्तांची देखिल स्वाक्षरी आहे. वस्तुंची आवश्यकता होती तर आधीच मागवायला हव्या होत्त्या. तुम्ही म्हणता खरेदी नाही केली, मग तिकडे खेळ कसा चालु आहे?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> आम्ही दरपत्रक मागवुन रु ५०००० फक्त खर्च केलेला असुन त्यामधुन सध्या स्पर्धा चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> एका खुर्चीचे प्रतिदिवस भाडे किती आहे?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> एका दिवसाचे एका खुर्चीचे रु ५ एवढे भाडे आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> यात दर चुकीचे लावलेले आहेत. यामध्ये जेवढया खुर्च्या दर्शविल्या आहेत तेवढया प्रत्त्यक्षात तेथे नाहीत.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> हे सर्व चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> त्यांना रु ५०००० पर्यंत खर्च करायची अनुमती दिलेली आहे. ते ऑन अकाउंट दिलेले आहेत.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> असे असेल तर स्थायी समितीत विषय आणता तरी कशाला ?

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> माहिती पुर्ण द्या.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> माहिती नंतर येईल, आता फक्त मंजुरी द्यायची आहे.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> पुढील मंजुरीसाठी विषय महासभेत येईल.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> आम्ही मंजुरी देणार नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> सर्व भाव दुप्पट लावलेले आहेत. आमच्याकडे सविस्तर दरपत्रक आहे.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> आम्ही निविदा काढणार आहोत, त्यावेळी त्यांना निविदा भरायला सांगा. ते तेव्हा निविदेत भाग घेवु शकतात. आता आम्ही फक्त प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेत आहोत. त्यानंतर निविदा प्रकिया होईल.

<u>मा. सदस्य श्रीमती रामदास उमाप :-</u> या सर्व प्रस्तावित किंमती आहेत. आपण निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेत आहात. त्यानंतर मंजुरीसाठी पुन्हा स्थायी समितीकडे येईल. तुमच्या एजन्सीला निविदा भरायला सांगा.

<u>मुख्य लेखा अधिकारी :-</u> प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिल्याशिवाय निविदा मागविता येत नाही.

**यावेळी मा. सदस्य श्री रामदास उमाप हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :</u> तेथे स्पर्धा चालु आहेत तेथे सर्व कामे सफाई कामगारच करीत आहेत.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :</u> तेथे महापालिकेचे कर्मचारीच काम करीत आहेत.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> तुम्ही आम्हाला अशा कर्मचा-यांची नांवे द्या, आम्ही त्यांच्यावर कारवाई करु.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :</u> आम्ही तेथे गेले होतो तेव्हा चहा देखिल मिळाला नाही.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> ही फक्त प्रशासकीय व वित्तीय मान्यता आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> या सर्व अंदाजित किंमती आहेत.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> सर्व किंमती दुप्पट लावलेल्या आहेत.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> निविदेच्या वेळी दर यापेक्षा कमी देखिल येवु शकतात.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> आमचा विरोध आहे.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सचिव साहेब या प्रस्तावावर मतदान घेण्यात यावे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत .

<u>८ मते :</u>

१ श्रीमती ज्योती कलानी
२ श्री नरेंद्रकुमार ठाकुर
३ श्री विनोद तलरेजा
४ श्रीमती भारतीय छाब्रिया
५ श्री सतरामदास जेसवानी
६ श्री नारायण पंजाबी
७ श्री ईश्वर पमनानी
८ श्री पृथ्वी वलेचा

जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत .

<u>३ मते :</u>

१ श्रीमती जयश्री सुर्वे
२ श्रीमती नंदिनी बामणकर
३ श्रीमती किरण माने

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. १०:-मा. महापौर चषक क्रिकेट स्पर्धेकामी अंदाजित रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

सालाबाद प्रमाणे यावर्षी २००४ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्रिडा समिती तर्फे दिनांक २७ जानेवारी, २००४ ते २८ फेब्रुवारी, २००४ पर्यंत मर्यादित षटकांची मा. महापौर चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे. पुर्वी फक्त २०० क्रिकेट संघाना प्रवेश देणेच ठरले होते परंतु मा. आयुक्त साहेब व मा. सभापती क्रिडा समिती यांचे चर्चेनंतर येणा-या प्रत्येक संघास प्रवेश देणेचे ठरल्यानंतर एकूण ४४० संघानी प्रवेश घेतला, सदरची स्पर्धा एकूण ३४ दिवस चालणार आहे.

या स्पर्धेसाठी होणा-या अंदाजीत खर्चाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

१. क्रिकेट साहित्य

| | |
|---|---|
| अ) टेनिस बॉल (सुपर खन्नामेक)६०० नग | २४,०००/- |
| ब) स्टॅम्प १२ नग | <u>६००/-</u> |
| क) स्कोर बुक (लहान साईज) १५० नग | २,०००/- |
| ड)चुना गोणी ४० पोती | २,०००/- |
| इ)रस्सी बंडल १० नग | १,०००/- |
| ई)पंचा करीता टोपी ४ नग | <u>४००/-</u> |

प) सीटी १० नग — १००/-

---

३० ,१००/-

२. खुर्च्या भाडेसाठी २०० नग (३० दिवसांसाठी)
रु. ६/- प्रत्येकी दर दिवशी — २० ,४००/-
टेबल १० नग (३४ दिवसांसाठी)
रू. ४०/- प्रत्येकी दर दिवशी — १३ ,६००/-

३. मंडप १० फुट १० फुट स्कोरसाठी (३४ दिवसांसाठी)
१५०/- प्रत्येकी दर दिवशी — ५ ,१००/-

४. ध्वनी क्षेपण सर्व साहित्त्यासह
प्रत्त्येक दिवस १२००/- (३४ दिवसांसाठी) — ४० ,८००/-

५. क्रिकेट स्पर्धासाठी पंच २ व्यक्ती
प्रत्येक व्यक्तीस ३००/- याप्रमाणे (३४ दिवसांसाठी) २० ,४००/-

६. स्कोरर २ व्यक्ती
प्रत्येकी २००/- दर दिवशी (३४ दिवसांसाठी) — १३ ,६००/-

७. समालोचक यांचे मानधन २ व्यक्ती,
प्रत्येक व्यक्तीस दररोज २०० रूपये
(३४ दिवसांसाठी) — १३ ,६००/-

८. स्वयंसेवक दर दिवशी १० व्यक्ती
प्रत्येक दिवशी १००/- (३४ दिवसांसाठी) — ३४ ,०००/-

९. अल्पोपहार व चहा
मान्यवर व्यक्ती, नगरसेवक, कार्यालयीन कर्मचारी,
पोलिस कर्मचारी पंच, स्कोरर व समालोचक,
स्वयंसेवक यांना दररोज चहा, पाणी व अल्पहार
प्रत्येक दिवशी ४०/- एक व्यक्तीचे असे
एकुण ५० व्यक्तींचे (३४ दिवसांसाठी) — ६८ ,०००/-

१०. छपाई खर्च, प्रमाणपत्र ६०० नग — १० ,०००/-

११. पारीतोषिके
१. प्रथम फेरी ते अंतिम फेरी पर्यंत हरणा-या संघास १ बॅट फुल साईज महापौर यांच्या स्वाक्षरीने प्रत्येक बॅट १९५/- ६४ नग — १२ ,४८०/-
२. प्रथम फेरी विजेता मेटल कप १२ इंच एका नगास ४०० रू या प्रमाणे ३२ नग — १२ ,८००/-
३. दुसरी फेरी विजेता मेटल कप १५ इंच एका नगास ६०० याप्रमाणे १६ नग — ९ ,६००/-
४. तिसरी फेरी विजेता मेटल कप १५ इंच एका नगास ८०० या प्रमाणे ८ नग — ६ ,४००/-
५. चौथी फेरी विजेता मेटल कप २० इंच एका नगास १००० या प्रमाणे ४ नग — ४ ,०००/-
६. सेमी फायनल विजेता व उत्त्कृष्ठ फलंदाज, गोलंदाज क्षेत्र रक्षक २२ इंच एका नगास १२०० या प्रमाणे ६ नग — ७ ,२००/-
७. अंतिम फेरी उप विजेता सिल्वर कोट्रेड २ फुट एका नगास २५०० — २५००/-
८. विजेता सिल्वर कोटेड अंतिम फेरीत २ फुट ६ इंच १ नगास ३ ,५००/- — ३ ,५००/-

------------------------

५८,४८०/-

१२. फोटोग्राफरचा खर्च दिनांक २६.१.२००४ व दिनांक २८.१.२००४ यादिवशी प्रत्येक दिवशी १०० फोटो असे २ दिवसांचे २०० फोटो ४ इंच x ६ इंच साईजचे फोटो प्रत्येक नगास २०/- रूपये याप्रमाणे ४०० फोटो — ८००/-

१३. अंतिम दिवसाचा खर्च

| | |
|---|---|
| अ. १०फुट x ८० फुट स्टेजवर कपडा | १,०००/- |
| ब. शाल ५० नग रूपये १५०/- प्रत्येक नगास | ७,५००/- |
| क. फुलाचा हार ५० नग | १,२५०/- |
| ड. नारळ ५० नग | २५०/- |
| | १०,०००/- |

१४. १०फुट x ६ फुट क्रिकेट पिच बनविण्यासाठी — ५,०००/-

यापुर्वी एकूण अंदाजित खर्च रूपये ५,१०,०००/- होता परंतु स्पर्धा दिवसरात्र ऐवजी फक्त दिवसा घेणेचे ठरले हा फेरबदल केल्यानंतर एकुण खर्च रूपये ३, ५१,०००/- होणार आहे. हा खर्च अंदाजपत्रकातील शिर्ष अ मधील उपशिर्ष ३ या राखीव निधीतुन करावयाचा आहे. याकरिता प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.१७७** — **दिनांकः-९.२.२००४**

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००४-२००५ महापौर चषक आयोजनाकामी लागणारे सामुग्री किंवा मालासंबंधी प्रशासनाने अंदाजित केलेल्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. आणि सर्व परीस्थिती विचारात घेता प्रशासनास फायदेशिर वाटेल अशा आवश्यक कंत्राटदाराशी निविदाशिवाय किंवा निविदा स्विकारल्यानंतर संविदा करण्यास प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**बहुमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):*** आज प्रशासनाच्या वतीने आयत्या वेळचे विषय म्हणुन ४ प्रस्ताव आणलेले आहेत, आपल्यापैकी बहुसंख्य सदस्यांची मान्यता असल्यास सदरचे विषय आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येतील.

***मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-*** सदरचे विषय आयत्या वेळचे विषय म्हणुन आजच्या सभेच्या कामकाजात सर्वानुमते समाविष्ट करण्यात येत आहेत.

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-*** विषय क्र ४५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४५:- उल्हासनगर- येथील चार्ली वेफर ते सेंन्चुरी कंपनीचे मटेरियज गेट पर्यतचा रस्ता बांधणे आणि रूंदीकरणे करणे.

***काही सदस्य :-*** पास, पास . . . . .

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-*** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ४५:- उल्हासनगर- येथील चार्ली वेफर ते सेंन्चुरी कंपनीचे मटेरियज गेट पर्यतचा रस्ता बांधणे आणि रूंदीकरणे करणे.

| | | |
|---|---|---|
| 1) | कामाचे नांव | उल्हासनगर- येथील चार्ली वेफर ते सेंन्चुरी कंपनीचे मटेरियज गेट पर्यतचा रस्ता बांधणे आणि रूंदीकरणे करणे. |
| 2) | प्राकलनाची किंमत | 28,28,900/- |
| 3) | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| 4) | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 588 दि. 19.03.2003 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. 17 दिनांक 12/05/2003 |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 55 दिनांक 30/05/2003 |
| 7 | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | 1. फ्री प्रेस 2. नगर न्युज |
| 8 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 14 |
| 9 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 12 |
| 10 | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक 21/06/2003 |
| 11 | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| 1 | मे. मयुर कन्स्ट्रक्शन | 4.90 टक्के जास्त |
| 2 | मे. ए एम रामचंदानी | 5.00 टक्के जास्त |
| 3 | मे. आशिर्वाद कन्स्ट्रक्शन | 9.00 टक्के जास्त |
| 4 | मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन | 10.09 टक्के जास्त |
| 5 | मे. श्री क्रिष्णा कन्स्ट्रक्शन कं. | 14.40 टक्के जास्त |
| 6 | मे. अनिलराज कन्स्ट्रक्शन | 14.50 टक्के जास्त |

| | | |
|---|---|---|
| 7 | मे संध्या कन्स्ट्रक्शन | 18.00 टक्के जास्त |
| 8 | मे एम सी चंदनानी कन्स्ट्रक्शन | 19.00 टक्के जास्त |
| 9 | मे इंद्रदिप कन्स्ट्रक्शन | 22.00 टक्के जास्त |
| 10 | मे जकनुश मजुर कामगार | 24.00 टक्के जास्त |
| 11 | मे व्ही एम हजरजानी | 25.00 टक्के जास्त |
| 12 | मे जय हिंद इंफ्रास्ट्रक्चर | निविदा उघडण्यात आलेली नाही . |
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 26/06/03 रोजी सकाळी 11.00 वाजता मा. आयुक्त यांचेकडे मे. मयुर कस्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. मयुर कस्ट्रक्शन यांनी त्याचे पुर्वीचे 4.90 टक्के जास्त दरामध्ये 9.90 टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा 5.00 टक्के कमी इतका होत होता. |
| 13 | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | 5.00 टक्के कमी दर निविदेपेक्षा |
| 14 | उपरोक्तपणे वाटाघाटीनंतर केलेली कार्यवाही | स्थायी समितीच्या दि. 24/7/03 च्या बैठकिच्या पटलावर ठेवला होता. |
| 15 | स्थायी समितीतर्फे झालेली कार्यवाही | स्थायी समितीमध्ये या विषयावर चर्चा होऊन सदर निविदेचे दर आणखी कमी करणेकरिता संबंधित निविदाकार यांचेशी पुन्हा वाटाघाटी करणेकरिता सूचना देण्यात आल्या होत्या. |
| 16 | स्थायी समितीच्या सुचनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करण्यात आलेली कार्यवाही | मे मयुर कन्स्ट्रक्शन यांना पुन्हा वाटाघाटी करिता बोलविण्यात आले होते. यावेळी त्यांनी त्यांचा 5% कमी दरापेक्षा आणखी दर कमी करण्यास, डांबराचे दर वाढलेले असल्याने नकार दिलेला आहे. दरम्यान शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याने लागू केलेली नवीन 2003-2004 दरसुची महानगरपालिकेस प्राप्त झाली असून या दरसुचीनुसार या कामाच्या होणा-या किंमतीपेक्षा 7.89% ने कमी होत आहे. त्यामुळे सदर दर वाजवी वाटत असल्याने मंजुरीकरिता पूर्नप्रस्तावित केले आहे. |
| 17 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(ii) पी-2 रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| 18 | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. 14.00 कोटी |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे मयूर कन्स्ट्रक्शन कं. यांचे वाटाघाटी अंती असलेली ५: कमी दराची निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स मयुर कन्स्ट्रक्शन कं. यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १७८
दिनांक:—९.२.२००४

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर—२ येथिल चार्ली वेफर ते सेंच्युरी रेयॉन कंपनीचे मटेरियल गेट पर्यंतचा रस्ता बांधणे व रुंदीकरण करणे कामी वाटाघाटी अंती प्रशासनास मे. मयूर कन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :—** विषय क्र ४६ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ४६**:—उल्हासनगर— ४ येथील प्रभाग क्रमांक १८ येथे नारी शाळेजवळ ओ टी सेक्शन येथे नविन समाज मंदिर बांधणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

**काही सदस्य :—** पास, पास.....

**मा सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे

**प्रस्तावना**

**विषय क्र. ४६**:—उल्हासनगर— ४ येथील प्रभाग क्रमांक १८ येथे नारी शाळेजवळ ओ टी सेक्शन येथे नविन समाज मंदिर बांधणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

मा. महापौर सौ मालती राधाचरण करोतिया यांनी त्यांचे पत्र क्र. उमपा/महापौर कार्यालय/ २१३/०३, दिनांक १३ नोव्हेंबर, २००३ च्या पत्रानुसार उल्हासनगर— ४ येथील प्रभाग क्रमांक १८ येथे नारी शाळेजवळ ओ टी सेक्शन येथे नविन समाज मंदिर बांधणेची मागणी केलेली आहे. उक्त कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यास्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :—आहे

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का? :—आहे

३) जागेवर असलेली कामाची सद्यास्थिती माहिती :— २५द्ध६०' जागा आहे व त्यालगत वापरात नसलेले जूने शौचालय आहे.

४) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का?:— नाही रहिवाशी जागा आहे १२७३ जवळ आहे.जुना शैचालयावर आहे

५) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :—

६) प) विकास आराखडयाशी विसंगत असूनही कामाची आवश्यकता आहे का ? :—आहे

पप) कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :—समाज मंदिर बांधल्यास १)सरस्वती नगर, २)शिवशक्ती कॉलनी ३)भिमनगर ४) इंदिरानगर ५)मिलींदनगर ६)जागृती कॉलनी या सर्व परिसरांतील नागरिकांना सार्वजनिक कार्यक्रम तसेच धार्मिक कार्यक्रमासाठी वापरण्यास फायदा होईल.

७) या कामामुळे किती नागरिकांना फायदा होणार आहे (अंदाजे लाभाथध) :—उपरोक्त नागरीकांना

८) प) प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :—नाही

पपद्ध असल्यास ते कोणते ? :———

पपपद्ध सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का ? त्याची कारणे. :—

९) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान :—५० वर्षे

१०) प्रस्तावित कामावर अंदाजे अपेक्षित खर्च रूपये :—४,९९,९८०/—

११) कोणत्या निधिमधून खर्च अपेक्षित आहे :-महापौर निधीतून(महापालिका)

(महापालिक/शासकीय)

12) महानगरपालिकेच्या निधीमधून खर्च करणे असल्यास

लेखा शिर्षाचे नांव :-महापौर निधी

i) या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेली एकंदर तरतूद:- रू. 50,00,000/-

ii) या कामापूर्वी बजेट कंट्रोल रजिस्टर प्रमाणे
शिल्लक असलेली तरतूद :- रू. 8,76,069/-

iii) या कामावरील खर्च :- रू. 4,99,980/-

iv) या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्लक
रहाणारी तरतूद :- रू. 3,76,089/-

उपरोक्त नमुद केलेल्या अनुक्रमांक १ ते १३ या बाबींचा विचार करता प्रस्तावित केलेल्या कामाची आवश्यकता वाटते. प्रस्तावित असलेल्या कामामुळे नागरीकांना उपलब्ध होणारी सुविधा, सार्वजनिक स्वच्छाता, इत्यादी बाबींचाही विचार करता व मा. महापौर सौ मालती राधाचरण करोतिया यांची याकाकरिता मागणी पहाता प्रस्तावित उल्हासनगर- ४ येथील प्रभाग क्रमांक १८ येथे नारी शाळेजवळ ओ टी सेक्शन येथे नविन समाज मंदिर बांधणे सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्राकलन तयार केले असुन सदर कामाच्या प्राकलनास मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे शे-यानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १७९ <u>दिनांकः-९.२.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-४ येथिल प्रभाग क्र. १८ मध्ये नारी शाळेजवळ ओ. टी. सेक्शन येथे नविन समाज मंदिर बांधणे कामी रुपये ४,९९,९८०/- चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र ४७ वाचुन दाखवितात.***

<u>विषय क्र. ४७:-</u> मेसर्स कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांनी सुचविलेल्या उल्हासनगर- ३ उमपा मुख्य कार्यालय मागील जकात नाक्याचे वाढीव बांधकामा बाबत. या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

***<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> अर्थसंकल्पात तरतुद शिल्लक आहे का?***

***<u>शहर अभियंता :-</u> रु ५ लाखांचे काम आहे, अर्थसंकल्पात रु २. ५० लक्ष तरतुद शिल्लक आहे. काम करण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव आणलेला आहे.***

***यावेळी मा. सदस्य श्री रामदास उमाप यांनी सभागृहात प्रवेश केला.***

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> या आधी जकात नाक्याच्या कामावर किती खर्च केलेला आहे?

<u>शहर अभियंता :-</u> रु १० लाख झालेला आहे.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> एवढा खर्च झालेला असताना, आता परत जास्तीचा खर्च करणे आवश्यक आहे का?

<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> माझे पण एक प्राकलन आहे, तरतुद शिल्लक नाही म्हणुन ते झालेल नाही. तर ते काम देखिल असेच करण्यात यावे.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):</u> अर्थसंकल्पात रु २. ५ लक्ष तरतुद कमी आहे.

<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> तरतुद शिल्लक नाही तर हे प्राकलन कसे बनते? फक्त आमचीच कामे होत नाहीत.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> जकात नाक्याची निविदा कितीला गेली, त्यासाठी खर्च किती आला? ते सांगा. तसेच तरतुद शिल्लक नसताना कामास सुरुवात करु शकतात काय?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):</u> सुरुवात करु शकतो.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> पैसे शिल्लक आहेत काय?

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):</u> पैसे शिल्लक नसतील तर ते पुढील अर्थसंकल्पात समायोजन करु शकतो.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> पाटील साहेब कानात काय सांगता? उभे राहुन सर्वांना सांगा आपल्याला काय सांगायचे आहे ते.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :-</u> उभे राहुन सांगा.

<u>मा. सदस्य श्री नरेंद्रकुमार ठाकुर :-</u> हे काम तातडीने करण्याची आवश्यकता आहे काय? अर्थसंकल्पात तरतुद असल्यावर सदरचे काम करा.

<u>श्री उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):</u> आपण आता काम सुरु करु शकतो.

<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> आमची प्रभाग समितीची कामे होत नाहीत. निधी असताना देखील निधी नाही असे सांगुन कामे नाकारण्यात येतात. रु ५० ,००० ची छोटी छोटी कामे देखिल करण्यात येत नाहीत. आम्हाला त्यासाठी वारंवार चकरा माराव्या लागतात.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> हे काम तातडीचे नाही, आमचा याला विरोध आहे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना :</u>

<u>विषय क्र. ४७:-</u> मेसर्स कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांनी सुचविलेल्या उल्हासनगर- ३ उमपा मुख्य कार्यालय मागील जकात नाक्याचे वाढीव बांधकामा बाबत. या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ:— कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे दि.२१/११/२००३ पत्राबाबत.

यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार उमपा मुख्य कार्यालय मागील जकात नाक्याचे वाढीव बांधकामा बाबत.

या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबतची व काम करण्याची विनंती केली आहे.

सुचविलेल्या कामाची पाहणी करण्यात आली असता कामाच्या जागेची सद्यास्थिती व इतर अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) उपरोक्त कामाकरिता जागा उपलब्ध आहे का ? :— आहे

२) कामाच्या जागेची मालकी महानगरपालिकेकडे आहे का? :— आहे

३) जागेवर असलेली कामाची सद्यास्थिती माहिती :— छोटे जकात नाका आहे त्यामुळे त्यांच्या पात्राप्रमाणे वाढिव बांधकाम व्हावे.

४) जागेवर यापूवध कधी काम झाले होते. :— ३० वर्षापुर्वी

५) प्रस्तावित काम मंजुर विकास आराखडयाप्रमाणे आहे का?:— आहे

६) नसल्यास विकास आराखडयाशी विसंगत आहे का ? :— ———

७) प) विकास आराखडयाशी विसंगत असूनही कामाची आवश्यकता आहे का ? :— ———

पप) कामाची आवश्यकता असल्यास त्याची कारणे :— छोटे जकात नाका आहे त्यामुळे त्यांच्या पात्राप्रमाणे वाढिव बांधकाम व्हावे.

८) या कामामुळे किती नागरिकांना फायदा होणार आहे :— (अंदाजे लाभाथ)

९) प) प्रस्तावित कामास अन्य काही पर्याय आहेत का ? :— नाही

पपद्ध असल्यास ते कोणते ? :— ———

पपपद्ध सदर पर्यायाऐवजी प्रस्तावित कामाचीच आवश्यकता का ? त्याची कारणे. :— ———

१०) प्रस्तावित कामाचे अंदाजे आयुर्मान :— ३० वर्ष

११) प्रस्तावित कामाचे अंदाजे अपेक्षित खर्च रूपये :— ४,९९,३५८/—

१२) कोणत्या निधिमधुन खर्च अपेक्षित आहे ? (महापालिका/शासकिय) :— महापालिका

१३) महानगरपाकलकेच्या निधीमधुन खर्च करणे असल्यास लेखा शिर्षाचे नांव :— सी—५ (ए) पी—१

पद्ध या लेखा शिर्षामध्ये चालू वर्षी ठेवलेल्या एकंदर तरतुद :— रू १५,००,०००

पपद्ध या कामापुर्वी बजेट कंटोल रजिस्टर प्रमाणे शिललक असलेली तरतुद:— रू २,४९,०४७/—

पपपद्ध या कामावरील खर्च:— रू ४,९९,३५८/—

पअद्ध या कामानंतर उक्त लेखा शिर्षात शिल्लक :— रू २,५०,३११ /—
रहाणारी तरतुद

उपरोक्त अनुक्रमांक १३ नुसार चालु वर्षाच्या अर्थ संकल्पामध्ये प्राकलण खर्चा इतकी तरतुद उपलब्ध होत नसल्याने सदर काम आगामी अर्थसंकल्पात उपलब्ध होणा—या तरतुदीमधुन करणे करिता प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर कामाचे सविस्तर नकाशे व प्राकलन तयार केले असुन सदर कामाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करिता मा.स्थायी समिती पुढे ठेवणे करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८०
दिनांकः—९.२.२००४

सुचकाचे नाव :— श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :— श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर—३ येथिल उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालया मागील जकात नाक्याचे वाढीव बांधकामा कामी रुपये ४,९९,३५८/— चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :— विषय क्र ४८ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४८:— बॅरेक नंबर १८४, पॅनल क्रमांक २१ ब प्रभाग क्रमांक ६४ उल्हासनगर—१ येथील वापरात नसलेले शौचालय तोडून त्याजागी सॅनिटरी मटेरिअल ठेवणेसाठी खोली बांधणे बाबत.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :- शौचालय तोडुन गोडावुन बांधण्याचा प्रस्ताव आहे तर त्याचे प्राकलन का आणले नाही?*

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- मागील बैठकीत आपणच सुचना दिली होती की, शौचालय तोडल्यानंतर तेथे बांधकाम करण्याचा प्रस्ताव आणावा.*

*उप आयुक्त (आरोग्य) :- आपण शौचालय तोडण्याची मंजुरी दिल्यानंतरच तेथे बांधकाम करण्यासाठी प्राकलन तयार करता येईल.*

*काही सदस्य :- पास, पास . . . . .*

*मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना

२१ ब प्रभाग येथील वापरात नसलेले मटेरिअल

**विषय क्र. ४८**:— बॅरेक नंबर १८४, पॅनल क्रमांक क्रमांक ६४ उल्हासनगर—१ शौचालय तोडून त्याजागी सॅनिटरी ठेवणेसाठी खोली बांधणे बाबत.

उल्हासनगर १ येथील पॅनेल क्रमांक २१ ब प्रभाग क्रमांक ६४ मधील बॅरेक नंबर १८४ समोरील व महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या हजेरी शेडला लागूनच दोन सिटचे शौचालय असून त्यांची स्थिती मोडकळीस आलेली आहे. त्याचा वापर कित्येक वर्षापासुन होत नाही. शिवाय त्याच परिसरात कमी अंतरात दोन वेगवेगळी (स्त्री/पुरूष) अशी शौचालये उपलब्ध आहेत, असे आरोग्य निरीक्षक, श्री. राजु ननावरे प्रभाग समिती क्र. १ उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्रत्यक्ष जागा पहाणी करून सदर प्रस्ताव सादर कलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय/ मुतारी निष्कासित करून मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १८१
**दिनांक:—९.२.२००४**

सुचकाचे नाव :— श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅरेक क्र. १८४, पॅनल क्र. २९ (ब), उल्हासनगर—१ येथिल महापालिका निहित वापरात नसलेले शौचालय निष्कासीत / विनियोग करणेस मान्यता व महापालिकेच्या उपयोगासाठी त्याजागी सॅनेटरी मटेरियल ठेवणेसाठी खोली उभारण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

दुपारी १—५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक : १६ फेब्रुवारी, २००४

## दिनांक १६/०२/२००४ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या मागणीवरून तातडीची विशेष स्थायी समिती सभा सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी २००४ रोजी दुपारी ३-०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्त्या.

०१) **श्रीमती ज्योती कलानी, मा. सभापती**
०२) श्रीमती निता आहुजा
०३) श्री उमाप रामदास
०४) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
०५) श्री तलरेजा विनोद चंदीराम
०६) श्रीमती छाब्रिया भारती
०७) श्रीमती माने किरण
०८) श्री सतरामदास जेसवानी
०९) श्री नारायण पंजाबी
१०) श्रीमती बामणकर नंदिनी
११) श्री लिंगे सुर्यकांत
१२) श्री पृथ्वी वलेचा
१३) श्रीमती सुर्वे जयश्री

तसेच मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल या व मा. सदस्य श्री मोहन बेहरानी व श्री ईश्वर पमनानी हे अनुपस्थित होते/ होत्त्या .

दुपारी ३-३५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री दा. आ. पाटील, मुख्य लेखा अधिकारी हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होते होते.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र. १ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> दिनांक ५.२.२००४ (त्यात दि. ७.२.२००४) व दिनांक ९.२.२००४ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> मला यावर बोलायचे आहे. हे जे अर्थसंकल्पाशी संबधित इतिवृत्त आले आहे, तर मी सांगु इच्छितो की, अर्थसंकल्पामध्ये दुर्बल घटकांसाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. सदरची रक्कम वाढवायला हवी होती. मागील वर्षी देखील ५ टक्केच रक्कम राखीव ठेवण्यात आलेली होती. आयुक्तांनी जो निधी ठेवलेला आहे, त्यामध्ये त्रुटी आहेत. रस्त्त्यांसाठीही मी सांगु इच्छितो की, झोपडपटटी विभागाला जोडणारे जे जोडमार्ग आहेत त्यांची कामे प्रस्तावित केलेली नाहीत. मी गेल्या अनेक दिवसांपासुन भारत

मार्बल येथील रोड व वडार कॉलनी ते चंद्रशेखर आझाद स्कुल येथील रस्ता तयार करण्यासाठी सांगत आहे. परंतु ते देखील या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. हे दोन महत्त्वाचे रस्ते असल्याने मी सदरचे रस्ते देखिल समाविष्ट करण्यासाठी विनंती करीत आहे.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> आजची ही विशेष सभा आहे, तुम्हाला या विषयावर काही बोलायचे असल्यास ते तुम्ही महासभेत बोला.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u>तुम्हाला जी काही कामे प्रस्तावित करायची आहेत ती तुम्ही महासभेत प्रस्तावित करा.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> तेथे तर आम्ही करुच.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> तसेच आता सध्या इतिवृत्त कायम करण्याचा विषय चालु आहे. तुम्हाला इतिवृत्तात काही सुधारणा सुचवायची असेल तर सुचवा. परंतु रस्त्याबददल काही बोलायचे असल्यास ते महासभेत बोला.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> आयुक्तांनी स्थायी समितीत जे बोलुन दाखविले तेच येथे आले आहे. त्याबददल मी बोलत होतो.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> तुम्ही याबददल महासभेत बोलु शकता.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> ठिक आहे तेथे बोलु.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>मागील सभांचे दिनांक ५.२.२००४ (त्यात दि. ७.२.२००४) व दिनांक ९.२.२००४ रोजी चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २:- केंद्र सरकार पुरस्कृत वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत झोपडपट्‌टयांमध्ये व्ही.आर.पी. असोशीएट्स या संस्थेकडुन सर्व्हेक्षण करणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> हा विषयही आधीच्या म्हाडाच्या विषयां सारखाच आहे का? अधिका-यांना माहिती नाही, निधी कुठुन येणार? खर्च कोण किती करणार? अधिका-यांना याची माहिती आहे का?

<u>शहर अभियंता :-</u> आठ झोपडपट्‌टयांमध्ये सर्वेक्षण करण्याचा हा प्रस्ताव आहे. प्रथम संस्थेने प्रति झोपडी रु ९३/- एवढा दर दिला होता, त्यानंतर वाटाघाटीअंती रु ८५/- या दराने काम करण्यास संस्था तयार झालेली आहे. प्रथम झोपडपट्‌टयांमध्ये सर्वेक्षण करुन त्यानंतर झोपडपट्‌टयांमध्ये कामे करण्यात येणार आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> आम्ही देखील गोषवारा वाचलेला आहे. योजना काय आहे ते सांगा. एवढा खर्च का होणार आहे? याचा फायदा काय मिळणार आहे?

<u>शहर अभियंता :-</u> राखीव भुखंडावर असलेल्या झोपडपट्टीधारकांना भुखंडाच्या एका कोप-या घरे बनवुन देणार व त्यानंतर उर्वरित राखीव भुखंड खाली करुन त्याचा विकास करणार आहोत.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> यासाठी किती खर्च करणार?
<u>शहर अभियंता :-</u> प्रति झोपडपट्टी रु ४० ,०००/- एवढा खर्च करणार आहोत.

*<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :-</u> कामाला मंजुरी दिल्यानंतर सर्वेक्षणाचे काम लवकर चालु केले जाईल का?*

*<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> त्यासाठीच ५ (२) (२) अंतर्गत प्रस्ताव केलेला आहे तसेच तातडीची सभा बोलाविलेली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> मी सभापतींना विनंती करेन की, यांनी ठाणे महापालिकेपेक्षा दर रु ५ ने कमी दर्शविलेला आहे. तर वाटाघाटी करून दर अजुन कमी केले जावेत.*

*<u>शहर अभियंता :-</u> आधी रु ९३ एवढा दर दिला होता वाटाघाटी करुन तो रु ८५ वर आणलेला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> अजुन रु १० कमी केले तर महापालिकेचे पैसे वाचतील.*

*<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :-</u> या कामासाठी पैसे कोण खर्च करणार आहे?*

*<u>शहर अभियंता :-</u> महापालिका खर्च करणार आहे.*

*<u>काही सदस्य :--</u> पास, पास. . . . . .*

*<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २:- केंद्र सरकार पुरस्कृत वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांमध्ये व्ही.आर.पी. असोशीएट्स या संस्थेकडुन सर्व्हेक्षण करणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

केंद्र शासन पुरस्कृत वाल्मिकी आंबेडकर आवास योजना राज्यामध्ये राबविण्याकरिता महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र एच. एस. जी. २००२/ प्र.क्र ४ गृनिधो १ दि.१९ सप्टेंबर २००२ निर्गमित केले आहे. या शासन निर्णयानुसार उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये या योजनेअंतर्गत राबवायच्या योजना व त्यांची उद्दीष्टे खालील प्रमाणे नमुद केले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) आवास योजना | 674 लाभार्थी | रू 269.554 लक्ष |
| 2) श्रेणी वाढ योजना | 459 लाभार्थी | रू 089.800 लक्ष |
| 3) निर्मल भारत अभियान | | रू 89.800 लक्ष |

उपरोक्त अनुक्रमांक 3 च्या निर्मल भारत योजने अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या 286 बैठकी च्या शैचालयांना मान्यता मिळुन या कामांची निविदा कार्यवाही पूर्ण झाली आहे.

अनुक्रमांक १ व २ अनुक्रमे आवास योजना व श्रेणीवाढ योजना यांच्या अंमलबजावनी करिता शहरामध्ये झोपडपट्यांचे सर्वेक्षण करणे, लाभार्थी ठरविणे व योजना तयार करणे, निधि उपलब्धते करीता योजना शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाघटक) यांनी त्यांच्या पत्र क्र को.मं./मु.अ/वाम्बे/२५२० /२००३ दिनांक १७/१२/२००३ नूसार कळविले आहे की, शासनाने महानगरपालिकांना वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेअंतर्गत १५०० लाभार्थियांचे उद्दीष्टे घालुन दिलेले आहे. सदर योजना राबविणेकरिता सर्वेक्षण व अहवाल तयार करणे कामी खालील प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे

1 संपुर्ण झोपडपट्टीचा प्लेन टेबल सर्वेक्षण करूण नकाशा तयार करणे या मध्ये........

अ. प्लेन टेबल नकाशावर प्रत्येक झोपडी दर्शवुन अस्तीत्वात असलेल्या सुविधा दर्शविने.

ब. प्रत्येक झोपडीस गणना घर क्रमांक देवुन नकाशावर तो नमुद करणे.

क. प्रत्येक झोपडीचे तळमजल्याचे क्षेत्रफळ,मजले,बांधकामाचा प्रकार यांची माहिती काढणे.

ड. झोपडपट्टीच्या जागेबाबत माहिती जसे कि जागेचे माहिती,भुखंड क्रमांक, विकास आराखडयाप्रमाणे आरक्षण दर्शविणारी माहिती,शासकिय अभिलेखाप्रमाणे जागेचा संदर्भ क्रमांक इ.माहिती काढणे,व दस्त ऐवज उपलब्ध करून घेणे.

2 वाल्मीकी आंबेडकर आवास योजनेनुसार गणना घर क्रमांका प्रमाणे झोपडपट्टीची सामाजिक व आर्थिक गणना करून त्या मध्ये प्रामख्याने खालील बाबींची माहिती काढणे.

अ. रहिवाशी दिनांक 1/1/1995 पुर्वीपासुन रहात असल्याचा पुरावा.

ब. रहिवाशांचे अर्थिक उत्पन्न व त्यानूसार अर्थिक दृष्टया मागासलेल्या गटामध्ये येत आहे का? याची माहिती काढणे.

क. रहिवाशी अनु.जाती/जमाती, मागासवर्गीय (ओ.बी.सी./बी.सी.) यापैकी कोणत्या गटातील आहे याची माहिती काढणे.

*ड. रहिवाशी शारीरीक,मानसिक, दृष्टया असहाय्य अपंग आहेत का? याची माहिती काढणे.*

3 जागांचे नियोजित आराखडे तयार करणे.

4 वाम्बी अंतर्गत अहवाल व प्रस्ताव तयार करणे.

5 विकास नियंत्रण नियम किंवा विनियम यासह योजनेच्या किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतूदि शिथील करणे असल्यास तसा प्रस्ताव तयार करणे.

6 विकास प्रस्ताव(Planing) अहवाल तयार करणे.

7 अंदाजपत्रक घरांची बांधणी व सोबत येणा-या सोयीसूविधा यांचे आराखडे व प्राकलने तयार करणे.

8 नियोजित घरांचे बांधकाम करणेकरिता घरांचे नकाशे व आराखडे,प्राकलने तयार करणे.

उपरोक्त सर्वेक्षण करून देण्याकरिता व्हि.आर.पी. असोशिएट्स ठाणे नोंदणीकृत संस्था(N.G.O) यांनी त्यांच्या पत्र क्रमांक व्हि.आर.पी./121 दिनांक 22/11/2003 नुसार तयारी दर्शविली असुन या योजनेअंतर्गत ठाणे महानगरपालिकेने त्यांचेकडुन रू 93 प्रति झोपडी (लाभार्थी) मानधन देवुन सदर योंजना तयार करून घेतली असल्याची माहिती दिली आहे. व उल्हासनगर मध्ये ही त्याच दरात काम करण्याची तयारी दर्शविली आहे. परंतु सदर दर कमी करण्याकरीता त्यांना विनंती केली होती ती त्यांनी मान्य करून उल्हासनगर मध्ये असे सर्वेक्षण करणे करीता त्यांनी रू 85 प्रति झोपडी हा दर दिला आहे.

शासनाच्या गुरूवार दिनांक २१ नोव्हेंबर २००२ अन्वये झोपडपट्टी क्षेत्रातील संरक्षीत भोगवरा असलेल्या पुर्वस्थितीतील पुनर्वसन गुहनिर्माण योजनांसाठी विशेष तरतुदी करिता जारी केलेल्या अध्यादेशाप्रमाणे नियोजन प्राधिकरण यांना विकास नियंत्रण नियम किंवा विनियम तसेच विकास योजनेच्या किंवा प्रादेशिक योंजनेच्या तरतुदी शिथिल करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेमधून याचा लाभ घेउन झोपडपट्टीवासीयांचे ते रहात असलेल्या ठिकाणी पुनर्वसन करण्याकरिता

उल्हासनगर शहरामधील हरीतपट्टा,मैदाने तसेच अन्य महानगरपालिका करिता असलेल्या आरक्षित भुखंडावरील झोपडपट्टयांपैकी खालील ८ झोपडपट्टया निवडुन त्यामधील अंदाजित असलेल्या एकंदर ८४७५ झोपडयांची उपोरोक्त नमुद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून घेणे करीता व्हि.आर.पी. असोशिएट्स यांनी दिलेल्या रू ८५ प्रति झोपडी या दराने रू ७२०४००/- इतका खर्च अपेक्षित आहे.सदर खर्च महानगरपालिकेच्या झोपडपट्टी सुधारणा या शिर्षामधुन करण्याकरिता पुरेशी तरतुद असल्याने उक्त ८ झोपडया वाल्मिकी आंबेडकर आवास योजने वरीत व्हि.आर.पी. असोशिएट्स यांचेकडुन त्यांची दिलेली रू ८५ प्रति झोपडी या दराने काम करून घेण्याकरिता व या कामावर येणारा रू ७२०४००/. खर्चास मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) अंतर्गत मा.आयुक्त सो.यांना संविदा करण्याकरीता प्राधिकृत करण्याकरीतास्थायी समीती कडुन मंजुरी मिळणे साठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८२ दिनांक:-१६.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव व प्रशासनाच्या शिफारशीप्रमाणे केंन्द्र शासन पुरस्कृत वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत झोपडपट्टयांचे सर्व्हेक्षण करणे कामी प्रशासनास मेसर्स व्ही. आर. पी असोसिएटस् या कंत्राटदारांशी वर सुचविलेल्या दराने निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सोबत जोडलेल्या यादीतील झोपडपट्टयांचे सर्व्हेक्षण करणे हे या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**वाल्मिकी आंबेडकर आवास योजना**
**सर्व्हेक्षणासाठी विचाराधीन असलेल्या झोपडपटट्यांची यादी**

| अ.क्र. | प्रभाग क्र. | झोपडपट्टीचे नाव | विकास आराखडयाप्रमाणे आरक्षण | लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| ९ | ६ | वडार कॉलनी उल्हासनगर-३ | औदयोगिक क्षेत्र | ६०० |
| १४ | १९ | कौशल नगर, उल्हासनगर-३ | उल्हासनगर महानगरपालिका १७४ पर्यंत विस्तारीत | १८०२ |
| १८ | १७ | गीता कॉलनी, उल्हासनगर ४ | खेळाचे मैदान १२, | ४३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | विकास आराखडयाप्रमाणे १०० फुट रूंद रस्ता | |
| १८ | १९ | भैयासाहेब आंबेडकर सोसायटी आणि पंचशिल नगर, हिराघाट समोर,उल्हासनगर ३ | हरीत पट्टा | ३२१७ |
| २८ | १२ | कैलास नगर उल्हासनगर ५ | खेळाचे मैदान १४ | ४४० |
| २९ | १३ | महात्मा फुले नगर उल्हासनगर ५ | हरीत पट्टा | १४४४ |
| ३४ | २ | गुलशन नगर, शहाड रेल्वे स्टेशन जवळ, उल्हासनगर-१ | पार्कींग १८९, शॉपिंग सेंटर १४२ | २९२ |
| ३५ | ११ | नेहरू नगर उल्हासनगर ५ | हरीत पट्टा | २५० |
| | | | एकुण | ८४७५ |
| | | | खर्च रू. ८५ प्रत्येक झोपडी प्रमाणे | ७२०३७५ |

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-* विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.**

विषय क्र. ३:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

***मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर :-* कोणता निधी आहे.**

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-* नगरसेवक निधी आहे.**

***काही सदस्य :--* पास, पास. . . . . . .**
***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-* सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.**

प्रस्तावना

विषय क्र. ३:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभपती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत(रू) | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर १ मोरे नगर येथे ५० मि.मि.व्यासाची जी आय पाईप लाईन टाकणे | २५००० | १९.०८.०३ | आरती मजूर म.का.सह.सं.लि. |
| २ | उल्हासनगर ३ येथील प्लायवूड ते ब्राम्हण पाडा येथे ८० मि.मि.व ५० मि.मि.व्यासाची यी आय जलवाहिनी टाकणे | ९९७०५ | १५.०१.०४ | आशा मजूर म. का.सह.सं.लि. |
| ३ | उल्हासनगर ३ येथील मातुभूमी सॉमिल जवळचे मिलन नगर येथे ५० मि.मि व ८० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणे | ९४००० | ०९.०१.०४ | गुरू नानक मजूर म.का. सह.सं.लि. |
| ४ | उल्हासनगर १ येथील बिर्ला गार्डन येथे मिटर रूम बांधणे | ४१२१० | ०३.०१.०४ | बजरंगबली मजूर म.का. सह.सं.लि |
| ५ | उल्हासनगर ५ येथे बॅ नं २०७० ते ओ.टी.बुस्टर पर्यत १०० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ३९८१०० | २४.१२.०३ | शिव मजूर म. का.सह.सं.लि. |
| ६ | उल्हासनगर ५ येथील शांती प्रकाश गोशाळा ते बॅ नं २००५ पर्यत नविन ८० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ९१८९६ | २४.१२.०३ | धनलक्ष्मी मजूर म.का.सह.सं.लि. |
| ७ | उल्हासनगर ५ येथील बॅ नं २०७० ते बॅ २०१५ पर्यत नविन ८० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणे | ९९०४० | २४.१२.०३ | धनलक्ष्मी मजूर म.का.सह.सं.लि. |
| ८ | उल्हासनगर ५ येथे बॅ नं २०७३ ते २१०८ पर्यत नविन १०० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १४५५०० | १८.१२.०३ | गुरूदेव मजूर म.का.सह.सं.लि. |
| ९ | उल्हासनगर ४ ओ.टी. सेक्शन येथे वॉल्व व पाईप लाईन काढणे व क्रास कनेक्शन करणे | १९१७०० | २३.०१.०४ | गुरू नानक मजूर म.का. सह.सं.लि |
| १० | उल्हासनगर ५ येथिल जय संतोषी माता मंदीरा जवळ व महात्मा फुले येथील ५००० लि.क्षमतेची पाण्याची टाकी बसविणे | ९००० | ०६.०१.०४ | आशा मजूर म. का.सह.सं.लि |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | वेगवेगळया कामासाठी ८० व १०० मि.मि.व्यासाची जी आय पाईप पुरविणे | १५१४८८ | १२.११.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८३ दिनांकः-१६.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील 11 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.***

विषय क्र. ४:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

***काही सदस्य :-- पास, पास. . . . . . .***

***मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

प्रस्तावना

विषय क्र. ४:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमूद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा.स्थायी समिती सभपती निधी/महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. | *कामाचे नाव* | प्राकलनिय | करारनामा | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|

| क्र | | किंमत(रू) | दिनांक | |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर ४ येथे सेंट्रल हॉस्पीटल ते दिलीप पेंटर राज स्टुडिओच्या मागे ८० मि.मि.व्यासाची जी आय पाईप लाईप टाकणे | १००००० | ३०.१२.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |
| २ | उल्हासनगर ५ बॅ नं १७१८ ते ब्लॅक ५०पर्यत नविन १००/८० मि.मि.व्यासाची जी आय पाईप लाईप टाकणे | १९७८५० | ३१.१२.०३ | सागर मजूर म.का.सह.सं. लि. |
| ३ | गांधी नगर येथे ५० मि.मि.व्यासाची पाईप लाईन टाकणे व बुस्टर रूम बांधणे | १९८१४३ | २२.१०.०३ | वंदना मजूर म.का.सह.सं. लि. |
| ४ | ओ.टी.बुस्टर व आसपासच्या भागाकरिता नविन १५०/१००/८० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणे | ४७०२३४ | २७.०५.०३ | रविकिरण मजूर म.का. सह.सं.लि. |
| ५ | उल्हासनगर २ गुप्ता किराणा स्टोअर्स ते हनुमान मंदीर,शंकर किराणा स्टोअर्स,धनगर नाल्याजवळ ५० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | १२०००० | १५.०५.०३ | मधुसुदन मजूर म.का.सह.सं. लि. |
| ६ | उल्हासनगर ५ दसरा मैदान व पटेल नगर या जलकुभांतर्गत येणा-या पाईप लाईन मधील पाणी गळती थांबविणे व चोकअप काढणे | २०१९५५ | २२.०५.०३ | आदर्श मजूर म.का.सह.सं. लि. |
| ७ | शिव शक्ती कॉलनी,विष्णु दशर्न ते अमन टॉकीज रोड,उल्हासनगर ३ येथे ५० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ४७००० | २५.०४.०३ | अनंत मजूर म.का.सह.सं. लि. |
| ८ | उल्हासनगर ३ सेक्शन २४ अशोक टॉकीज ते माता मंदीरापर्यत ४० मि.मि.व्यासाची जी आय पाईप लाईन टाकणे | १५५८० | १२.०५.०३ | स्वामी समर्थ मजूर म.का. सह.सं.लि. |
| ९ | उल्हासनगर ३ काली माता मंदीर ते गणपती मंदीर ते सुभाष नगर येथे ८० मि.मि.व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ७५३०० | १०.०४.०३ | प्रभात मजूर म.का.सह.सं. लि. |
| १० | उल्हासनगर ४च्या विविध ठिकाणी स्लॅईस व्हाल्व व इतर साहित्य पुरवठा करणे | २००००० | २६.०३.०३ | बजरंगबली मजूर म.का. सह.सं.लि |
| ११ | उल्हासनगर ५ येथील बॅल्क नं ७४९ ते ए ७३४ पर्यत ८० मि.मि. व्यासाची जी आय जलवाहिनी टाकणे | ९८५०० | २५.११.०३ | सिध्दकला मजूर म.का.सह.सं.लि |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८४ दिनांकः-१६.२.२००४

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*दुपारी ३-५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.*

*(प्रकाश पं. कुकरेजा)*
*महापालिका सचिव*
*उल्हासनगर महानगरपालिका*

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक : १७ मार्च, २००४

## दिनांक १७/३/२००४ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक १७. ०३.२००४ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

०१) श्रीमती ज्योती कलानी, मा. सभापती
०२) श्रीमती निता आहुजा
०३) श्री उमाप रामदास
०४) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
०५) श्री तलरेजा विनोद चंदीराम
०६) श्रीमती माने किरण
०७) श्री सतरामदास जेसवानी
०८) श्रीमती. मोकल सिमा
०९) श्री नारायण पंजाबी
१०) श्रीमती बामणकर नंदिनी
११) श्री. मोहन बेहरानी
१२) श्री लिंगे सुर्यकांत
१३) श्री. ईश्वर पमनानी
१४) श्री पृथ्वी वलेचा
१५) श्रीमती सुर्वे जयश्री

तसेच मा. सदस्या श्रीमती छाब्रिया भारती हया अनुपस्थित होत्त्या .

सांयकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. १ वाचून दाखवितात.

विषय :- मागील सभेचे दिनांक १६.०२.२००४ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

काही सदस्यः-पास. पास.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- मागील सभेचे दि. १६.२.२००४ रोजी चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय क्र. २:-उल्हासनगर-५ येथील शांतीप्रकाश आश्रम समोर, बॅ. क्र. २००४, रुम नं १८,१९ च्या जवळ, सतनाम साखी इमारतीचे निष्कासन करताना आजुबाजुच्या संपत्तीला झालेल्या नुकसानीचे दुरुस्तीबाबी केलेल्या खर्चाची माहिती नोंद करणे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः- काय आहे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> सतनाम साखी इमारत तोडतांना आजूबाजूला ज्यांचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई भरुन दिली आहे, त्याबददल आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> आमची ही हरकत आहे की इमारत निष्कासित करतांना सांभाळून नाही केले नाहीतर इतका खर्च आला नसता. केअरफुली डेमोलेशन नाही केले.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रमनाथ सोनवणे):-</u> असे नाही बांधकाम निष्कासन केअरफुलीच केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :-</u> केअरफुली केले आहे, म्हणूनच उलट कमी नुकसान झाले आहे.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. २:-उल्हासनगर-५ येथील शांतीप्रकाश आश्रम समोर,
बॅ. क्र. २००४, रुम नं १८,१९ च्या जवळ, सतनाम
साखी इमारतीचे निष्कासन करताना आजुबाजुच्या
संपत्तीला झालेल्या नुकसानीचे दुरुस्तीबाबी केलेल्या
खर्चाची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी महापालिका निधी, मधून काम करण्याची विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर ५ येथील शांतीप्रकाश आश्रम समोर बॅ नं २००४ रू नं १८,१९ च्या जवळ सतनाम साखी बिल्डींग पाडतांना झालेल्या आजुबाजुच्या संपत्तीला झालेल्या नुकसानीचे दुरूस्ती करणे. (महानगरपालिका निधी ८६४) | ११३८६० | १/९/२०४४ | धनलक्ष्मी मजुर कामगार सहकरी संस्था |

उपरोक्त निविदांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(सी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरची माहिती स्थायी समिती व महासभेकडे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १८५</u>　　　　<u>दिनांक:-१७. ३. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील शांतीप्रकाश आश्रम समोर, बॅ. क्र. २००४, रुम नं १८,१९ च्या जवळ, सतनाम साखी या इमारतीचे निष्कासन करताना आजुबाजुच्या संपत्तीला झालेल्या नुकसानीचे

दुरूस्तीबाबी प्रशासनाने मे. धनलक्ष्मी मजुर कामगार सहकारी संस्था यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषय क्र. ३:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :-पास...

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2003-2004 च्या निधीतून कामे करणेसाठी निधी .महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर 1 येथील बॅरेक क्र 249,205,209,265,267 शाळा क्रमांक 3 समोर,साईबाबा मंदिर शिव शक्ती अपार्ट.सी.सी.व नाली बांधणे. (महापालिका निधी 678) | 1,99,150 | 11/2/2004 | अनिष मजुर कामगाार सहकारी संस्था |
| 2 | उल्हासनगर 4 येथील बॅ.नं 1243 रूम नं 12 जवळील शैचालय दुरूस्ती करणे.(नगरसेवक निधी 723) | 1,99,715 | 11/2/2004 | ज्योती मजुर कामगाार सहकारी संस्था |
| 3 | उल्हासनगर 3 उमपा मुख्य कार्यालय मागील बगीच्या सुशोभिकरण करण्या बाबत. (महापालिका निधी 802) | 1,44,627/ | 11/2/2004 | ज्योती मजुर कामगाार सहकारी संस्था |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १८६</u> <u>दिनांकः-१७. ३. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय क्र. ४:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u> महानगरपालिका निधी प्रत्येक जागी वापरला जातो परंतु त्याबाबतीत योग्य अशी कारवाई होत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> माझे इकडचे काम अजून नाही झाले तुम्ही स्वतः पाहून गेला होतात हॉली क्रॉसचे इकडचे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> सुखरामानी मला नंतर सांगा काय झाले याचे ते?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> माझ्या प्रभागातील प्रभाग समितीसाठी जो निधी होता त्यातून १ रुपयाचे काम अजून झाले नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>हा वेगळा विषय आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> आमच्या बाकीच्या लोकांचे काम होत नाही २ वर्षे झाली प्रभाग समितीत असून तरीही कामे होत नाही याबददल माहिती दया.

<u>काही सदस्य :-</u> पास....

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ४:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या

# सांविदेची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2003-2004 च्या निधीतून कामे करणेसाठी निधी .महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-1येथील महाराष्ट्र मित्र मंडळ व विविध ठिकाणी सी सी पायवाटा व नाली बांधणे आणि शुक्लाच्या घराजवळ बॅ नं 114 , शिवसेना ऑफिस पाईप लाईन एरिया बॅ नं 190 ,शंकर अपार्टमेंट प्र. 21 (नगरसेवक निधी 119) | 199925/- | 16/2/04 | मे ओम म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 मध्ये बॅ नं 1719, 20 जवळ ब्लॉक नं बी-44, 45, 46 मोनालिसा अपार्टर्मेंट आणि डॉ मन्नू दवाखाना जवळ आणि विविध ठिकाणी सी सी पायवाटा व नाली बांधणे. ( उप-महापौर निधी 254) | 200000/- | 16/2/04 | मे हरे रामा म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 मधील अयोध्यानगर या झोपडपट्टीत नाल्या व गटार बाधणे (दुर्बल घटक निधी 255) | 99780/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म का सोसा |
| 4 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 मधील हमलीपाडा परिसरात नाल्या व गटार बांधणे (दुर्बलघटक निधी 258) | 99760/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म का सोसा |
| 5 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 25 मधील शिवाजीनगर या झोपडपट्टीत नाल्या व गटार बांधणे (दुर्बल घटक निधी 259) | 99850/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म.का. सोसा. |
| 6 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 बद्यॅ नं 1829 जवळ चार बैठकिचे शौचालयव मुतारी बांधणे ( उप-महापौर निधी 313) | 200000/- | 16/2/04 | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| 7 | उल्हासनगर-1 येथील प्र क्र. 2 मधील बॅ नं 381 बॅ नं 385 जनता मित्र मंडळ रीता यांच्या घराजवळ सी सी एम-250 ने रस्ता ,व नाली बांधणे. (नगरसेवक निधी 375) | 199825/- | 16/2/04 | मे साईलक्ष्मी म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 2येथील बॅ नं 39 सार्वजनिक शौचालय जवळ सी सी एम-250 रस्ता ,नाली बांधणे ( नगरसेवक निधी 377) | 99950/- | 16/2/04 | मे श्री विनायक म. का. सोसा. |
| 9 | उल्हासनगर-5 येथील सेक्शन 39, बॅनं 1839, 40, 1846 , महाशिव अपार्टमेंट पर्यत सी सी एम-250 ने रस्ता आणि नाली बाधंणे. (नगरसेवक निधी 398) | 199900/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 मध्ये अशियाना महलते अबिलाश अपार्टमेंट ब्लॉक नं बी-18, 2,57 क्रिष्णा माता मंदिर सी सी रोड आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी 400) | 199900/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म का सोसा |
| 11 | उल्हासनगर-5 येथील स्वामी शांतीप्रकाश गार्डनचे सुशोभिरकण करणे ( उप-महापौर निधी 450) | 350000/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म का सोसा |
| 12 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र 12 मध्ये दत्ता निवास बॅ नं 1711 ते गोल्डन गेट अपार्टमेंट आणि विविध ठिकाणी एम-250 ने रस्ता आणि नाली बांधणे. (उप-महापौर निधी 468) | 150000/- | 16/2/04 | मे त्रिशुल म. का. सोसा. |
| 13 | प्रभाग क्र. 3 येथील संभाजीनगर येथे शिव क्रिपा किराणा स्टोअर समोर आणि नाना पाटील यांचे घराजवळ शौचालय दुरूस्त करणे (दुर्बल घटक निधी 520) | 111800/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म.का. सोसा. |
| 14 | प्र क्र. 3 येथील संभाजी नगर ,किर्तीपथ रमेश अगरवाल, रघुनाथ बरडे ,जगदिश सेठठी ,के डी गौते, आणि सी सी पॅसेज भारत लेनजवळ संजय स्वामी, गुरूनिवास (जोशी पेंटर ) पर्यत नाली बांधणे (दुर्बलघटक निधी 521) | 85775/- | 16/2/04 | मे महादेव क्रिपा म. का. सोसा. |
| 15 | प्रभाग . 3 येथील संभाजी नगर,कमला नेहरू नगरमध्ये प्रशांत पांडे ते गौरी किराणा स्टोअर मार्गे साकव आणि सी सी गजानंद यांचे घराजवळ नाली बांधणे. (दुर्बलघटक निधी 522) | 257225/- | 16/2/04 | मे मुंब्रादेवी म.का. सोसा. |
| 16 | प्रभाग क्र. 3 मध्ये संभाजी नगर किर्तीपथ येथे नाली दुरूस्तीकरणे (दुर्बलघटक 523) | 76450/- | 16/2/04 | मे महादेव क्रिपा म. का. सोसा. |
| 17 | उल्हासनगर-3 येथील राधाबाई किशनानी चौक ते ठाकूराम अपार्टमेंट श्याम सुंदर सोसायटी ते अणा भाऊ साठे प्रवेश द्वार या रस्त्यानी पाणी पुरवठा विभागाने खोदलेले खंदक भरणे (महापालिका निधी 530) | 100650/- | 16/2/04 | मे महादेव क्रिपा म. का. सोसा. |
| 18 | उल्हासनगर-3 येथील सेक्शन 19 बॅ नं 862 मागे झोपडपटटीमध्ये नाला दुरूस्तीकरणे. (महापालिका निधी 545) | 103608/- | 16/2/04 | मे हरे क्रिष्णा म. का. सोसा. |
| 19 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 15 रामनगर येथील मराठे निवास ते पांडे निवास पर्यत एम-250 सी सी पॅसेज रोड बांधणे (महापौर निधी 592) | 199465/- | 16/2/04 | मे ओम साईबाबा म. का. सोसा. |
| 20 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 10 मध्ये गुरूद्वारा समोरील रमेश परदेशी यांच्या घरापासून बॅ नं 1860 पासून बॅ नं 1862 , 1864 पर्यतची नाली बांधणे (नगरसेवक निधी 608) | 199900/- | 16/2/04 | मे मधूसुदन म. का. सोसा. |
| 21 | उल्हासनगर-2 येथील यात्री निवास येथील प्र क्र. 23 प्रभाग समिती कार्यालय क्र. 2 दुरूस्तीकरणे ( महापालिकानिधी 612) | 99900/- | 16/2/04 | मे जयंत म. का. सोसा. |
| 22 | उल्हासनगर-5 मध्ये स्वामी शांतीप्रकाश उानाचे सुशोभिकरण करणे. (महापालिका निधी 614 ) | 200000/- | 16/2/04 | मे ओम म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र 12 मध्ये ओंकारनंद आश्रमजवळ बॅ नं 1779 जवळ व बॅ नं 1800 जवळ सी सी एम-250 ने रस्ता बांधणे. ( नगरसेवक निधी 615) | 200000/- | 16/2/04 | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| 24 | उल्हासनगर-4 येथे एम-250 रस्ता पदमा व सुकमनी सागर सोसायटी मध्ये,कचरा कुंडी कॅनरा बँकमागे व डोडामल तबेला समोर,हिरविनय अपार्टमेंट जवळ एम-250 रोड व गटार बांधणे बॅ नं 1684 सेक्शन 24 येथे एम-250 रोड बांधणे (नगरसेवक निधी 618) | 199451/- | 16/2/04 | मे ओम साईबाबा म. का. सोसा. |
| 25 | उल्हासनगर-1 येथील बॅ नं 299 , 300, 301 ते 306,307, 309 नाली बांधणे व शौचालय दुरूस्ती करणे वार्ड नं 5 (नगरसेवक निधी 625) | 199900/- | 16/2/04 | मे शेरावाली म. का. सोसा |
| 26 | प्रभाग समिती क्र. 4 चे ऑफिसमध्ये दुरूस्तीकरणे बाबत(महापालिका निधी 660) | 92000/- | 16/2/04 | मे सुर्यज्योत म. का. सोसा. |
| 27 | उल्हासनगर-1 येथील गोपाल नगर, सत्यनारायण मंडिकल ,महाराष्ट्र मित्र मंडळ ,व्यायामशाळा जवळ बॅ नं 368, 350 राहूल पॅलेस समोर ,निलकंठ अपार्टमेंट जवळ सी सी पायवाटा व नाली बांधणे प्र क्र. 21 (नगरसेवक निधी 669) | 199900/- | 16/2/04 | मे मधूराज म. का. सोसा. |
| 28 | उल्हासनगर-5येथील गॅस गोडाऊन ते उम्पींग ग्राऊंड रस्त्याचे खडीकरणे करणेबाबत (गलिच्छ वस्ती निधी 686) | 197700/- | 16/2/04 | मे ओम म. का. सोसा. |
| 29 | उल्हासनगर-3येथील प्र क्र. 24 मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया ते बॅ नं 771 पर्यत सी सी एम-250 ने रस्ता आणि साईपटटी बांधणे (महापालिका निधी 687) | 187323/- | 16/2/04 | मे शेरावाली म. का. सोसा |
| 30 | उल्हासनगर-5 येथील प्र क्र. 12 मध्ये लिटलस्टार शालेपासून मोनालिसा अपार्टमेंट जवळ ते दिनेश अपार्टमेंट पर्यत सी सी एम-250 ने रस्ता बाधणे ( उप-महापौर निधी 689) | 200000/- | 16/2/04 | मे मधूराज म. का. सोसा. |
| 31 | प्रभाग क्र. 25 मध्ये माधुरी अपार्टमेंट ते बॅ नं 1039 ते मनिषनगर कल्व्हर्ट पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे (नगरसेवक निधी 692) | 199500/- | 16/2/04 | मे रिफ्युजी हरी म. का. सोसा. |
| 32 | उल्हासनगर-3 येथील इंदिरागांधी भाजी मार्केटची दुरूस्तीकरणे (महापालिका निधी मार्केटदुरूस्ती निधी 694) | 197540/- | 16/2/04 | मे रिफ्युजी हरी म. का. सोसा. |
| 33 | उल्हासनगर-1 येथील मुकुंदनगर मध्येनाल्या बांधणे (गलिच्छ वस्ती निधी 702) | 149750/- | 16/2/04 | मे लक्ष्मी क्रिपा म. का.सोसा. |
| 34 | उल्हासनगर-3 सुभाषनगर मधील राजेश शर्मा हाऊस ,आण्णा हाऊस , फकीरा हाऊस पर्यत सी सी व पायवाटा नाली बाधंणे (गलिच्छ वस्ती निधी 714) | 106980/- | 16/2/04 | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| 35 | उल्हासनगर-3 दिपक बराडे यांचे घर,गौतम बुध्दनगर , प्रभाग क्र. 23 येथे एम-250 रोड बनविणे (गलिच्छ वस्तीनिधी 721) | 149790/- | 16/2/04 | मे गांवदेवी म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 36 | उल्हासनगर-2 येथील प्र क्र. 2 मध्ये बॅ नं 555, 556,560 661, 631, 679, 670, 741, 748 जवळ सी सी आणि नाली बांधणे. ( नगरसेवक निधी 722) | 199900/- | 16/2/04 | मे गांवदेवी म. का. सोसा. |
| 37 | उल्हासनगर-3 येथील साईबाबा कॉलनी येथे नाला बनविणे .(संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान निधी 743) | 199850/- | 16/2/04 | मे स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| 38 | उल्हासनगर-3 येथील गौतम बुध्दनगर येथे नाला बनविण्याबाबत. (गाडगे महाराज निधी 744) | 99970/- | 16/2/04 | मे अल्का म. का. सोसा. |
| 39 | उल्हासनगर-3 येथील सिमरन पॅलेस ते बगवान बाबा कॉलनी वार्ड नं 19 येथे एम-250 व नाली बनविणे( नगरसेवक निधी 752) | 199465/- | 16/2/04 | मे शिव मजुर का. सोसा. |
| 40 | उल्हासनगर-5येथील प्रक्र. 11 मधील कैलास कॉलनी येथील आशिर्वाद मित्र मंडळ पासून ब्लॉक नं 986 समोरील पाटील यांच्या घरापर्यतचा रस्ता सी सी एम-250 ने बनविणे. (गलिच्छ वस्ती निधी 756) | 150000/- | 16/2/04 | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| 41 | उल्हासनगर- `येथील प्र क्र. 21 मध्ये किंग अपार्टमेंट समोर ते कुमार अपार्टमेंट मीरा अपार्टमेंट मार्गे नाली आणि साईड पटटी बांधणे (महापालिका निधी 759) | 136975/- | 16/2/04 | मे शिवक्रिपा म. का. सोसा. |
| 42 | उल्हासनगर-1 येथील सीसी पायवाट व नाली बांधण्याचे काम बॅ नं 330ए 230ए 225 जवळ ब्लॉक नं अ़ू 54, 55 (ब्रम्हकुमारी) बॅ नं 450, 453, 434, 435, 527, 528, बॅनं अ़ू-88, 89 प्र नं 22 (महापालिका निधी 761) | 199800/- | 16/2/04 | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| 43 | उल्हासनगर-1 येथील सुनिता अपार्टमेंट जवळ ट्रान्सफार्मर आणि बॅ नं 76समोर रस्ता सी सी एम-250 ने आणि नाली बांधणे (महापालिका निधी 760) | 157000/- | 16/2/04 | मे शिवक्रिपा म. का. सोसा. |
| 44 | उल्हासनगर-3 येथील खन्ना कम्पाऊंड वार्ड नं 19 येथे नाली बनविणे (नगरसेवक निधी 766) | 199545/- | 16/2/04 | मे साईलक्ष्मी म. का. सोसा. |
| 45 | उल्हासनगर-3 येथील सपनाबगीचयाची दुरूस्ती व देखभाल करणे व गेट बांधणे. (प्रभाग समिती निधी 784) | 299980/- | 16/2/04 | मे रिफ्युजी हरी म. का. सोसा. |
| 46 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 20 तलरेजा टावर ते शिवमंदिर शिसमहल व बॅनं 483, 492 जवळ शौचालयाची दुरूस्ती करणे आणि नाला दुरूस्तीकरणे. (नगरसेवक निधी 788) | 199900/- | 16/2/04 | मे शिव मजुर का. सोसा. |
| 47 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 20 मधील जय श्री कृष्ण अपार्टमेंट,अशीष महल बॅ नं 761 साईकुंज आणि रमेशनगर येथे सी सी एम-250 ने रस्ता बांधणे तसेच शौचालय दुरूस्ती करणे (नगरसेवक निधी 789) | 199900/- | 16/2/04 | मे शिव मजुर का. सोसा. |
| 48 | उल्हासनगर- येथील बॅनं 1456 जवळील उद्यानाचे नुतनीकरण करण्याबाबत व हरीत करण्याकरिता (प्रभाग समिती-3 निधी 799) | 99513/- | 16/2/04 | मे आमसाईबाबा म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करण्याकरिता (प्रभाग समिती-3 निधी 799) | | | |
| 49 | उल्हासनगर-3नाका नं 6 समोर प्र क्र. 25 मध्ये पोलीस आउट पोस्ट बनविणे (नगरसेवक निधी 811) | 105375/- | 16/2/04 | मे वैशालीम. का. सोसा. |
| 50 | उल्हासनगर-1 येथील प्र क्र. 4 मध्ये बॅ नं 129, अ ब जवळ आणि चंदर अपार्टमेंट जवळ सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी 814) | 199960/- | 16/2/04 | मे जगदंबा म. का. सोसा. |
| 51 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग 15 मधीलबॅनं 1323, 1346, 1361, 1364, 1318, 1320, 1321व उल्हास विद्यालया मागील वाल्मिकीनगर, समता कॉलनी येथील शौचालये दुरूस्तीकरणे. (महापालिका निधी 825) | 69867/- | 16/2/04 | मे आशा म.का. सोसा. |
| 52 | उल्हासनगर-4 येथील प्र क्र. 15 मधील सिताराम नगर,जगजीवन रामनगर,शिवाईनगर या ठिकाणी असलेल्या शौचालयांची दुरूस्तीकरणे (महापालिका निधी 826) | 64834/- | 16/2/04 | मे आशा म.का. सोसा. |
| 53 | उल्हासनगर-3 येथील प्र क्र. 22इंदिरागांधी बगीच्याची दुरूस्ती करणे व देखभाल करणेबाबत (प्रभाग समित-2 निधी 827) | 99600/- | 16/2/04 | मे साईलक्ष्मी म. का. सोसा. |
| 54 | उल्हासनगर-3 येथील गुरूद्वारा समोर, गुरूतेग बहादूर नगर,प्र.क्र. 23 येथे सी सी व नाली बनविणेबाबत(गलिच्छ वस्ती निधी 829) | 182000/- | 16/2/04 | मे शिवानी म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

***स्थायी समिती ठराव क्र.१८७*** ***दिनांक:-१७. ३. २००४***

*सुचकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी*

*अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदीनी बामणकर*

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**एकमताने**

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय क्र. ५:-उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ''सेतु'' प्रकल्प कार्यान्वित करणेकामी मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीज यांचेशी प्रशासनाने निविदेशिवाय केलेली थेट संविदा कायम करणे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-याच्याबददल माहिती सांगा.

मा.प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-जिल्हाधिकारी यांच्याकडुन सॉफ्टवेअर घ्यायचे आहे. त्याच्यासाठी २२५००/- यांना दयायचे आहेत. राज्य शासनाचे निर्णय आहेत यावर मंजुरी घ्यावी लागते.

काही सदस्य :-पास.

मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ५:-उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ''सेतु'' प्रकल्प कार्यान्वित करणेकामी मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीज यांचेशी प्रशासनाने निविदेशिवाय केलेली थेट संविदा कायम करणे.

**प्रस्तावना**

शासन निर्णय नगरविकास विभाग क्रमांक अविआ-१०२००३/प्र.क्र. २७/०३/२००३/नवि-४, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २७ फेब्रुवारी, २००३ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रशासन गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने व कामकाजात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने नागपूर व उल्हासनगर महानगरपालिकांमधील प्रायोगिक तत्त्वावर संगणीकरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिका संगणकीकरण्याच्या अनुषंगाने नागरीकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता ''सेतु'' हा महाराष्ट्र शासनाने विकसित केलेल्या प्रकल्प उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वीत करणेबाबत

मा. सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, यांच्याकडे विचारणा करण्यात आलेली होती.

या संदर्भात संचालक तथा सहसचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, यांनी ''सेतु'' आज्ञावली वापरण्याबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची हरकत नसल्याचे, तसेच अज्ञावलीच्या अंमलबजावणीसाठी मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीज् यांच्याशी संपर्क साधणे, व आज्ञावली एका नागरी सुविधा केंद्रात राबविण्यासाठी रुपये २२,५००/- एवढी रक्कम मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीज यांना देण्याबाबत शासनाने निविदा नुसार ठरविले असल्याचे क्रमांकःडीआयटीफाईल ०४/३९ , दिनांक ९/३/२००४ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने निर्देशित केल्यानुसार मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीज यांचेकडुन ''सेतु'' प्रकल्प उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वित करणेसाठी त्यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देणेसाठी मा. स्थायी समितीच्या पटलावर सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१८८</u> <u>दिनांकः-१७. ३. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तवानेनुसार उल्हासनगर महापालिकेत ''सेतु'' प्रकल्प कार्यान्वित करणेकामी प्रशासनाने मे. व्होरा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीज यांचेशी निविदेशिवाय केलेल्या थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

विषय क्र. ६:-विविध पंपिंग स्टेशन्स चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामी प्रशासनाने मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनीअरींग सर्विसेस, डोंबिवली यांच्याशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने दिनांक <u>१/१०/२००२</u> ते ३१/०५/२००३ या कालावधीसाठी केलेल्या

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-नविन एजंट मार्चनंतर नियुक्त होईल.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-नवीन ठेकेदाराचे दर काय आहेत कमी आहेत का?

श्री. जवादे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग):-१२ टक्के ने कमी आहेत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-मागच्या वर्षापेक्षा कमी आहेत ना?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-मागच्या वर्षा पेक्षा किती कमी आहेत?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आयुक्त साहेब आले आहेत तेव्हा पासुन प्रत्येकाचे दर कमीच असतात. ते महानगरपालिकेची बचत करतात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मला समजले तुम्हाला काय म्हणायचे ते.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहेत.

विषय क्र. ६:-विविध पंपिंग स्टेशन्स चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामी प्रशासनाने मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनीअरींग सर्विसेस, डोंबिवली यांच्याशी पूर्वीच्या संविदेतील अटी, शर्ती व दराने दिनांक १/१०/२००२ ते ३१/०५/२००३ या कालावधीसाठी केलेल्या मुदतवाढीच्या संविदेस कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील पाणी वितरणासाठी विविध बुस्टर पंपिंग स्टेशनस चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे हे काम वार्षिक कंत्राटी पध्दतीने मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांना कार्यादेश क्र. यु.एम.सी /डब्ल्यू एस. एस. डी /मेकॅ /१९३४, दिनांक २९.९.२००१ नुसार देण्यात आले. सदर कामाची मुदत दिनांक ३०.९.२००२ रोजी संपली मात्र तोपर्यंत नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया सुरु होती. नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्विच्याच ठेकेदाराने काम सुरु ठेवावे या निविदेतील अटीनुसार मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांना निविदा दराने काम पूढे सुरु ठेवले.

आता नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पाणी पुरवठा विभागाचे पत्र क्र. यू.एम.सी. /डब्लू एस एस डी /मेकॅ १४९१, दिनांक ३१.५.२००३ नुसार नविन ठेकेदारास कार्यादेश देण्यात आलेले आहे. व दिनांक १.६.२००३ पासून नविन ठेकेदाराने काम सुरु केलेले आहे.

मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार दिनांक १.१०.२००२ ते ३१.५.२००३ या कालावधीत उपरोक्त काम सुरु ठेवलेले असल्यामुळे त्यांना वरील कालावधीसाठी व त्यांच्या मंजुर निविदा दराने झालेला खर्च रुपये १२२३२९०/- मात्र च्या रक्कमेस कार्योत्तर मंजूरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजूरी मिळावी ही विनंती.

स्थायी समिती ठराव क्र.१८९ दिनांक:-१७. ३. २००४

सुचकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील विविध पंपींग स्टेशन्स चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेकामी प्रशासनाने मे. ओम इंडस्ट्रिअल इंजिनीअरींग सर्विसेस, डोंबिवली यांचेशी पूर्वीच्या करारातील अटी, शर्ती व दराने दिनांक १/१०/२००२ ते ३१/५/२००३ या कालावधीसाठी केलेल्या मुदतवाढीच्या संविदेस कायम करित आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

विषय क्र. ७:-सबडिव्हिजन कंपाऊंड, पंपहाऊस, उल्हासनगर-५ येथे कंट्रोल पॅनेल व स्टार्टरचा पुरवठा, उभारणी व कार्यान्वित करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>किती दिवस लागतात? किती खर्च आहे?

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग):-</u>१५ वर्षापुर्वीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>अंदाजाने नका सांगु नक्की सांगा.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग):-</u>२० लाखाचे पुढे जाईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>प्राकलन तयार करण्यासाठी तुमचे पुढे आणले आहे.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहेत.

विषय क्र. ७:-सबडिव्हिजन कंपाऊंड, पंपहाऊस, उल्हासनगर-५ येथे कंट्रोल पॅनेल व स्टार्टरचा पुरवठा, उभारणी व कार्यान्वित करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

सबडिव्हिजन कंपाऊंड, पंपहाऊस, येथून उल्हासनगर-४ व ५ च्या भागात पाणी पुरवठा केला जातो. मात्र या पंपहाऊस मधील पॅनलबोर्ड व स्टार्टर ही पंपिंग मशिनरी जूनी व खिळखिळी झाल्यामुळे मोठा बिघाड होऊन पाणी पुरवठा केव्हाही खंडीत होण्याची शक्यता आहे. तसेच पंपिंग मशिनरी जूनी व कालबाह्य झाल्यामुळे मशिनरी वारंवार दुरुस्त करावी लागते व त्यासाठी लागणारे कंपनी निर्मित सुटे भाग सहजतेने बाजारात उपलब्ध होत नाहीत.

म्हणून कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभागातर्फे सदर पंपिंग स्टेशनमध्ये दोन नविन स्टार्टर्स व कंट्रोल पॅनल बसविणेच्या कामाबाबतचा रुपये ४,५३,९२१/- मात्र खर्चाचा प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार वरील कामाच्या खर्चाचा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजूरी मिळावी.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>१९०                    <u>दिनांक:-१७. ३. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती निता अहूजा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सबडिव्हिजन कंपाऊंड हाऊस, पंप हाऊस, उल्हासनगर-५ येथे पाणी पुरवठा करणेकामी पंपहाऊस मधील पंपींग मशिनरीचे पॅनेल बोर्ड व स्टार्टर दुरुस्तीकामी रु ४,५३,९२१/- च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र. ८ वाचून दाखवितात.

विषय क्र. ८:-उल्हासनगर महानगरपालिका हददीत जाहिरात फलक लावणेकामी उल्हासनगर कॅम्प कमांक १ ते ३ साठी मे. किंग एन्टरप्रायजेस व कॅम्प नं ४ व ५ साठी मे. पवन ॲडव्हर्टायजिंग या उच्चतम दराच्या निविदाकारांशी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-</u>यापुर्वी ज्यांना ठेका दिला त्यांनी पुर्ण रक्कम दिली का?

श्री. कोळेकर (उपायुक्त कर विभाग):-बाकी आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-किती बाकी आहे?

श्री. कोळेकर (उपायुक्त कर विभाग):-सहा लाख.

मा. प्रभारी आयुक्त (श्रीआर. के. सोनवणे):-बाकी आहे म्हणुन रदद केले. मिळकत जप्त करून वसुली करतील.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-चांगल्यातला चांगला विषय आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्रीआर. के. सोनवणे):-मागच्या पेक्षा यावेळी पाच लाख उत्पन्न जास्त मिळणार.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-शहराचे आधुनिकीकरण होत चालले आहे. दिड वर्ष झाले महासभेत आले होते. नियंत्रण नसल्यामुळे बरोबर होत नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्रीआर. के. सोनवणे):-पाच लाख पुरेसे आहे. महाराष्ट्र शासनाने नियम तयार केले नव्हते. आता मात्र राज्यशासनाच्या धोरणाशी सुसंगत आहे. वाटाघाटी बोलावले ३ लाखापेक्षा वाढवले.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-होऊ शकते अजुन वाढवतील तुम्ही प्रयत्न करा.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-मागील ठेकेदाराने पैसे वाढविले आहे का? त्यांचेवर काय कार्यवाही केली अशा ठेकेदारांना का काम देतात जे पैसे देत नाही.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहेत.

विषय क्र. ८:-उल्हासनगर महानगरपालिका हददीत जाहिरात फलक लावणेकामी उल्हासनगर कॅम्प कमांक १ ते ३ साठी मे. किंग एन्टरप्रायजेस व कॅम्प नं ४ व ५ साठी मे. पवन ॲडव्हर्टायजिंग या उच्चतम दराच्या निविदाकारांशी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकने महापालिका हददीत विद्युत खांबावर तसेच होर्डींगव्दारे जाहिरात फलक लावण्यासाठी कॅम्प क १ ,२ ,३ साठी एक तसेच ४ , ५ साठी एक अशा एकुण दोन निविदा मागविले होत्या निविदतील समाविष्ट अटी व शर्ती प्रमाणे विद्युत खांबावर जाहिरात फलक तसेच होर्डींग्स उभारण्यासाठी आवश्यक ती साहित्य सामुग्रीची व्यवस्था एजन्सीने स्वतःच्या खर्चाने करावयाची आहे. निविदा कराराचा कालावधी तीन वर्ष असून सदर निविदासाठी तीन राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरीय वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. सदर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालील प्रमाणेः-

कॅम्प कमांक १ ,२ ,३ करीता जाहिरातीचे दर :-

| अक | निविदादाराचे नांव | १३३ विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | १२०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी | २५ मीटर फुग्या (प्रति मीटर | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रति महा) | प्रति महा) | |
| १ | किंग इंटर प्रायजेस | ३६ . ३६ | ३६ . ३६ | १८ | १७,६१,०४३-६८/- |
| २ | लक्ष्मी ॲडव्हा एजेन्सी | ३३ | ३३ | ९ | १५,९१,७०४/- |
| ३ | चंद्रा बदर्स | २७ | २९ | २७ | १४,०६,३७६/- |

कॅम्प कमांक ४ , ५ करीता जाहिरातीचे दर :-

| अ क | निविदादाराचे नांव | १८६ विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | ४०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | १० मीटर फुग्या (प्रति मीटर प्रति महा) | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| ४ | पवन ॲडव्हा | ९ | १६ . २० | १८ | ३,००,०२४/- |
| ५ | किंग इंटर प्रायजेस | १८ | ७ .२० | ३० | २,३५,००८/- |

उपरोक्त तक्त्यातील रक्कमेची तुलना करता कॅम्प क. १,२,३ साठी मेसर्स किंग इंटरप्रायजेस यांनी सादर केलेली रक्कम रुपये १७,६१,०४३/- सर्वात जास्त असून कॅम्प ४,५ व करीता मेसर्स पवन ॲडव्हाईसमेंट यांनी सादर केलेली रक्कम ही रुपये ३,००,०२४/- सर्वात जास्त आहे दोन्ही कॅम्प १,२,३ व ४, ५ ची रक्कम मिळून <u>२०६१०६७/-</u> एवढी होते. सदरहु रक्कम वरिल दोन्ही उच्चतम निविदा धारकास जाहिरातीचा धंदा मिळाला अथवा न मिळाला तरी भरणे बंधनकारक असून सदरची रक्कम सहा सहा महिन्याच्या कालावधीत आगावू भरावयाची आहे.

मागील चार वर्षासाठी महानगरपालिकेने होर्डींग्स व विद्युत खांबावर जाहिरातीसाठी जी निविदा मागविली होती, त्या दरांचा तपशिल व त्यादरानुसार तीन वर्षाच्या कालावधीत अपेक्षीत उत्त्पन्नांचा तपशिल पुढील प्रमाणे

कॅम्प कमांक १,२,३ करीता जाहिरातीचे दर :-

| अ क | निविदादाराचे नांव | १५० विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | ४०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | फुग्या (प्रति मीटर प्रति महा) | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | काईटीजा ॲडव्हाटाईजिंग | १०६ . ४० | ६४ . ५० | निविदेत समाविष्ट केलेले नव्होते | १५०३३६०/- |

कॅम्प कमांक ४ , ५ करीता जाहिरातीचे दर :-

| अ | निविदादाराचे | १८६ विद्युत | २५० | फुग्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|

| क्र | नांव | खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | चौ मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | (प्रति मीटर प्रति महा) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २ | ब्लाजो अडव्हाटाईजिंग | १४ | १३ ५० | निविदेत समाविष्ट केलेले नव्होते | २१५२४४/- |

दोन्ही कॅम्प १ ,२ ,३ व ४ ,५ ची रक्कम मिळून १७१८६०४/-एवढी होते.

अशाच प्रकारच्या होर्डींग्स, विद्युत खांबावर जाहिरातीसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेनेही ५ वर्षाच्या कालावधीसाठी निविदा मागविले होते सदर निविदेसाठी प्राप्त झालेल्या दरांची माहिती उपलब्ध करण्यासाठी मा . आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक : उमपा / कर / एलएस १४८/०३ दिनांक १/१२/२००३ अन्वये विनंती करण्यांत आली होती . त्यानुसार तोंडी माहिती प्राप्त झाली असून ती खालील प्रमाणे येत आहे.

<u>होडींग्स व विद्युत खांब दोन्ही करीता प्रती चौ फुट प्रति वर्ष दर :</u>

| वर्ष | कल्याण पश्चिम | कल्याण पुर्व | डोंबिवली पश्चिम | डोंबिवली पुर्व |
|---|---|---|---|---|
| २००२-२००३ | ३० | ११ ५० | २२ | ४६ |
| २००३-२००४ | ३३ | ११ ५० | २२ | ५२ |
| २००४-२००५ | ३६ | ११ ५० | २२ | ५६ |
| २००५-२००६ | ३८ | ११ ५० | २२ | ५६ |
| २००६-२००७ | ३९ | ११ ५० | २२ | ६३ |

उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या दरांची तुलना करण्यासाठी कडोंमनपाच्या उपरोक्त दरांना प्रति चौरस मिटर, प्रति महा मध्ये बदल केल्यास ते खालील प्रमाणे येत आहे

<u>होडींग्स व विद्युत खांब दोन्ही करीता प्रती चौ मीटर प्रति महा दर</u>

| वर्ष | कल्याण पश्चिम | कल्याण पुर्व | डोंबिवली पश्चिम | डोंबिवली पुर्व |
|---|---|---|---|---|
| २००२ ते २००७ | ३१ ५६ | १० ३१ | १९ .७२ | ४८ .९५ |

कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथील वरिल मंजूर दर व उल्हासनगर महानगरपालिकेसाठी प्राप्त झालेले दर हे जवळ जवळ सारखे आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी मागील कालावधीसाठी प्राप्त झालेले दर हे आता प्राप्त झालेल्या दरापेक्षा जास्त असले तरी होर्डींगची कमीत कमी क्षेत्राची मोठ्या प्रमाणात वाढ केल्याने अपेक्षित उत्त्पन्न मागील कालावधीपेक्षा जास्त होते. तरीही महाराष्ट् बी व सी विभाग, परिपत्रक क्रमांक पी-४५६-सी, मंत्रालय, मुंबई-३२ डी- दि. १९/१/१९७३ मधील तरतुदीनुसार दोन फे-यात वाटाघाटी करण्यात आल्या. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

दिनांक २२/१/२००४ रोजी झालेल्या पहिल्या फेरीत उच्चतम निविदाधारकासोबत झालेल्या वाटाघाटीच्या दरांचा तपशिल पुढील प्रमाणे.

<u>कॅम्प क्रमांक १ ,२ ,३ करीता जाहिरातीचे दर :-</u>

| अ क | तपशिल | १३३ विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | १२०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | २५ मीटर फुग्या (प्रति मीटर प्रति महा) | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाटाघाटीत सादर केलेले दर | ३८ | ३८ | १९ | १८ ,४० ,६४४/- |

<u>कॅम्प क्रमांक ४ , ५ करीता जाहिरातीचे दर :-</u>

| अ क | तपशिल | १८६ विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | ४०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | १० मीटर फुग्या (प्रति मीटर प्रति महा) | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| | वाटाघाटीत सादर केलेले दर | ९ ४५ | १६ ५० | १० | ३ ,०८ ,०७७/- |

सबब जाहिरात फलक लावणे या स्वरुपात दोघांची एकूण रक्कम **रुपये**<u>२१ ,४८ ,७२१/-</u>एवढी रक्कम होत आहे.

दिनांक ४/२/२००४ रोजी दुस-या फेरीत सर्व निविदाधारकांकडून बंद लखोट्यात मागविण्यात आलेल्या दरांचा तपशिल खालील प्रमाणे.

<u>कॅम्प क्रमांक १ ,२ ,३ करीता जाहिरातीचे दर :-</u>

| अ क | निविदादाराचे नांव | १३३ विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | १२०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | २५ मीटर फुग्या (प्रति मीटर प्रति महा) | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | किंग इंटर प्रायजेस | ४० | ४२ | २० | २०२३९२०/- |
| २ | लक्ष्मी ॲडव्हा एजेन्सी | ३९ | ४१ ५० | १९ | १९९६४३२/- |
| ३ | चंद्रा बदर्स | ४० | ३८ | ३० | १८४३९२०/- |

<u>कॅम्प क्रमांक ४ , ५ करीता जाहिरातीचे दर :-</u>

| अ क | निविदादाराचे नांव | १८६ विद्युत खांबा (प्रती विद्युत खांब प्रति महा) | ४०० चौ . मीटर होर्डींग्स (प्रती चौ मी प्रति महा) | १० मीटर फुग्या (प्रति मीटर प्रति महा) | एकूण रक्कम (तीन वर्षासाठी) |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | पवन ॲडव्हा | १२ | २२ | ३० | ४०७९५२/- |
| ५ | किंग इंटर प्रायजेस | १८ | १७ | ३५ | ३७७९२८/- |

उपरोक्त दुस-या फेरीत सादर केलेल्या दरांची तुलना करता, कॅम्प क्रमांक १,२ व ३ साठी मेसर्स किंग इन्टरप्राईजेस यांनी फेर सादर केलेल्या दरांची एकूण रक्कम रुपये २०२३९२०/- सर्वात जास्त असून कॅम्प क्रमांक ४ व ५ साठी मेसर्स पवन ॲडव्हाटायझिंग यांनी सादर केलेल्या दरांची रक्कम रुपये ४०७९५२/- सर्वात जास्त आहे. दोघांची मिळून एकूण रक्कम रुपये २४,३१,८७२/- इतकी रक्कम महापालिकेस जाहिरात फलकाच्या स्वरुपात मिळू शकेल.

सबब वरील निविदेत सादर केलेल्या दरांचा विचार करता, कॅम्प क्रमांक १, २, व ३ साठी मेसर्स किंग इन्टरप्राईजेस व कॅम्प क्रमां ४, ५ साठी मेसर्स पवन ॲडव्हाटायझिंग यांची उच्चतम दराची निविदा स्वीकारणेस स्थायी समिती मंजुरीसाठी प्रस्तावीत करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१९१ दिनांकः-१७. ३. २००४

सुचकाचे नाव :- श्रीमती निता अहूजा
अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावानेनुसार उल्हासनगर महानगरपालिका हददीत जाहिरात फलक लावणेकामी कॅम्प नं १ ते ३ साठी मे. किंग एन्टरप्रायजेस व कॅम्प नं ४ व ५ साठी मे. पवन ॲडव्हटायजिंग या उच्चतम दराच्या निविदाकारांशी प्रशासनास संविदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ९:-वर्ष २००३-०४ मध्ये कर कसुरदारांच्या स्थावर मालमत्तांची जप्ती / अटकावुन ठेवण्यात आलेल्या मालमत्तांच्या विक्रीसाठी महापालिकेच्या वतीने आयुक्तांना प्रत्येक मालमत्तेसाठी रु १/- बोली बोलण्यास मान्यता देणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- आता निवडणुकीची प्रकिया चालु होणार आहे. अशावेळी ही नविन पध्दत कशासाठी आणत आहात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):- ही पध्दत नवीन नाही. तसा कायदा आहे.

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> ही पध्दत यापूर्वीच यायला हवी होती. आता हे आणणे चुकीचे आहे. यामध्ये काही विवाद निर्माण झाल्यास लोक जनप्रतिनिधींना रस्त्यावर फिरु देणार नाहीत. त्यामुळे हा विषय मागे घ्यावा.*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> ब-याच वेळा बिलाची रक्कम रु ४००० असते पण ती वाढवुन रु १०००० पर्यंत दाखवतात. यामुळे गरिब लोकांना त्रास होईल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> ही जी वसुली करणार आहोत ती वर्षानुवर्षे थकबाकी असलेल्या थकबाकीदारांकडुन करण्यात येणार आहे. यामध्ये गरीब लोकांना त्रास होणार नाही.*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> काही लोकांच्या बिलाबाबत विवाद आहेत, त्यांना यामुळे समस्या होवु शकते.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> तुम्ही हवे तर हा विषय नोंदवुन घ्या. तुम्ही जर यास संमती देत नसाल तर मी विषय मागे घेईन. ही जी थकबाकी वाढत आहे ती गेल्या १०-१२ वर्षांपासुन वाढलेली आहे. अशा मालमत्तांवर सुमारे ५. ७८ कोटी एवढी थकबाकी आहे. ती वसुल करण्यासाठी लिलाव पुकारला असता कोणीही पुढे आले नाही, त्यामुळे आयुक्तांना रु १/- ही नाममात्र बोली लावुन मालमत्ता विकत घेण्यासाठी अधिकार द्यावेत यासाठी हा विषय आणलेला आहे. मी आपल्याला स्पष्टपणे सांगु इच्छितो की, यापूर्वी नंदलाल समितीच्या अहवालात स्पष्टपणे नमुद केले आहे की, करांची थकबाकी वसुल करणेसाठी या महापालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांनी योग्य ते प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे ही थकबाकी वाढलेली आहे. तुम्ही हा विषय मान्य केल्यास यामुळे नुकसान होणार नाही झाला तर महापालिकेचा फायदाच होईल. यामुळे वसुल होणा-या रक्कमेतुन आपण विकास कामे हाती घेवु शकु.*

*<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> हा विषय पुढे ढकलला जावा.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> आपले जे मत आहे ते कायद्याला धरुन नाही.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> आपल्याला वसुलीत वाढ करायची असेल तर त्यासाठी ज्या मालमत्तांचे कर निर्धारण अद्याप केलेले नाही, त्यांचे कर निर्धारण करावे. अशा ब-याच मालमत्ता आहेत. तुमच्याकडे अशा मालमत्तांची आकडेवारी आहे का, उदा० २००-४००-६०० असे. आतापर्यंत जे कर निर्धारण झालेले आहे ते बरेचसे चुकीचे आहे. माझ्याजवळ याची बरीच उदाहरणे आहेत. दुसरे असे की, यामुळे गरीब माणसांवर अन्याय व्हायला नको. ज्यांचे निर्धारण १५ वर्षे झालेले नाही अशा मालमत्ता धारकांकडुन तुम्ही वसुली करा.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> आम्ही जे कर निर्धारण केलेले आहे ते योग्य आहे. निर्धारण झाल्यानंतर आम्ही प्रत्येक व्यक्तिला स्पेशल नोटीस देवुन त्याच्या हरकती मागवतो. त्यानंतर त्याला सुनावणी देवुन योग्य निर्णय घेतो. त्यामुळे आमचे निर्धारण योग्य आहे. तसेच हा जो प्रस्ताव आहे तो नवीन कर निर्धारणाचा नसुन ज्या मालमत्ता जप्त केलेल्या आहेत त्यांची बोली बोलण्याचा आहे. आम्हाला अशी पाऊले उचलणे आवश्यक आहे. कारण आपण जेव्हा अर्थसंकल्प तयार करता तेव्हा त्यात रु ५५ कोटी एवढी रक्कम कर वसुलीपासुन अपेक्षित करतो. प्रशासन रु ४० कोटी करते पण आपण ती वाढवुन रु ५५ कोटी एवढी करता. आणि जेव्हा आम्ही वसुलीसाठी प्रयत्न करतो तेव्हा आपण त्यास साथ देत नाही. आपली ही भुमिका दुहेरी भुमिका आहे. जर आपण हा प्रस्ताव मंजुर केला नाही तर यामुळे शहरातील जनतेला चुकीचा संदेश जाईल की, प्रशासनाच्या भुमिकेला जनप्रतिनिधींचे सहकार्य नाही. यामुळे वसुलीत घट होवु शकते. त्यामुळे आपण हा प्रस्ताव मंजुर करा. आपण प्रस्ताव नामंजुर केल्यास मी तो राज्य शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठवुन देईन.*

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :</u> आपण जे नवीन कर निर्धारण केलेले आहे, त्याचे दर पाहुन लोक वेडे झाले आहेत. जेव्हा आपण त्यांना मालमत्ता कराचे देयक पाठवाल तेव्हा ते पाहुन लोक आम्हाला मारायला धावतील. तसेच आपले लोक जे वसुलीसाठी जातील तेव्हा देखिल भांडणे होतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> मी आपल्या म्हणण्याशी सहमत नाही. यापूर्वी ज्या मालमत्तांचे निर्धारण चुकीचे झाले होते ते आता योग्य झालेले आहे, त्यामुळे तुम्हाला देयक वाढल्याचे वाटते.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :-</u> आम्हाला लोकांनी निवडुन दिलेले आहे, त्यामुळे आम्हाला लोकांचा विचार हा करायलाच हवा. आपण कर वाढविल्याने लोक आम्हाला शिव्या देत आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> आम्ही ही जी कर आकारणी केलेली आहे ती सुनावणी घेवुन त्यांनतरच अंतिम केलेली आहे. तुम्हाला हे दर जास्त वाटत असतील तर तुम्ही कल्याण, ठाणे व भिवंडी येथील महापालिकांचे मालमत्ता कराचे दर पहा ते आपल्यापेक्षा जास्त आहेत.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :-</u> हा विषय आला म्हणुन मी आपल्या निदर्शनास आणुन दिले.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> ज्या व्यक्तिंना हरकत घ्यायची होती त्याची अंतिम तारीख काय ठेवलेली आहे ?

<u>उप आयुक्त (शहर) :-</u> प्रत्येकाला वेगवेगळी तारीख दिलेली आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> काही लोकांना आता नोटीसा येत आहेत. ते केव्हा हरकत घेणार ?

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> जो व्यक्ती हरकत घेईल त्या प्रत्येकाची सुनावणी घेतील जाईल.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> मालमत्ता कराची देयके जास्त आल्याने लोकांमध्ये गैरसमज निर्माण होत आहेत.

<u>उप आयुक्त (शहर) :-</u> यापूर्वी मालमत्तांचे निर्धारण चुकीचे झाले होते, ते आता योग्य झाल्याने आपणांस देयक जास्त वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> हा विषय या बैठकीपुरता पुढे ढकलण्यात यावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> आपण मंजुरी न दिल्यास आम्ही जप्त केलेल्या मालमत्तांचे लिलाव पुकारु.

<u>मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :-</u> आपल्या घरपट्टी वसुलीला कोणीही नगरसेवक विरोध करत नाही. आम्ही घरोघरी जावुन सर्वांना घरपट्टी अदा करण्याच्या सूचना देत आहोत. त्यामुळे असे करणे योग्य नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> तुम्ही थकबाकीदारांची यादी बघा, त्यानंतर बोला.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> आता आपण हा विषय पुढे ढकलु. त्यानंतर सर्व पक्षांच्या नेत्त्यांशी याबाबत चर्चा करुन त्यानंतर यावर निर्णय घेवु, आम्हाला यासाठी वेळ दिला जावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> अर्थसंकल्पाच्या वेळी तुम्ही सांगता जास्तीत जास्त वसुली करा, आता यासाठी विषय आणला तर आपण सहकार्य देत नाही. आपली ही दुहेरी भुमिका योग्य नाही. आपल्याला पुढे ढकलायचा असेल तर ढकला तो स्थायी समितीचा अधिकार आहे.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> आम्हाला यावर विचार विनीमय करण्यासाठी १५ मिनीटांचा अवधी दिला जावा.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरची सभा १५ मिनीटांसाठी तहकुब करण्यात येत आहे.

<u>१५ मिनीटानंतर पुन्हा चर्चेस प्रारंभ करण्यात आला</u>

यावेळी सन्माननीय सदस्य श्री मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> आयुक्त साहेब सध्या हा विषय आम्ही पुढे ढकलत आहोत. आम्ही सर्व पक्षांच्या नेत्त्यांसमवेत याबाबत चर्चा करुन त्यानंतर निर्णय घेवु.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> तुम्ही असे करीत असाल तर मी विषय मागे घेतो. हा विषय महापालिकेच्या हिताच्या विरुध्द नाही, हे आपण समजुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :-</u> आम्ही पास करु पण विरोधी पक्षातील सदस्य याला विरोध करतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> का विरोध करतील ?

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> आमचा या विषयाला विरोध नाही, परंतु सध्या हा विषय पुढे ढकलला जावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> तुम्हाला हा विषयच कळलेला नाही.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> त्यासाठीच आम्हाला वेळ हवा आहे.

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा विषय सर्वानुमते पुढे ढकलण्यात येत आहे.

*विषय क्र. ९:-वर्ष २००३-०४ मध्ये कर कसुरदारांच्या स्थावर मालमत्तांची जप्ती / अटकावुन ठेवण्यात आलेल्या मालमत्तांच्या विकीसाठी महापालिकेच्या वतीने आयुक्तांना प्रत्येक मालमत्तेसाठी रु १/- बोली बोलण्यास मान्यता देणे.*

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> आज प्रशासनाच्या वतीने आयत्त्या वेळचे विषय म्हणुन ३ प्रस्ताव आणलेले आहेत, आपल्यापैकी बहुसंख्य सदस्यांची मान्यता असल्यास सदरचे विषय आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येतील.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचे विषय आयत्त्या वेळचे विषय म्हणुन आजच्या सभेच्या कामकाजात सर्वानुमते समाविष्ट करण्यात येत आहेत.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र १० वाचुन दाखवितात.

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

विषय क्र. १०:-खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे या कामास (दोन महिनेच्या कालावधीसाठी) मुदतवाढ मिळणेबाबत.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> २ महिन्यांसाठी मुदतवाढ आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> संपुर्ण वर्षभर काम केले आहे, आता २ महिन्यांची मुदतवाढ द्यायची आहे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास ....

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. १०:-खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे या कामास (दोन महिनेच्या कालावधीसाठी) मुदतवाढ मिळणेबाबत.

खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे हे काम वार्षिक कंत्राटी पध्दतीने मे. ओम. इंडस्ट्रीयल इंजि. सर्व्हि. डोंबिवली यांना कार्यादेश क्र. युएमसी/डब्लु एसएसडी/मेक/२२० दि. ३१.०१.२००४ नुसार देण्यात आले. सदर कामाची मुदत दि. ३१.१.२००४ रोजी संपली मात्र नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया सुरू असुन, नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदाराने काम सुरू ठेवावे या निविदेतील अटीनुसार मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्ही. डोंबिवली यांनी निविदा दराने पुढे काम सुरू ठेवले आहे.

आता, नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया अंतीम टप्प्यात असुन गोषवारा मंजुरीकरिता मा. स्थायी समिती समोर सादर केलेला आहे. मा. स्थायी समितीच्या मंजुरी नंतर सदर काम नविन ठेकेदार मे. कल्पतरू इंजिनिअर्स, बदलापुर यांना मंजुर दराने दि. १.४.२००४ पासुन देण्यात येईल.

मे. ओम इंडस्ट्रीअल इंजि. सर्व्हि. डोंबिवली यांनी निविदा अटी व शर्तीनुसार दि. १.२.२००४ पासुन उपरोक्त काम सुरू ठेवलेले असल्यामुळे त्यांना वरील दोन महिनेच्या कालावधीसाठी व त्यांच्या मंजुर निविदा दराने अंदाजित खर्च रू. ८,८,२४१/- मात्र च्या रक्कमेस मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळावी हि विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१९२</u> <u>दिनांकः-१७. ३. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेकामी प्रशासनाने मे. ओम इंडस्ट्रिअल इंजिनीअरींग सर्विसेस, डोंबिवली यांचेशी पूर्वीच्या करारातील अटी, शर्ती व दराने दिनांक १/२/२००४ ते ३१/३/२००४ या कालावधीसाठी केलेल्या मुदतवाढीच्या संविदेस कायम करित आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालि

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र ११ वाचुन दाखवितात.

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

<u>विषय क्र. ११:-</u>खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे या कामी लघुत्तम दराच्या संविदेस मान्यता मिळणेबाबत.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास ....

<u>मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :-</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

<u>विषय क्र. ११:-</u>खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे या कामी लघुत्तम दराच्या संविदेस मान्यता मिळणेबाबत.

खडेगोळवली येथिल मलप्रक्रिया केंद्र वार्षिक कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे या कामाबाबतचा रू. १२,६०,३३९/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र. १७४ दि. ९.२.२००४ नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळाली असुन बाब क्र. ११३० दि. १३.२.२००४ नुसार तांत्रिक मान्यता दिली आहे.

या कामाकरिता महानगरपालिकेने दि. १३.२.२००४ रोजी राज्यस्तरीय दैनिक '' आपला वार्ताहर'' व दि. १४.२.२००४ च्या जिल्हास्तरीय साप्ताहिक ''भारत लोकधारा'' या वृत्तपत्रामधुन निविदा सुचना प्रसिध्द केली. या निविदा सुचनेनुसार दोन ठेकेदारांनी निविदा मिळणेकरिता पत्र दिले मात्र त्यापैकी एकच ठेकेदार पात्र ठरत असल्याने त्यांना निविदा देण्यात आली.

ठेकेदार मेसर्स. कल्पतरू इंजिनिअर्स, बदलापुर यांनी भरलेली निविदा दि. १.३.२००४ रोजी दुपारी १५.०० वाजता महानगरपालिकेस सादर केली. त्यात ठेकेदार मेसर्स. कल्पतरू इंजिनिअर्स, बदलापुर यांनी अंदाजपत्रकीय दरास निविदा काम

करण्याचे नमूद केलेले आहे. मात्र मागील वर्षाच्या तुलनेने आताचे नविन दर जास्त वाटत असल्याने ठेकेदारास वाटाघाटी करणे करिता दि. १२.३.२००४ रोजी आयुक्त कार्यालयात बोलविले असता त्यांनी एकूण २% दर कमी करून (रू. १२,३५,१३२/-मात्र) काम करण्याचे लेखी पत्र दिले आहे.

त्यानुसार ठेकेदार मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स, बदलापुर यांची रू. १२,३५,१३२/- मात्र किंमतीची निविदा रास्त व वाजवी असल्याने स्विकारण्याचे प्रस्तावित आहे. तरी सदर कामाचे खर्चास प्रशासकीय वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजूरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>१९३ <u>दिनांकः-१७. ३. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खडेगोळवली येथील मलप्रक्रिया केंद चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी प्रशासनास मे. कल्पतरू इंजिनिअर्स, बदलापुर या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> विषय क्र १२ वाचुन दाखवितात.

<u>आयत्यावेळचा विषयः-</u>

<u>विषय क्र. १२:-</u>शिक्षण उपकर व रोजगार हमी कर वसुलीसाठी तहसिलदार उल्हासनगर यांनी बजावलेल्या अधिपत्राविरूध्द सक्षम न्यायालयात दावा/ याचिका दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> महापालिका राज्य शासनाच्या वतीने मालमत्ता कराच्या देयकात शिक्षण उपकर व रोजगार हमी कर वसुल करते. त्यानंतर सदरची रक्कम शासनाकडे जमा केली जाते. ज्या मालमत्ताधारकांकडुन अद्याप थकबाकी वसुल झालेली नाही अशा रक्कमेसाठी तहसिलदार, उल्हासनगर यांनी महापालिकेवर अधिपत्र बजावलेले आहे. याविरुध्द न्यायालयात दाद मागण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> रक्कम किती आहे?

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :-</u> सुमारे रु १० कोटी एवढी आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त :-</u> जे पैसे जनतेला भरायचे आहेत त्यासाठी महापालिकेला नोटीस देण्यात आलेली असुन महापालिकेची मालमत्ता जप्त करण्यासाठी वारंट

बजावण्यात आलेले आहे. यापूर्वी नवी मुंबई महापालिकेचे बॅक खाते यासाठी सिल करण्याचा प्रकार झालेला आहे. अशी परिस्थिती आहे तरी देखिल आपण जप्त केलेल्या मालमत्ता लिलाव करण्यासाठी परवानगी देत नाही.

मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :- ही किती वर्षांची थकबाकी आहे?

मा. प्रभारी आयुक्त :- १०-१५ वर्षांची आहे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :- आतापर्यंत आपण थोडीतरी रक्कम भरली असेल ना.

मा. प्रभारी आयुक्त :- हो भरलेली आहे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-जर रक्कम भरलेली असेल तर अधिपत्र बजाविण्याची आवश्यकता नव्हती.

काही सदस्य :- पास, पास . . . .

मा. सभापती (श्रीमती ज्योती कलानी) :- सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. १२:-शिक्षण उपकर व रोजगार हमी कर वसुलीसाठी
तहसिलदार उल्हासनगर यांनी बजावलेल्या
अधिपत्राविरूध्द सक्षम न्यायालयात दावा/ याचिका
दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रफळातील विविध मालमत्ताधारकांकडुन येणे असलेल्या शिक्षण उपकर व रोजगार हमी कर ची रक्कम रु १०,५८,४५,५९९/- च्या वसुलीसाठी तहसिलदार, उल्हासनगर यांनी त्यांचेकडील दिनांक ६/३/२००४ च्या पत्रान्वये अधिपत्र बजाविलेले आहे. शिक्षण उपकर व रोजगार हमी कराची वसुली महापालिका राज्य शासनाच्या वतीने अभिकरण म्हणुन काम करित आहे. सदरचे कर देण्याची प्राथमिक जबाबदारी महानगरपालिकेची नाही.

त्यामुळे तहसिलदार यांनी केलेली मागणी बेकायदेशिर असल्याने त्याविरुध्द सक्षम न्यायालयात महापालिकेची बाजु मांडुन स्थगन आदेश प्राप्त करणे व सदरचे अधिपत्र रदद करणे आवश्यक आहे. सबब, महापालिकेच्या वतीने न्यायालयात दावा / याचिका दाखल व त्यासाठी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.१९४ दिनांक:-१७. ३. २००४

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार तहसिलदार, उल्हासनगर यांनी महापालिकेवर दिनांक १५.३.२००४ च्या बजावलेल्या अधिपत्राविरूध्द सक्षम न्यायालयात महापालिकेच्या वतीने दावा किंवा याचिका दाखल करणे मान्य करीत आहे व आवश्यक खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५-५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दि:-१६.४.२००४.

## दि. १६.४.२००४रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १६.४.२००४ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी
२. श्री. वनवारी किशोर नारायणदास
३. श्री. वेहरानी मोहन वर्यलदास
४. श्री. ऐडके गणपत गोविंद
५. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
६. श्रीमती. जावळे संगिता रमेश
७. श्री. वठिजा संजय रामचंद्र
८. श्रीमती. वनवारी मोना अशोक
९. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
१०. श्री. सोनवणे नथु काशिराम
११. श्री. उमाप रामदास रघोजी
१२. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
१३. श्रीमती छाविया भारती
१४. श्री. जेसवानी सतरामदास
१५. श्री. पंजाबी नारायण
१६. श्रीमती वामणकर नंदीनी

सांयकाळी ४-१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> स्थायी समिती सभापती यांनी दि. ६.४.२००४ रोजी आपल्या पदावरून राजीनामा दिला आहे. व त्या सभापती पदासाठी उमेदवार म्हणुन उभे आहेत. म्हणुन या सभेत आपल्या सदस्यांमधुन कुणा तरी एका सदस्याची पीठासिन अधिकारी म्हणुन निवड करायची आहे. आपण सुचवा पीठासीन अधिकारी पद कोण ग्रहण करणार.

<u>काही सदस्य:-</u>श्री. किशोर वनवारी यांना पीठसीन अधिकारी म्हणुन बसु दयावे.

सर्व सदस्यांच्या संमतीने श्री. किशोर वनवारी हे पीठसीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे स्थायी समिती सभेत अनुपस्थितीत होते त्यांच्या अनुपस्थितीत स्थायी समितीतील त्यांचे आसनावर श्री.

पी. डी. कोळेकर, उपायुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणून आसनस्थ झाले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १:- स्थायी समितीच्या सभापतींची नेमणूक करणे.</u>

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>विषय पुन्हा वाचावे.

मा. सचिव यांनी विषय पुन्हा वाचुन दाखविला.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>तुम्ही जे लिहिता सभापतींची नेमणुक करणे बाबत ते चुकीचे आहे. नेमणुक मॅनेजमेंट करते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तुम्हाला हवे तर तसे म्हणु शकता. कायदयामध्ये तसेच लिहिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>आमच्या अभ्यासानुसार निवड वेगळे व नेमणुक हे वेगळे आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीप्रमाणे नेमणुक शब्दाचा उपयोग केला आहे. म्हणुन त्या शब्दाचा विषयात वापर करणे आवश्यक आहे. आपण विषयात निवड किंवा नेमणुक शब्दाचा उपयोग करा अर्थ एकच आहे. त्यामुळे विषयावर परिणाम होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>आमच्या मते ते तसे नाही कर्मचा-यांची नियुक्ती करताना नेमणुकच म्हंटले जाते. आणि निवडणुक करताना निवड असे म्हंटले जाते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कायदयात तसे आहे.

स्थायी समिती सभापती पदासाठी दोन उमेदवार शिल्लक राहिलेले आहेत. त्यांची नावे मी वाचून दाखवितो. पहिल्या क्रमांकावर श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) व दुस-या क्रमांकावर श्री. सोनवणे नथु काशिराम यांचे नाव आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित असेल तर ५ मिनिटांची वेळ दिली जात आहे. आता ४ वाजून २० मिनिटे झाली आहेत.

यावेळी संध्याकाळचे ४ वाजुन २५ मिनिटे झाली आहेत. पाच मिनिटाची वेळ संपली आहे आणि कोणी आपली उमेदवारी मागे घ्यायला इच्छुक दिसत नाही. स्थायी समिती सभापतीसाठी एक पद रिक्त आहे. रिक्तपदापेक्षा जास्त उमेदवार असल्याने गुप्त मतदानाची आवश्यकता भासते.

<u>गुप्त मतदानाची रित :-</u> पुढील रितीने गुप्त मतदान घेण्यात येईल.

निवडणूक प्रक्रिया आणि गुप्त मतदानापुर्वी आवश्यक त्या सुचना मी आपणांस देवू इच्छितो, आपणांस अशा प्रकारची मतपत्रिका मिळेल. या मतपत्रिकेच्या वरच्या बाजूला छोटी छोटी छिद्र असतील, ज्यांस इंग्रजीमध्ये परफोरेशन असे म्हणतात. हया मतपत्रिकेवर महानगरपालिकेची मुद्रा (सिल) उमटविलेली असेल हया मतपत्रिकेवर पहिल्या क्रमांकावर श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) व दुस-या क्रमांकावर श्री. सोनवणे नथु काशिराम यांचे नाव आहे. मतपत्रिका देतांना आपले नाव लिहून स्वाक्षरी घेऊन मतपत्रिका आपणास दिली जाईल.

श्री. दा. अ. पाटील, मुख्य लेखा अधिकारी व श्री. सु.के. घोलप मुख्य लेखा परिक्षक यांची नेमणूक परिनिरिक्षक म्हणून करण्यात आलेली आहे. मतदान होण्यापूर्वी मी आपणास मतपेटी रिकामी असल्याचे दाखवित आहे. कृपया ते पाहून घ्यावे आता ही मतपेटी वापरासाठी कुलूप लावून बंद करतो या प्रयोजनासाठी श्री. गणेश शिंपी, लघुलेखक यांना मतदान अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल आणि हया मतपेटीची किल्ली मी स्वत:जवळ ठेवत आहे. प्रत्येक स्थायी समिती सदस्य या सभागृहात मतदानासाठी जी जागा राखून ठेवण्यात आलेली आहे तेथे जाऊन मतदान करतील तिथे मतदान करण्यापूर्वी प्रत्त्येक स्थायी समिती सदस्यांचे मी नाव पुकारेल त्यानंतर प्रत्त्येक स्थायी समिती सदस्य मतदान अधिका-याकडे जाऊन मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर त्यांचे नावासमोर स्वाक्षरी देऊन एक मतपत्रिका घेईल. मतपत्रिका मिळाल्यानंतर स्थायी समिती सदस्य मतदान केंद्रात प्रवेश करुन त्त्या प्रयोजनासाठी मतदान केंद्राजवळील एका टेबलापाशी जाऊन आपले मत नोंदविल, मतपत्रिकेची घडी घातल्यानंतर आपली मतपत्रिका मा. पीठासीन अधिकारी समोर ठेवलेल्या मतपेटीत टाकील. आणि लगेच आपल्या जागेवर बसतील. मा. स्थायी समिती सभापती मतदानासाठी एका तासाची वेळ निश्चित करण्यांत येत आहे.

मतदान चालू असतांना कोणत्त्याही वेळी एखादा स्थायी समिती सदस्य दुस-याची मतपत्रिका पाहत असल्याचे किंवा आपली मतपत्रिका इतर कुणास दाखवत असल्याचे, मतदान अधिका-यास दिसून येईल तर तो उक्त मतपत्रिका मतपेटीत न टाकता, ती बाजूला काढून ठेवील व ती गोष्ट मा. पीठासीन प्राधिका-याच्या नजरेस आणुन देईल व त्त्यानंतर तो ती मतपत्रिका रदद करवील. स्थायी समिती सदस्यास देण्यात आलेली मतपत्रिका अगर खराब होईल तेव्हा त्याला मा. पिठासीन प्राधिका-याच्या परवानगीने दुसरी मतपत्रिका देता येईल, खराब झालेली मतपत्रिका मा. पिठासीन प्राधिका-यांच्या उपस्थितीत ती नष्ट करण्यात येईल किंवा मोहोरबंद करण्यात येईल.

वरीलप्रमाणे मतदानासाठी निश्चित करण्यात आलेली वेळ संपल्यानंतर मतदान अधिकारी मा. पिठासीन प्राधिका-याकडे मतपेटी आणतील व मतदान संपल्याचे ते तात्त्काळ घोषित करतील व अशा घोषणेनंतर कोणत्त्याही मतपत्रिका घेण्यात व स्विकारण्यात येणार नाही. मा. पिठासीन अधिकारी यांनी मतपेटी उघडल्यांनतर त्यातुन मतपत्रिका बाहेर काढतील व त्यावर स्वाक्षरी करुन परिनिरिक्षकांचे स्वाधीन करतील.

परिनिरिक्षक, विधी अग्राहय मतपत्रिका कोणत्त्याही असल्यास, नाकारल्यानंतर प्रत्त्येक उमेदवारास मिळालेली मते मोजील व उमेदवाराची नावे व प्रत्त्येक उमेदवारास मिळालेल्या एकूण मतांची संख्या दर्शविणारी यादी तयार करील आणि अशी यादी मा. पिठासीन प्राधिका-याकडे सादर करील. मा. पिठासीन प्राधिकारी , यादीतील उमेदवारांची नावे व प्रत्त्येक उमेदवा-यास मिळालेली एकूण मते वाचून दाखविल. सर्वाधिक मते प्राप्त करणारा, त्यानंतर दुस-या मतांची सर्वाधिक मते प्राप्त करणारा उमेदवार याचप्रमाणे मा. पिठसीन प्राधिकारी कडुन घोषित करण्यात येतील.

जर समसमान मते पडली व पीठसीन अधिकारी यांनी आपले निर्णायक मत दिले नाही तर गुप्त मतदानाचा निकाल चिठ्ठ्या टाकुन करण्यांत येईल. असे मा. पिठासिन प्राधिकारी घोषित करतील, उपस्थित राहून मतदान करणारे बहुसंख्य सन्माननिय स्थायी समिती सदस्य ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठ्या काढण्यात येतील, ज्या उमेदवाराचे नावाची चिठ्ठी निघेल

तो उमेदवार मा. पीठसीन प्राधिका-याकडुन नेमण्यात व निवडण्यात आल्याचे घोषित करण्यात येईल.

निवडणुक लढविणा-या उमेदवारास, मत मोजणीचे काम प्रत्यक्षांत चालू असेल त्या जागी हजर राहण्याचा हक्क असेल. एखादा उमेदवार हजर राहणार नसेल तर त्यास, मतमोजणीचे काम पाहण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून इतर कोणत्त्याही सदस्यास, प्रतिनियुक्त करता येईल. मात्र मतदानात प्रत्यक्ष प्रारंभ होण्यापुर्वी पिठासिन प्राधिका-यास अशा प्रतिनिधीचे नावं लेखी कळविले पाहिजे.

सूचनाः-

१. तुम्हास एक मत आहे.
२. मत फुलीच्या (x)अशा खुणेत दाखवायचे आहे.
३. तुम्ही आपले मत कोणत्त्याही एका उमेदवारास तुमच्या पसंतीप्रमाणे देऊ शकता.
४. एका पेक्षा जास्त फुल्या करू नका.
५. उमेदवाराच्या नावासमोरील रकान्यात मताची खुण करणेची आहे.
६. तुम्हाला ही खुण दिलेल्या साहित्त्यानेच करावयाची आहे.

मतपत्रिका खालील कारणांमुळे रदद् होईल.

१. सभासदाने मतपत्रिकेवर स्वाक्षरी केली किंवा ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर.
२ मतपत्रिका स्थळ विभागापासून फाडूनघेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादा रेषेच्या (परफोरेशन) दोन्ही बाजुस मिळुन मुद्रेचा ठसा उमटविलेला नसेल तर.
३. मतपत्रिकेवर मत निर्देशक खुणा (फुली) नसेल किंवा ती संशयास्पद असेल तर.
४. मतपत्रिकेवर अधिक फुल्या असतील तर...

आता ४ वाजुन ३० मिनिटे झाली आहे. आता निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे स्थायी समिती सभेत अनुपस्थितीत होते त्यांच्या अनुपस्थितीत स्थायी समितीतील त्यांचे आसनावर श्री.उत्तम लोणरे, उपायुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणून आसनस्थ झाले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मी आता मतदानासाठी एकेका सदस्याचे नाव पुकारत आहे.

४ वाजुन ४५ मिनिटांनी मतदान प्रक्रिया संपली.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला व आपले आसन ग्रहण केले.

मा. सचिव :- आता ४ वाजुन ४५ मिनिटे झाले आहे. आता थोडयावेळात मा. पीठसीन अधिकारी निकाल जाहिर करतील. एकेक उमेदवार किंवा स्वतः प्रतिनीधी यांनी परिनिरीक्षकांकडे जाऊ शकतात.

विषयः- स्थायी समितीच्या सभापतीची नेमणुक करणे.

प्रस्तावना

सन २००४-२००५ करिता स्थायी समितीच्या सभापतीची नेमणुक करणे कामी आयुक्तांनी दिनांक १६.४.२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता स्थायी समितीची सभा बोलावली आहे. स्थायी समिती सभा सूचने सह प्रत्येक स्थायी समिती सदस्याला निवडणुक कार्यक्रम पुरविण्यात आला होता त्या कार्यक्रमानुसार स्थायी समिती सभापती पदाच्या नेमणुकीसाठी दिनांक ८.४.२००४ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ या दरम्यान नामनिर्देशनपत्र स्विकारण्यासाठी निश्चित करण्यांत आलेल्या मुदती अंतर्गत तीन उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र महापालिका सचिवांकडे दाखल केले. ज्यांची नामनिर्देशनपत्र वैध झाली त्यांची नावे येणेप्रमाणेः-

१. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)

२. श्री. वनवारी किशोर नारायणदास

३. श्री. सोनवणे नथु काशिराम

निवडणुक कार्यक्रमानुसार उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेस विहित मुदतीत वरील उमेदवारांपैकी श्री. किशोर वनवारी यांनी आपली उमेदवारी मागे घेतली व इतर दोन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली नसल्याने रिंगणात दोन उमेदवार शिल्लक राहिले त्यामुळे गुप्त मतदानाची आवश्यकता भासल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करणेस व तदनंतर निवडणूक निकाल जाहिर करणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १</u>　　　　<u>दिनांकः- १६.४.२००४</u>

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार 16 स्थायी समिती सदस्यांनी केलेल्या गुप्त मतदानाअंती खाली दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहिर करीत आहे आणि सर्वात जास्त मते मिळालेल्या उमेदवार श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) यांना " स्थायी समिती सभापती " पदावर निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
|---|---|
| १. श्रीमती.कालानी ज्योती सुरेश (पप्पु) | ११ |

२. श्री. सोनवणे नथु काशिराम ०४

०१ अवैध

<u>मतदानाव्दारे मंजुर</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. पीठासीन अधिकारी :-</u>प्रत्येक उपस्थित सदस्यांच्या गुप्त मतदानाअंती आलेल्या निकालाप्रमाणे मी स्थायी समितीतर्फे श्रीमती. ज्योती कालानी सुरेश (पप्पु) यांना ११ मते तर दुसरे उमेदवार श्री. सोनवणे नथु काशिराम यांना ४ मते मिळाले असुन श्रीमती. ज्योती कालानी सुरेश (पप्पु) यांना सर्वाधिक म्हणजे ११मते मिळाल्याने त्या मा. स्थायी समिती सभापती पदी निवडून आल्याचे मी जाहिर करत आहे.

निवडणुक निकाल जाहिर झाल्यानंतर श्रीमती. ज्योती कालानी सुरेश (पप्पु) स्थायी समिती सभापती स्थानी आसनस्थ झाल्या. तदनंतर माननीय आयुक्त यांनी मा. सभापती व इतर नव्याने स्थायी समितीवर निवडुन आलेल्या आठ सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सायंकाळी ५-३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक : १७ मे, २००४

<u>दिनांक १७/०५/२००४ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार, दिनांक १७ मे २००४ रोजी सायंकाळी ४-३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्यां/सदस्या उपस्थित होते/होत्त्या.

०१) मा.सभापती :-श्रीमती. ज्योती कालानी.

०२) श्री वनवारी किशोर नारायणदास
०३) श्री एडके गणपत गोविंद
०४) श्री गायकवाड सुरेश नामदेव
०५) श्रीमती जावळे संगिता रमेश
०६) श्री बठिजा संजय रामचंद
०७) श्रीमती वनवारी मोना अशोक
०८) श्री साधवानी मोहन रहंदोमल
०९) श्री सोनवणे नथु काशिराम

१०) श्री उमाप रामदास राघोजी
११) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
१२) श्री जेसवानी सतरामदास फतनदास
१३) श्री पंजाबी नारायण सन्मुखदास
१४) श्री बेहरानी मोहन
१५) श्रीमती छाबरिया भारती
१६) श्रीमती बामणकर नंदिनी

सायंकाळी ४-५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री उत्तम लोणारे, उप आयुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- विषय क्र. १ वाचून दाखवितात.

विषय :- मागील सभेचे दिनांक १२/०५/२००४ रोजीचे
इतिवृत्त कायम करणे.

मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :- सभापती महोदया मागील बैठकीच्या इतिवृत्तात पृष्ठ क्र ५४ वर माझ्या नावासमोरील वाक्यात ''चोपडा कोर्टाच्या मागील बाजुस असलेला हॅडपंप'' असे मी प्रत्यक्षात बोलले होते परंतु इतिवृत्तात त्याची नोंद ''माझ्या प्रभागात'' अशी झालेली आहे, तरी कृपया चुकीची दुरुस्ती करण्यात यावी.

मा. सचिव :- इतिवृत्तात तशी सुधारणा करण्यात येईल.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- यामध्ये एक विषय अजुन आहे, ब-याच प्रभागात मुकादम नाहीत, त्यामुळे सफाई कामगारांवर पर्यवेक्षण व्यवस्थित होत नाही. तर माझ्या प्रभागात कधीपासुन मुकादम नाही याची माहिती संबधित अधिका-यांनी द्यावी. माझा प्रभाग क्रमांक ६ असा आहे. कृपया वैद्यकिय आरोग्य अधिका-यांनी याची माहिती द्यावी.

मा. सदस्य श्री नथु सोनवणे :- माझ्या प्रभागात देखिल मुकादम नाही, साफसफाई व्यवस्थित होत नाही, गटारे भरून वाहत आहेत. तुम्ही आताही येवुन पाहणी करु शकता. यासाठी मी वैद्यकिय अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री म्हात्रे यांना भेटलो तरी काम होत नाही. साफसफाईच्या कामासाठी दुप्पट पैसे मोजले जात आहेत, तरी साफसफाई व्यवस्थित होत नाही, तर याचा फायदा काय? तुम्हाला वाटत असेल की मी खोटे बोलत आहे तर माझ्या बरोबर पाच पंच द्या त्यांना नेऊन मी प्रभाग दाखवतो. यासाठी हवे असेल तर मी कॅमेरा घेवुन फोटो काढले असते परंतु त्यासाठी पैसे लागतात म्हणुन फोटो काढले नाही. माझ्या घराच्या बाजुला किती घाण आहे ते ही मी दाखवतो. या प्रभागातील स्वच्छता निरीक्षक श्री व्ही. एस. जाधव, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री के. एन. म्हात्रे व वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री खरात हे काय करतात? श्री खरात हे एकही तक्रार गांभीर्याने घेत नाहीत.

मा. सभापती :- हा विषय आजच्या विषय सुचीवर नाही, तुम्ही विषय सुचीवर बोलावे.

मा. सदस्या श्री नथु सोनवणे :- विषय तर फक्त ५ मिनीटांचेच आहेत. हा शहरातील साफसफाईचा महत्त्वाचा विषय आहे.

*<u>मा. सभापती :-</u> तुम्हा हा मुददा महासभेत उपस्थित करु शकता, स्थायी समितीमध्ये नाही. असे मुददे चर्चेसाठी स्थायी समितीमध्ये येत नाहीत.*

*<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u> याबाबत कोणालाही माहिती हवी असेल तर महासभेत प्रश्न, लक्षवेधी, हरकतीचा मुददा उपस्थित करुन माहिती घेवु शकतात. हे मुददे स्थायी समितीत चर्चा करण्याचे नसुन महासभेचे आहेत. येथे आता फक्त इतिवृत्ताशी संबधित चर्चा करा. बैठक संपल्यानंतर आपल्याला जे काही बोलायचे असेल ते बोला.*

*<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :-</u> असे असेल तर यापुढे विषय सुचीवर एक ओळ लिहीत जा की, येथे फक्त विषयावरच बोलता येईल, जास्त बोलता येणार नाही.*

*<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u> बैठक संपल्यावर या विषयावर बोला असे मी तुम्हाला सांगितले.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> मा. सभापती महोदया मी सांगु इच्छितो की, हा विषय इतिवृत्ताशी संबधितच आहे. मागील बैठकीत हा विषय निघाला होता तेव्हा प्रशासनातर्फे आश्वासन देण्यात आले होते की, तुमच्या प्रभागात मुकादम देण्यात येईल. त्यामुळे मी हा मुददा येथे उपस्थित केला आहे. त्यामुळे यांनी उत्तर द्यायला हवे की किती दिवसांपासुन माझ्या प्रभागात मुकादम नाही? प्रशासन फक्त आश्वासन देते परंतु अंमलबजावणी मात्र करीत नाही. हे चुकीचे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u> मागील बैठकीत जेव्हा त्यांनी हा मुददा उपस्थित केला होता तेव्हा देखिल मी त्यांना सांगितले होते की, हा मुददा स्थायी समितीचा नाही. तरी देखिल मी श्री लोणारे यांना सांगितले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, शिक्षणाची अट १० वी वरुन ७ वी एवढी शिथील करा त्यानंतर अजुन ७६ मुकादमांची नियुक्ती करण्यात येईल परंतु अद्याप तसा प्रस्ताव महासभेत आला नाही. त्यावर श्री लोणारे यांनी याबाबतचा प्रस्ताव पुढील महिन्याच्या महासभेत म्हणजे जुन महिन्यात आणु असे सांगितले आहे. तर आता यावर चर्चा करण्यात काही अर्थ नाही.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> माझा मुददा असा होता की, माझ्या प्रभागात यापूर्वी मुकादम होता परंतु त्याची बदली करण्यात आली. तर त्याच्या जागी दुस-या मुकादमाची नियुक्ती करणे हे प्रशासनाचे दायित्त्व आहे. जर मी हा मुददा येथे उपस्थित केला नाही तर प्रभागात रोगराई पसरेल. येथे शहराच्या हिताशी निगडीत कोणताही प्रश्न उपस्थित करता येवु शकतो. प्रशासन फक्त आश्वासन देते पण अंमलबजावणी मात्र करीत नाही. एकाची बदली केल्यावर त्या ठिकाणी दुसरा मुकादम द्यायला हवा.*

*<u>आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :-</u> आम्ही मुकादमांची वाटणी व्यवस्थितरित्त्या केलेली आहे. आपली काही तक्रार असेल तर आम्ही उपायुक्त (आरोग्य) यांचे समवेत त्या ठिकाणी पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करु. प्रत्त्येक ठिकाणी मुकादम देणे आम्हाला शक्य नाही. आपल्याकडे ७६ प्रभाग आहेत व मुकादम कमी आहेत त्यामुळे हे शक्य नाही. मुकादम असण्यावर साफसफाई अवलंबुन नाही, साफसफाई व्यवस्थित होत असेल तर मुकादमाची आवश्यकता नाही. तुम्ही आम्हाला ज्या ठिकाणी साफसफाई होत नाही असे ठिकाणी दाखवा आम्ही त्वरित कार्यवाही करतो. बदल्या करणे ही प्रशासनिक बाब आहे यामध्ये आपण हस्तक्षेप करणे योग्य नाही.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> एकाची बदली झाल्यावर दुसरा मुकादम त्या ठिकाणी का नाही दिला? याचे आधी उत्तर द्या.*

आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :-बदली करणे ही एक प्रशासकीय बाब आहे. आपल्या प्रभागात स्वच्छता होते अथवा नाही ही बाब महत्त्वाची आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- माझ्या प्रभागात साफसफाई व्यवस्थित झाली असती तर हा प्रश्न येथे उपस्थितच केला नसता. साफसफाई होत नाही म्हणुन मुददा उपस्थित केला.

मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :- त्यांच्या प्रभागात बदली केली असेल तर तेथे दुसरा माणुस देवुन टाका, एवढी चर्चा कशाला करता.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- तुम्ही असे जाणुनबुजून करीत आहात. एकाची बदली केली तर दुसरा का दिला नाही?

आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :- या बाबत नेमकी परिस्थिती काय आहे हे मला आता माहिती नाही. आपल्या प्रभागात स्वच्छता होते अथवा नाही हे मी बघतो आणि होत नसेल तर तेथे मुकादम देतो.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- तुम्ही मला सरळ उत्तर द्या की, मुकादम देतो, एवढी चर्चा काय करता.

आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :- मी माहिती घेतो व गरज असेल तर तेथे मुकादम देतो.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- म्हणजे गरज नसेल तर नाही देणार. वैद्यकिय आरोग्य अधिका-यांना विचारा गरज आहे की नाही. हे पाहणे प्रशासनाचे काम आहे.

आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :- मी १९ तारखेला आपल्याला मुकादम देतो.

मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :- मी इतिवृत्तातील एका मुददयावर बोलु इच्छितो. मागील बैठकीत पॅनेल नं २५ मधील एक शौचालय निष्कासीन करण्याचा प्रस्ताव आला होता. त्यामध्ये श्री खरात यांनी लिहीले आहे की, संबधित नगरसेविका श्रीमती मिनु राज दासानी यांनी पत्र दिले असुन त्यानुसार हा प्रस्ताव आणलेला आहे. तर मी श्री खरात यांना विचारु इच्छितो की, मी १५/१२/२००३ ला शौचालय तोडण्यासाठी एक पत्र दिले होते, तर माझा प्रस्ताव अद्याप बैठकीत का ठेवण्यात आलेला नाही? याचे उत्तर श्री खरात यांनी द्यावे.
श्री के. आर. खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी :- आमच्याकडे नुकतेच प्राप्त झालेले प्रस्ताव आम्ही येथे ठेवलेले आहेत, आपला प्रस्ताव मला अद्याप मिळालेला नाही, तो मिळाल्यानंतर मी प्रस्ताव येथे सादर करतो.

मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :- माझा प्रस्ताव आपल्याला प्राप्त झालेला आहे. मी आपल्याशी याबददल बोललो आहे तेव्हा आपण सांगितले की मिळाला आणि आज सांगता की पत्र मिळाले नाही. हे कसे काय बोलत आहात? डिसेंबर महिन्यात आपणांस अर्ज दिला तरी काम होत नाही हे चुकीचे आहे. तुम्ही मला याचे लेखी उत्तर द्या. आधी दिलेले अर्ज सोडुन नंतर आलेल्या अर्जांवर प्रस्ताव सादर केले जात आहेत. हे काय चालु आहे? प्रशासन काय करत आहे.

श्री के. आर. खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी :- ठिक आहे, मी आपणाांस याचे उत्तर देतो व काय कार्यवाही केली याचा अहवाल पुढील बैठकीत देतो.

मा. सचिव :-मा. सभापती महोदया मागील बैठकीच्या इतिवृत्तात ठराव कमांक २ ,३ ,४ ,५ व १२ मध्ये सभापती/पीठासीन अधिकारी असा उल्लेख करण्यात आलेला आहे त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येत असुन ते पीठासीन अधिकारी असे

वाचावे. तसेच ठराव कमांक २५ मध्ये शेवटच्या ओळीत ''देत येत आहे'' असे उल्लेखण्यात आले आहे त्याऐवजी ''देत आहे'' असे वाचण्यात यावे.

<u>मा. सभापती :-</u> मागील बैठकीचे दिनांक १२/५/२००४ रोजीचे इतिवृत्त वर उल्लेखिलेल्या सुधारणांसह सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.
<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक २ वाचुन दाखवितात .

विषय क्र. २:- उल्हासनगर शहरातील कॅम्प नं १ ते ५ मधील रस्त्यावर पडलेले खड्डे भरणेकामी प्रशासनास मे. जयहिंद इन्फास्ट्रक्चर्स या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> याबददल मी बोलु इच्छितो की, दरवर्षी रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी रु ५० लाख खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात येतो, ही रक्कम काही कमी नाही. वास्तविक हा प्रस्ताव दरवर्षी यायला नको. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, जो ठेकेदार हे काम करतो तो अत्यंत निकृष्ट रितीने हे काम करतो, व केलेल्या कामाचे बिल वाढवुन सादर करतो. खराब काम केल्यानेच दरवर्षी हा प्रस्ताव येथे येतो. यामध्ये प्रस्तावात लिहीले जाते की, मागील वर्षीच्या पध्दतीनेच प्रस्ताव सादर केला आहे याचा अर्थ काय? रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पावसाळया अगोदर करणे गरजेचे आहे परंतु काम व्यवस्थित न होण्याचे कारण म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचारीवर्ग आहे. ते या कामावर पर्यवेक्षण व्यवस्थित करीत नाही. ५० लाखांचे काम करण्यात येते, परंतु रस्त्यावर तेवढेच खड्डे दिसतात. यासाठी सभापतींनी स्थायी समितीमधील काही सदस्यांची या कामावर पर्यवेक्षण करण्यासाठी नियुक्ती करायला हवी म्हणजे काम व्यवस्थित होते अथवा नाही ते कळुन येईल. हे काम करण्यासाठी कमीत कमी एक महिना आधी बैठक ठेवायला हवी होती. आता पावसाळा सुरु झाल्यावर हे काम केले तर पावसामुळे खड्डयात टाकलेली माती निघुन जाईल व तेथे परत खड्डा होईल. मला नाईलाजाने असे म्हणावे लागत आहे की, हे जे काम होईल त्याचे चित्रीकरण आम्हाला करावे लागेल, त्यामुळे काम खरोखर होत आहे अथवा नाही ते कळेल. तसेच यासाठी जो खर्च येईल तो ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावा. दरवर्षी आपण या कामावर ५० लाख रु खर्च करतो परंतु रस्त्यांवरील खड्डे तसेच असतात.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :-</u> याचे काम आता चालु झाले आहे काय?

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> आयआरडीपी अंतर्गत ३३ रस्ते बनविण्यात आले होते, तर त्या रस्त्यांची दुरुस्ती करणे ठेकेदारांवर बंधनकारक आहे किंवा नाही? त्यांची दुरुस्ती त्यांनी करायला हवी.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :-</u>मागील वर्षी या कामांवर किती खर्च झालेला आहे?

<u>श्री एस. बी. सुखरामानी, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :-</u> ही जी कामे करणार आहोत त्यामध्ये आयआरडीपीचे ३३ रस्ते समाविष्ट केलेले नाहीत. त्या रस्त्यांची ठेकेदारांना जी कामे देण्यात आली होती त्यावेळी करारात अट होती की, रस्ता पुर्ण झाल्यावर दोन वर्ष त्याची वॉरंटी असेल. त्या कालावधीत काही झाले तर ठेकेदार काम करेल, दोन वर्षानंतर त्यांची दुरुस्ती आपल्यातर्फे करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> त्या ३३ रस्त्यांची कामे नाहीत मग हा एवढा खर्च कसा काय आला आहे?

<u>श्री एस. बी. सुखरामानी, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :-</u> ही जी कामे करणार आहोत ती पावसाळयापूर्वी, पावसाच्या कालावधीत व पावसाळयानंतर अशी करणार आहोत, त्यामुळे रक्कम जास्त वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u>पावसाळयात कामे कशी काय करणार?

<u>श्री एस. बी. सुखरमानी, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :-</u> पावसाळयात ज्या ठिकाणी खड्डे पडतील तेथे मेटल टाकणार आहेत. तसेच हा जो प्रस्ताव आणलेला आहे तो दर करार करण्यासाठी आणलेला आहे. प्रत्त्येक रस्त्त्याचे काम स्वतंत्रपणे करण्यात येईल त्याचे बिल स्वतंत्र बनेल.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> आता सध्या शहरात खड्डयांची परिस्थिती काय आहे? तुम्ही ज्या रस्त्त्यांवर कामे करणार आहात त्यांची यादी आम्हाला द्यायला हवी होती. डी. पी रस्त्त्यांवरील लिंक रोडची जी कामे करणार आहेत त्यांची यादी द्यायला हवी होती. संबधित विभागातील कनिष्ठ अभियंत्याने त्या प्रभागातील नगरसेवकाला विश्वासात घेवुन भेटुन माहिती घ्यायला हवी होती. परंतु तसे न करता या ठिकाणी मनमानी करण्यात आलेली आहे. येथे फक्त मान्यता घ्यायची परंतु माहिती द्यायची नाही, हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u> मागील वर्षी जी कामे मंजुर करुन केलेली आहेत त्यांची यादी आम्हाला येथे द्यायला हवी. ज्या प्रभागात मागील वर्षी कामे झालेली नाहीत ती कामे प्राथम्याने हाती घ्यायला हवीत. प्रथम म्हणजे मागील वर्षी केलेल्या कामांची यादी स्थायी समितीमध्ये सादर करा आणि दुसरे म्हणजे जे खड्डे भरण्यात येणार आहेत, तर संबधित ठेकेदारांची सुरक्षा अनामत रक्कम सहा महिन्यांसाठी ठेवण्यात यावी, जर काम व्यवस्थित झाले नाही तर परत त्याच ठेकेदाराकडुन ते काम करुन घेण्यात यावे. मागील वर्षी जे प्रभाग या कामांपासुन वंचित राहिले ती कामे या वर्षी करण्यात यावीत. मागील वर्षी ही कामे करताना प्रशासनाने मनमानी केलेली आहे. आधी मागील वर्षी केलेल्या कामांची यादी स्थायी समितीत आणा ५० लाख कुठे व कसे वापरले ते सांगा व त्यानंतर हा विषय मान्यतेसाठी आणा. तो पर्यंत हा विषय पुढे ढकलण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> मागील वर्षाचीच का गेल्या ३ वर्षांची यादी सादर करा.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u> असे नाही, आपण ठेकेदाराची सुरक्षा अनामत सहा महिन्यांसाठी ठेवतो त्यामुळे मागील वर्षी ज्यांनी चुकीचे कामे केली त्यांच्यावर आपण दावा करु शकतो. मागील वर्षी काही प्रभागात अजिबात काम झाले नाही, असे होता कामा नये. तुम्ही ज्या प्रभागात ज्या रस्त्त्यांवर कामे करायची आहेत त्याची सविस्तर यादी स्थायी समितीमध्ये सादर करा मग स्थायी समिती यावर चर्चा करेल. आम्ही त्यामध्ये पाहु की त्याने काम व्यवस्थित केले आहे अथवा नाही. कामची प्रत चांगली आहे की नाही.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> मी यापूर्वी ५ वर्षांसाठी नगरसेवक होतो, आता २ वर्षे असे ७ वर्षे मला नगरसेवक म्हणुन झालेली आहेत तर गेल्या सात वर्षांमध्ये माझ्या प्रभागात खड्डे भरण्यासाठी एका घमेल्याचेपण काम झालेले नाही. हे जे प्रशासन आहे ते कागदी काम दाखविण्यात हुशार आहे परंतु जागेवर मात्र काम होत नाही. असे व्हायला नको. जेथे जेथे खड्डे आहेत ते सर्वीकडे भरायला हवेत. आम्ही या मुददयावर सहमत आहोत हा विषय पुढे ढकलला जावा.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> गेल्या वर्षीच्या कामांबाबत तर मला माहिती नाही परंतु या वर्षी श्री आयलानी हे शहर अभियंता आहेत, त्यांचे काम चांगले आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवा, हे काम मंजुर करुन टाका.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> प्रत्त्येक नगरसेवकाला विश्वासात घेवुन हे काम करण्यात यावे.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :-</u> मागील वर्षी ज्या ठिकाणी एकदा काम करण्यात आले असेल तर तेथे परत तेच काम करण्यात काही अर्थ नाही.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> आता लवकरच पावसाळा सुरु होणार आहे, त्यापूर्वी हे काम करणे आवश्यक आहे, त्यामुळे हे काम पुढे ढकलु नका. आयलानी साहेबांवर विश्वास ठेवुन काम पास करुन टाका.

<u>मा. सभापती :-</u> सदरचा विषय सर्वानुमते कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

विषय क्र. २:- उल्हासनगर शहरातील कॅम्प नं १ ते ५ मधील रस्त्त्यावर पडलेले खड्डे भरणेकामी प्रशासनास मे. जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर्स या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३:- प्रभाग क्रमांक १ मधील कोमल पार्क, गोल मैदान, उल्हासनगर-१ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाचा विनियोग करणेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :-</u>तेथे शौचालय तोडल्यानंतर जागा सांभाळुन ठेवा. तेथे दुकानाचे बांधकाम व्हायला नको. ही जबाबदारी प्रशासनाची आहे. शौचालय तोडल्यानंतर त्याचे फोटो काढुन ठेवा.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> फोटो तुम्ही काढा, जागा सांभाळण्याचे काम तुमचे देखिल आहे.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u>मी श्री नथु सोनवणे यांच्या मताशी सहमत आहे. तेथे अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याने सदरचा विषय पुढे ढकलण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री नथु सोनवणे :-</u>मागील बैठकीत सर्वांचे विषय पास केले तर आता पण तसेच करा. बहुमत आहे म्हणुन असे करु नका. विषय पास करताना पक्षपात करु नका. पास करुन टाका.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . .

<u>मा. सभापती :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ३:- प्रभाग क्रमांक १ मधील कोमल पार्क, गोल मैदान, उल्हासनगर-१ येथील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाचा विनियोग करणेस मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र श्री. राजेंद्रसिंह वी. भुल्लर (महाराज), नगरसेवक उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडुन आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे. सदर पत्रानुसार प्रभाग क्र. १ मध्ये कोमल पार्क, गोल मैदान, उल्हासनगर-१ येथे जुनाट व निरूपयोगी शौचालय आहे. सदर ठिकाणच्या नागरिकांना त्या शौचालयाचा उपयोग नाही. सदर शौचालयामुळे या ठिकाणच्या परिसरात मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला असुन दुर्गंधी पसरली आहे. यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. सदर शौचालय तोडून त्याठिकाणी नागरीकांच्या सार्वजनिक वापरासाठी सी.सी. पॅसेज बनविण्यात यावे अशी मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.

सदर शौचालयाचा पंचनामा श्री. व्ही. एस जाधव, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला असून सदर शौचालय तोडण्यास स्थानिक रहिवाशांनी सहमती दर्शविली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर ठिकाणी सी.सी. पॅसेज बनविण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्या ठिकाणी सी.सी. पॅसेज बनविणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३२</u> <u>दिनांकः-१७.५.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार प्रभाग क्रमांक १मधील कोमल पार्क, गोल मैदान उल्हासनगर-१ येथील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती/ पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४:- बॅ. क्र ११९८ व ११९९ जवळील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाचा विनियोग करणेस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . .

<u>मा. सभापती :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ४:- बॅ. क्र ११९८ व ११९९ जवळील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाचा विनियोग करणेस मान्यता देणे.

श्री. राजेंद्र चौधरी, (विरोधी पक्ष नेता), नगरसेवक, पॅनल क्र. १९, उल्हासनगर महानगरपालिका यांचे पत्रानुसार शांतीनगर, बॅरेक नं. ११९८ व ११९९ जवळील मोडकळीस आलेले ब्रिटीश काळात बांधण्यात आलेले सार्वजनिक शौचालय आहे. सदर शौचालयाचा वापर बंद असून शौचालयाचे जवळ दुर्गंधी

पसरली असल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असल्याने सदर शौचालय तोडण्याची विनंती त्यांनी केली आहे.

याबाबतचा अहवाल व पंचनामा श्री. राजेश थिटे, स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केला आहे सदर अहवालानुसार बॅरेक नं. ११९८ ते ११९९ समोरचे शौचालय वापरात नसून तेथील नागरीकांना त्याची आवश्यकता नाही. तेथे जवळच असेलेले ३ + ३ सीटचे शौचालयाचा वापर येथील पुरूष व स्त्रिया करतात. सदर शौचालयाचा पंचनामा स्वच्छता निरिक्षकांकडुन सादर करण्यात आला आहे. सदर शौचालय तोडून त्याठिकाणी प्रभाग क्र. १९ मधील सफाई कामगारांना हजेरी शेड बनविण्यात यावे अशी विनंती स्वच्छता निरिक्षकांनी केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर ठिकाणी सफाई कामगारांसाठी हजेरी शेड बनविण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्या ठिकाणी सफाई कामगारांसाठी हजेरी शेड बनविणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३३</u> <u>दिनांकः-१७. ५. २००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅ. क्र ११९८ व ११९९ जवळील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:- बॅ. क्र १०१३ व १०१७ जवळील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाचा विनियोग करणेस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . .

<u>मा. सभापती :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ५:- बॅ. क्र १०१३ व १०१७ जवळील वापरात नसलेल्या सार्वजनिक शौचालयाचा विनियोग करणेस मान्यता देणे.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र मा. नगरसेवक, श्री. मीनु राजदासानी यांचे कडून आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे. सदर पत्रानुसार बॅरेक नं. १०१३ व १०१७ येथील तीन शौचालय अतिशय वाईट अवस्थेत असल्याने सदर शौचालय कधीही पडण्याची शक्यता आहे. यामुळे सदर शौचालय तोडुन त्याठिकाणी सी. सी. पॅसेज बनविण्याची विनंती सदर नगरसेवक यांनी केली आहे.

सदर शौचालयाचा पंचनामा श्री. विजय गावित, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला असून स्थानिक रहिवाशांनी सदर शौचालय तोडण्याबाबत सहमती दर्शविली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर ठिकाणी सी. सी. पॅसेज बनविण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्याठिकाणी सी. सी. पॅसेज बनविणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३४</u> <u>दिनांक:-१७. ५. २००४</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅ. क्र १०१३ व १०१७ जवळील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :-</u>आज प्रशासनाच्या वतीने आयत्त्या वेळचे विषय म्हणुन २ प्रस्ताव आणण्यात आले आहेत, आपल्यापैकी बहुसंख्य सदस्यांची मान्यता असल्यास ते आजच्या विषय पत्रिकेच्या कामकाजात समाविष्ट करता येतील.

<u>मा. सभापती :-</u>सदरचे २ विषय आयत्त्या वेळचे विषय म्हणुन कामकाजात समाविष्ट करण्यात यावेत.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक ६ वाचुन दाखवितात.

<u>आयत्त्या वेळचा विषय :</u>

विषय क्र. ६:- बॅरेक नं. ७०६ , रूम नं३ , हास्पीटल विभाग,

उल्हासनगर-३ प्रभाग क्र. ६५, पॅनल क्र. ७ जवळील वापरात नसलेले शौचालय तोडुन सदर ठिकाणी मुतारी बांधणेबाबत.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> आमच्या सदस्या श्रीमती सांगिता जावळे यांची एक तक्रार आहे, ती कृपया ऐकुन घ्यावी.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u>कोणताही शौचालय तोडल्यानंतर त्या ठिकाणी परत मुतारी बनविण्यात येवु नये, त्या ठिकाणी नगरसेवकाला विचारून सीसी पॅसेज, उद्यान, एस आय ऑफिस अथवा समाजमंदिर बनविण्यात यावे. यासाठी संबधित विभागातील जनता व नगरसेवकाचा सल्ला घेण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> संबधित विभागातील नगरसेवक सांगेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> चोपडा कोर्टाच्या मागे असलेले शौचालय तोडल्यानंतर तेथे अतिक्रमण करण्यात येत आहे. हळुहळु तेथील बांधकाम वाढत चालले आहे. पुढील बैठकीत याबाबत अहवाल द्यावा. तसेच त्या ठिकाणी असलेल्या सार्वजनिक हॅडपंपवर मोटर बसवुन सोसायटीमध्ये अनाधिकृतपणे वापर चालु आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेला त्याचा काही एक फायदा होत नाही यावरही कार्यवाही करायला हवी.

<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :-</u> तेथे साईव्हिला अपार्टमेंट मधील रहिवासी त्याचा अनधिकृतपणे वापर करीत आहेत, शिवम हॉस्पीटलच्या बाजुला ती जागा आहे.
<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :-</u> साई व्हिला नाही साई शारदा आहे. तेथे पाणी टंचाई असल्याने ते तसे करीत आहेत. ५० घरांना त्याचा फायदा होत आहे. त्यामध्ये चुकीचे काय आहे?
<u>मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे :-</u> अधिका-यांना त्या ठिकाणी भेट देवुन पाहणी करायला सांगा व त्याची माहिती पुढील बैठकीत आम्हाला द्या. चोपडा कोर्टच्या मागील शौचालय तोडुन तेथे अनधिकृत बांधकाम केले आहे, त्याच्यावरही कार्यवाही करून आम्हाला अहवाल द्यावा. आम्हाला तुमची कामे करावी लागत आहेत.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . .

<u>मा. सभापती :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ६:- बॅरेक नं. ७०६, रूम नं.३, हास्पीटल विभाग, उल्हासनगर-३ प्रभाग क्र. ६५, पॅनल क्र. ७ जवळील वापरात नसलेले शौचालय तोडुन सदर ठिकाणी मुतारी बांधणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र मा. श्री. श्याम (मेजर) रोहीरा, नगरसेवक, उल्हासनगर महानगरपालिका यांचे कडुन आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे. सदर पत्रानुसार बॅरेक नं. ७०६, रूम नं. ३, हॉस्पीटल विभाग, उल्हासनगर-३, प्रभाग क्र. ६५ जवळ वापरात नसलेले शौचालय आहे. सदर शौचालय अतिशय वाईट स्थितीत आहे. तसेच सदर शौचालय वापरात नाही व ते दुरूस्त करीण्याचे स्थितीतही नाही. सदर शौचालयाव्दारे येथील जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे सदर शौचालय तोडणेची विनंती मा. श्री. श्याम (मेजर) रोहीरा, नगरसेवक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी केली आहे.

सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा श्री. दिपक उज्जैनवाल, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला असून सदर शौचालय तोडण्याची स्थानिक रहिवाशांनी सहमती दर्शविली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर ठिकाणी मुतारी बनविण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्याठिकाणी मुतारी बनविणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३५ <u>दिनांक:-१७.५.२००४</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. मोना वनवारी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅरेक नं. ७०६, रूम नं३, हास्पीटल विभाग, उल्हासनगर-३ प्रभाग क्र. ६५, पॅनल क्र. ७ जवळील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक ७ वाचुन दाखवितात.

<u>आयत्या वेळचा विषय :</u>

विषय क्र. ७:- बॅरेक नं. ४३८, चेलाराम सोसायटी, उल्हासनगर-३ येथील वापरात नसलेले शौचालय तोडुन सदर ठिकाणी मुतारी बांधणेबाबत.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . .

<u>मा. सभापती :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ७:- बॅरेक नं. ४३८, चेलाराम सोसायटी, उल्हासनगर-३ येथील वापरात नसलेले शौचालय तोडुन सदर ठिकाणी मुतारी बांधणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र मा. श्री. होशियार सिंग लबाणा, उल्हासनगर महानगरपालिका यांचे कडुन आरोग्य विभागास प्राप्त झाले आहे. सदर पत्रानुसार बॅरेक नं.४३८, चेलाराम सोसायटी, उल्हासनगर-३ येथे वापरात नसलेले शौचालय आहे. सदर शौचालय अतिशय वाईट स्थितीत आहे. तसेच सदर शौचालय वापरात नाही व ते दुरूस्त करण्याचे स्थितीतही नाही. सदर शौचालयाव्दारे येथील जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे सदर शौचालय तोडणेची विनंती मा. नगरसेवक श्री. होशियार सिंग लबाणा, उल्हासनगर महानगरपालिका यांनी केली आहे.

सदर शौचालयाचा अहवाल व पंचनामा श्री.सी. एल. छाब्रिया, स्वच्छता निरिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केला असून सदर शौचालय तोडण्याची स्थानिक रहिवाशांनी सहमती दर्शविली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय निष्कासित करून सदर ठिकाणी मुतारी बनविण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व त्याठिकाणी मुतारी बनविणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३६ <u>दिनांकः-१७. ५. २००४</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. भारती छाबरीया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बॅरेक नं. ४३८, चेलाराम सोसायटी, उल्हासनगर-३जवळील जुने सार्वजनिक शौचालय निष्कासन करण्यास व जागेवरील परिस्थिती पाहता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५-२५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती महोदया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका